# Walchandnagar's Cane Mincer



## A breakthrough!

**30% lower power requirement than any other machine of its kind in the world.**

**Efficient enough to recover the investment long before the season is over.**

This in turn can increase the mill's crushing capacity by as much as 30%. Eventually the juice yield (RME) goes up by 1% to 3%. So you can easily recover your total investment in a fraction of a season.**

The pioneers of sugar industry in the country have now introduced another remarkable development. The Cane Mincer.* Walchandnagar's assurance of efficient and economical fibrising in a sugar mill.

**Lowest energy consumption**

Walchandnagar's Cane Mincer consumes 30% less power than any other fibriser in the world. So when you install the Cane Mincer it's not essential to modify or install any electrical equipment. You could continue using the same drive motors. And the electrical loads also remain within the capacity of the existing turbo-generator.

**Highest efficiency**

High extraction follows a good preparation. And Walchandnagar's Cane Mincer prepares sugar-cane like nothing else. The results? The number of juice cells opened may increase to more than 85%.

**Tried. And Tested**

The Cane Mincer is based on indigenous technology developed by Walchandnagar—a Company with half a century's experience in sugar-cane preparation. Besides Walchandnagar is one of the few companies with its own sugar factory, which is like a pilot plant for testing its technical innovations! It was here that the Cane Mincer passed the most rigid tests. Achieving standards, common to every Walchandnagar product. And once again proving the quality and workmanship that Walchandnagar is well-known for.

* Patent pending.

** Subject to cane and mill conditions



WALCHANDNAGAR INDUSTRIES LIMITED
16, Mahatma Gandhi Road, Pune 411 001.

**There is always a way where there is WIL.**

For more details, write in for a free informative brochure.



प्रकाशक : प्राचार्य डॉ. जे. के. गोधा, एम्. कॉम्., बी. ए. एलएल् बी., पीएच्. डी.
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.
मुद्रक : अनेकान्त मुद्रणालय, बारामती ( पुणे )


अंक २४ वा
सन
१९८५-८६

# अनेकान्त



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती (पुणे)

# बारामती कृषि उत्पन्न बाजार समिती, बारामती
## जिल्हा पुणे.

## गूळ, कापूस, भुसार व जनावरांची अग्रगण्य बाजारपेठ

स्थापना १६-१२-१९३५

शेती मालाचे दैनंदिन व्यवहारात सुयोग्य नियमन करून शेतकरी ज. क. एजंटस् व खरेदीदार यांच्या मार्केटमधील हितसंबंधांचे समान संरक्षण करणारी एकमेव संस्था

### —: खास वैशिष्टये :—

१ ) शेतकऱ्यांना त्यांच्या मालास योग्य भाव देण्यासाठी अहर्निश प्रयत्न.
२ ) योग्य भाव मिळण्यासाठी मालाची उघड लिलावाने विक्री.
३ ) आडत, तोलाई, हमाली वगैरेचे अधिकृत व निश्चित दर.
४ ) माल विक्रीची रक्कम त्वरित मिळणेची सोय.
५ ) परवानाधारक आडत्ये व खरेदीदारामार्फतच माल खरेदी विक्रीचे व्यवहार.

मा. श्री. वामनराव गुलाबराव तावरे
सभापती

मा. श्री. जयकुमार जिवराज शहा
उपसभापती

मा. श्री अनिल प्रल्हादराव जगताप
मा. श्री. आनंदराव दत्तात्रय गावडे
मा. श्री. मुरलीधर गुलाबराव कुतवळ
मा. श्री. प्रल्हादराव महादेव घोरपडे
मा. श्री. विष्णुपंत आत्माराम हिंगणे
मा. श्री. जवाहर मोतीलाल शहा
मा. श्री. राजाराम रामचंद्र पोटे

मा. श्री. सोपानराव सदाशिव नांगरे
मा. श्री सुरेश रघुनाथराव निंबाळकर
मा. श्री. गुलाबराव आप्पाजी देवकाते
मा. श्री. माणिकराव बाळासो. कोकरे
मा. श्री. नारायणराव संभाजी देवकाते
मा. श्री. मधुकर भगवानराव सातव
मा. श्री. विनोदकुमार रंगीलदास गुजर

श्री. भारत रावजी दोशी
सचिव

श्री. मुरलीधर गोविंदलाल सिकची
सहाय्यक सचिव

बारामती कृषि उत्पन्न बाजार समिती, बारामती जि. पुणे.


भरावा मोद विश्वात, असावे सौख्य जगतात ॥
सदा हे ध्येय पूजावे जगाला प्रेम अर्पावे ॥

साने गुरुजी

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती

---

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
## बारामती

---

# अनेकान्त

अनन्तधर्मणस्तत्त्वं पश्यन्ती प्रत्यगात्मनः
अनेकान्तमयी मूर्तिर्नित्यमेव प्रकाशताम् ॥

वार्षिक नियतकालिक
( वरिष्ठ )
अंक चोविसावा : १९८५-८६

---


संपादक मंडळ

★ अध्यक्ष
प्राचार्य डॉ. जे. के. गोधा

★ उपाध्यक्ष
प्रा. बी. बी. पाटील

★ साहाय्यक
प्रा. एस्. आर्. नवाथे
प्रा. डॉ. के. एम्. सुर्वे
प्रा. के. एस्. अय्यर
प्रा. बी. जी. देशमुख
प्रा. टी. डी. यादव

प्रमुख संपादक
प्रा. डॉ. दयाराम पाटील

# अनुक्रमणिका


गव्हर्निंग कौन्सिल–लोकल कमिटी–लोकल मॅनेजिंग कमिटी
हार्दिक अभिनंदन
संपादकीय
अनुचिन्तन
श्रद्धांजली

**मराठी विभाग--**

कलावंताची किमया– शंकर पाटील
मी बांग दिली आहे– बाबा आमटे

**कविता**

वाटतं कधी– शेलार आर. पी. ( टी. वाय. बी. कॉम. )
जीवन नाटय– कु. भूषणी कांबळे ( टी. वाय. बी. कॉम. )
यंत्रयुगात– कु. लता गोसावी ( एफ. वाय. बी.एस्सी. )
हे असंच चालायचं- पिसाळ डी. जी. ( एफ. वाय. बी. ए )
प्रवास– संजय मोरे (एफ. वाय. बी. कॉम. )
एक फूल वेलीवरचं– कु. अंजली कुलकर्णी ( टी. वाय. बी. ए. )
भय– कु. ज्योती गणदास, ( एफ. वाय. बी. कॉम. )
आंधळ्या जगात– कु. उज्ज्वला बंडगर ( एस. वाय. बी. ए. )
आढावा– कु. विद्युत केळकर ( टी. वाय. बी. एस्सी. )
अबोली– अशोक आटोळे ( एस. वाय. बी कॉम. )
सत्कर्म– श्रीकांत कुलकर्णी ( टी. वाय. बी. कॉम. )
भिन्नता– डी. एम. शिपणकर ( एम. कॉम. प्रथम वर्ष )
हे मर्त्य मानवा– खाडे एस. एम. ( एफ वाय. बी. ए. )
मूक उच्चार– संदीप सुभेदार ( एफ. वाय. बी. ए )
एकदा तरी पहाटे– सुनील खडके ( एफ. वाय. बी. ए. )
उच्च शिक्षण बदलात प्राध्यापकाचीं भूमिका– भाषण– डॉ. वि. ग. भिडे, कुलगुरु, पुणे विद्यापीठ.
युवकांच्या कवडशातून– सुनील पवार ( टी. वाय. बी. ए. )
युवकांच्या जाणिवांचा शोध– राजकुमार बाफना ( एफ. वाय. बी. ए. )
तरुण पिढीतील असंतोष– मोहन जगदाळे ( टी. वाय. बी. एस्सी. )
बाबा आमटे– डी एस. बनकर ( एम. ए. द्वितीय वर्ष )
संयुक्त महाराष्ट्र : स्वप्न व साफल्य– आनंदराव कदम ( एस. वाय. बी. ए. )
तिरूपती दर्शन– कु. ज्योती मरकळे ( टी. वाय. बी. ए. )
कोलाहल– अशोक आटोळे ( एस. वाय. बी कॉम. )
ठेविले अनंते– कु कल्पना पवार ( टी. वाय. बी. ए. )
निसर्ग : मानवाचा सखा– कु. अरुणा यादव ( एस. वाय. बी. ए. )
बदल– कु. सुनीता भराटे ( एम. ए. द्वितीय वर्ष )

**हिन्दी विभाग**

**कविता**

रात– कांबळे व्ही. के. ( एम. ए. प्रथम वर्ष )
देखते देखते– अनिल पानसे ( टी. वाय. बी. ए. )
फैशनकी दुनियामें– गोरे ई. एस. ( एम. ए. प्रथम वर्ष )
पुनर्भेंट– कांबळे व्ही. के. ( एम. ए. प्रथम वर्ष )
शादी का ढकोसला– डी. टी. जाधव ( एम. ए. प्रथमवर्ष )

**ENGLISH**

A Poem on Dowry— Mr. Bhilare D. M. ( T. Y. B. A. )
Can the present society survive ?— Miss A. S. Kulkarni ( T. Y. B. A. )
Introduction to computer— Jagtap Y. K. ( T. Y. B.Sc. )
कार्यवृत्तान्त, सूची विभाग, प्रगतीची वाटचाल, वार्षिक घटनाक्रम.


अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती ( पुणे )

## गव्हर्निंग कौन्सिल

अध्यक्ष – श्रीमान् शेठ लालचंद हिराचंद, बी. एस्सी. अर्थशास्त्र (लंडन) – मुंबई
उपाध्यक्ष – श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा, बारामती
सचिव – डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी, डी. ए. एस्. एफ्. (मुंबई) – बारामती
खजिनदार– श्री. माणिकलाल तुळजाराम शहा, बारामती

**–: सभासद :–**

श्री. माणिकचंद जयकुमार चवरे, कारंजा
श्री. विमलचंद माणिकचंद गांधी, सोलापूर
श्री. विलास गौतमचंद शहा, बी. ए. एल्.एल्. बी. – सोलापूर
श्री. जी. के. पाटील, एम्. ए , एल्एल्. बी. – इनामधामणी, सांगली
श्रीमती कुसुमबेन मोतीचंद शहा, बी. ए – मुंबई
श्री. शिवलाल प्रेमचंद शहा (लेंगरेकर), बारामती
श्री. मोतीचंद फुलचंद शहा, बारामती
श्री. माणिकचंद ज. भिसीकर, एम्. ए., न्यायतीर्थ, – बाहुबली
श्री. मोतीलाल तुळजाराम शहा, बारामती
श्री. राजकुमार तुळजाराम शहा, बी. ए., एल्.एल्. बी. – बारामती
श्री. आमगौडा आ. पाटील, जयसिंगपूर
श्री. जयपाल भूपाल झेंडे, जयसिंगपूर
प्राचार्य डॉ. जे. के. गोधा, एम्. कॉम्., बी. ए. एल्.एल्. बी. पीएच्. डी. – बारामती } पदसिद्ध सभासद
प्राचार्य डॉ. आर्. टी. अवकोळे, एम्. ए. पी.एच्. डी. – जयसिंगपूर

## निमंत्रित सभासद

श्री. शशिकांत शिवलाल शहा ( लेंगरेकर ) बी. ए. बारामती
श्री. पी. पी. लोहाडे, बी कॉम्., एफ् सी. ए., चार्टर्ड अकौन्टन्ट – पुणे
श्री. रत्नाप्पा कुंभार, बी. ए. – कोल्हापूर
श्री. नलिनचंद्र फुलचंद गांधी, पुणे
श्री. गौतमचंद गुलाबचंद शहा, बारामती
श्री. पी. बी पाटील, अध्यक्ष : स्थानिक समिती, जयसिंगपूर

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

## लोकल कमिटी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ ) | श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा | (चेअरमन) | १० ) | श्री. श्रीमल गुलाबचंद गुगळे | (सभासद) |
| २ ) | डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी | (सचिव) | ११ ) | श्री. माणिकलाल रुपचंद शहा | (सभासद) |
| ३ ) | श्री. मोतीचंद फुलचंद शहा | (खजिनदार) | १२ ) | श्री. विलास माणिकचंद शहा | (सभासद) |
| ४ ) | श्री. शशिकांत शिवलाल शहा | (खजिनदार) | १३ ) | श्री. अरहूतदास हिराचंद शहा | (सभासद) |
| ५ ) | श्री. माणिकलाल तुळजाराम शहा | (सभासद) | १४ ) | श्री. माणिकलाल छगनलाल मुथा | (सभासद) |
| ६ ) | श्री. खुशालचंद रतनचंद छाजेड | (सभासद) | १५ ) | श्री. विलास दिपचंद शहा | (सभासद) |
| ७ ) | श्री. भोगीलाल गुलाबचंद शहा | (सभासद) | १६ ) | श्री. राजकुमार तुळजाराम शहा | (सभासद) |
| ८ ) | श्री. पवनलाल गंगाराम गांधी | (सभासद) | १७ ) | प्राचार्य डॉ. जे. के. गोधा | (पदसिद्ध सभासद) |
| ९ ) | श्री. गौतमचंद गुलाबचंद शहा | (सभासद) | १८ ) | श्री. व्ही. एम्. शहा, इंजिनिअर | (निमंत्रित) |

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

## लोकल मॅनेजिंग कमिटी – १९८५ ते १९८८

अध्यक्ष– श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा
सचिव– प्राचार्य डॉ. जे. के. गोधा

**–: सभासद :–**

१ ) श्री. विनोदकुमार रंगीलदास गुजर
अध्यक्ष, बारामती नगरपरिषद, बारामती
उपाध्यक्ष, विद्या प्रतिष्ठान, बारामती, जि. पुणे

२ ) श्री. राजेंद्रकुमार घोलप
चेअरमन, छत्रपती सहकारी साखर कारखाना लि. भवानीनगर
ता. इंदापूर, जि. पुणे

३ ) श्री. चंद्रराव कृष्णराव तावरे
चेअरमन, दि. माळेगांव सहकारी साखर कारखाना लि. शिवनगर,
ता. बारामती, जि. पुणे

४ ) श्री. भगवानराव साहेबराव काकडे, ( निवृत्त )
प्रतिनिधी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पुणे

५ ) श्री. दिनकरराव (अप्पासाहेब) गोविंदराव पवार
अध्यक्ष, कृषिविकास प्रतिष्ठान, बारामती, जि. पुणे

६ ) डॉ. व. मा. कोठारी, बारामती

७ ) श्री. माणिकलाल तुळजाराम शहा, बारामती

८ ) श्री. शशिकांत शिवलाल शहा, बारामती

९ ) श्री. मोतीचंद फुलचंद शहा, बारामती

१० ) श्री. खुशालचंद रतनचंद छाजेड, बारामती

११ ) प्राध्यापक प्रतिनिधी– १ ) प्रा. एस्. आर. नवाथे, एम. एस्सी.
२ ) प्रा. एस्. पी. कदम, एम्. ए. एम्. एड्.

१२ ) शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी– श्री. धन्यकुमार वालचंद शहा

हार्दिक अभिनंदन !

## आमचे प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांना
## सीनियर ट्रॅव्हलिंग फेलोशिप



प्राचार्य डॉ. जे. के गोधा

प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांना 'असोशिएशन ऑफ कॉमन वेल्थ युनिव्हर्सिटीज' लंडन यांचेकडून कॉमनवेल्थमधील निरनिराळ्या देशातील विद्यापीठांना भेटी देऊन विविध विषयांचा अभ्यास करण्यासाठी 'सीनियर ट्रॅव्हलिंग फेलोशिप मिळाली आहे. या अभ्यास दौऱ्यासाठी त्यांना पस्तिसशे पौंडांचे अनुदानही मंजूर झालेले आहे. कॉमनवेल्थमधील विकसित व अविकसित राष्ट्रातील विद्यापीठांना भेटी देऊन तेथील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रश्न समजावून घेणे, त्याचा अभ्यास करणे हा या अभ्यास दौऱ्याचा उद्देश आहे.

या अभ्यास दौऱ्यात ते ब्रिटन, कॅनडा, मलेशिया, हाँगकाँग, सिंगापूर तसेच आफ्रिकेतील टांझानिया, केनिया, झांबिया, झिम्बाबे, नायजरिया या देशातील १५ विद्यापीठांना भेटी देणार आहेत. त्याच प्रमाणे अमेरिकेतील चार-पाच विद्यापीठांनाही भेटी देणार आहेत.

शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या भारतातील फक्त पाच तज्ज्ञ व्यक्तींची या अभ्यासदौऱ्यासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्रातील व पुणे विद्यापीठाचे एकमेव प्रतिनिधी, ग्रामीण भागातील महाविद्यालयाचे प्राचार्य या दृष्टीने प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांची ही निवड गौरवास्पद आहे. त्यांना प्राप्त झालेल्या या गौरवाचा आमची संस्था, महाविद्यालय, बारामती शहर व परिसर यांना सार्थ अभिमान वाटतो.

याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! त्यांच्या या परदेश दौऱ्यास आमच्या हार्दिक शुभेच्छा ! १० मे १९८६ ते १० ऑगस्ट १९८६ या कालावधीत ते परदेश दौऱ्यावर जातील.

— शुभास्ते पंथानः सन्तु ।

## WORDS OF PRAISE

*I was extremely happy and honoured to visit the well-planned, almost an ideal college.*

*I was deeply impressed by the discipline in the college and its spectacular achievements.*

*I am sure that with the far-sighted leadership of Principal Dr. J. K. Godha and the co-operative atmosphere in the college, it will make rapid and spectacular progress. I wish the college all the best.*

**DR. V. G. BHIDE**
Vice-chancellor, University of Poona.

# हार्दिक अभिनंदन

**वि. वा. शिरवाडकर ( कुसुमाग्रज )**

यांचा पुणे विद्यापीठाने डी. लिट् ही सन्माननीय पदवी देऊन गौरव केला. तर अ. भा. नाट्यपरिषदेने या वर्षापासून राम गणेश गडकरी पारितोषिक जाहीर केले. या पारितोषिकाचे पहिले मानकरी शिरवाडकर ठरले. नाटककार शिरवाडकरांनी जनमानसांत गौरवाचे स्थान प्राप्त केले आहे. त्याचीच ही पावती होय. शिरवाडकरांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो ही प्रार्थना. जीवेत् शरदः शतम्।

**थोर समाजसेवक बाबा आमटे**

यांना १९८५ या वर्षाचे मॅगेसेसे पारितोषिक मिळाले. तसेच पुणे विद्यापीठाने डी. लिट् ही पदवी देऊन त्यांचा सन्मान केला. तर भारत सरकारने त्यांना पद्मविभूषण हा किताब देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

**एस्. एम्. जोशी**

प्रखर देशभक्तीचे व त्यागाचे मूर्तिमंत प्रतीक एस्. एम्. जोशी यांचाही पुणे विद्यापीठाने डी. लिट् पदवी देऊन सन्मान केला व त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला.

विविध क्षेत्रातील थोर व्यक्तींचा डी. लिट् पदवी देऊन पुणे विद्यापीठाने जो सन्मान केला त्याचा आनंद वाटतो.

**श्रीमती डॉ. चित्रा नाईक**

भारत सरकारने श्रीमती डॉ. चित्रा नाईक यांना त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याबद्दल 'पद्मश्री' हा किताब देऊन त्यांचा यथोचित गौरव केला.

**विश्राम बेडेकर**

यांच्या 'एक झाड दोन पक्षी' या आत्मचरित्राला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. तसेच याच ग्रंथाला न. चिं. केळकर पारितोषिक मिळाले आहे.

या सर्वांना प्राप्त झालेल्या सन्मानाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

# सत्कार

१८ मार्च, ८६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या निमित्ताने अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. शंकर पाटील, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य बाळ गाडगीळ व प्रा. डॉ. भालचंद्र फडके यांनी महाविद्यालयास भेट दिली. त्यावेळी अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून श्री. शंकर पाटील, महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक म्हणून राज्य पुरस्कार दिला म्हणून प्राचार्य बाळ गाडगीळ, आणि वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल प्रा. डॉ. भालचंद्र फडके, पुणे विद्यापीठ, यांचा संस्थेचे सेक्रेटरी डॉ व. मा. कोठारी यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला

# संपादकीय.....

आमच्या महाविद्यालयाचा 'अनेकान्त' १९८६ चा २४ वा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हांस आनंद होत आहे.

**सद्यःस्थिती**

पण त्याच वेळी आजच्या २१ व्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या देशातील युवकांना घडविणारे शिक्षण क्षेत्र व शिक्षण घेणारा युवक-विद्यार्थी यांच्या एकूणच परिस्थितीचा विचार प्रकर्षाने मनात आल्याशिवाय रहात नाही.

**शिक्षणप्रक्रिया**

स्वातंत्र्योत्तर काळात गरजेनुरूप शिक्षणप्रक्रियेत जे बदल व्हावयास हवे होते ते आपण केले नाहीत. परिणामी बेकारीचा भस्मासुर निर्माण झाला. त्याचे दुष्परिणाम राज्यकर्त्यांना जाणवू लागले आणि परंपरेने चालत आलेल्या शिक्षणात मूलभूत बदल करून ते जास्तीत जास्त जीवनाभिमुख आणि उपयुक्त कसे होईल या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवरून विचार सुरू झाला. नवे शैक्षणिक धोरण व त्याच्या भावी स्वरूपाची चर्चा यासंबंधी सध्या देशभर चर्चा, विचार-मंथन सुरू आहे.

**कर्तव्य**

राष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणाचा सहभाग निर्विवाद महत्त्वाचा असतो आणि या शैक्षणिक प्रक्रियेत आणि परिवर्तनात शिक्षण संस्थांनी अध्यापक-प्राध्यापकांनी आपला महत्त्वाचा कार्यभाग उचलणे अगत्याचे असते. आपल्या या कर्तव्याचे भान शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्वांनीच ठेवणे आवश्यक आहे.

**पुनर्रचित अभ्यासक्रम**

याच भूमिकेतून आमच्या महाविद्यालयाने पुनर्रचित अभ्यासक्रमाचा स्वीकार करून त्याची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. यावर्षी या अभ्यासक्रमानुसार शास्त्र शाखेची पहिली पदवीधर तुकडी बाहेर पडेल. कला आणि वाणिज्य शाखेत प्रथम व द्वितीय वर्षासाठी हा अभ्यासक्रम राबविला जात आहे. तो या शाखांसाठी तृतीय वर्षातही लागू होईल. या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने प्रत्येक वर्षासाठी एक लाख रुपयाचे अनुदान मंजूर केले आहे त्यामुळे या अभ्यासक्रमाची कार्यक्षमतेने कार्यवाही करणे शक्य झाले आहे.

**नवे प्रकल्प**

विद्यापीठ अनुदान मंडळाने पुरस्कृत केलेल्या विस्तारित सेवा योजनांच्या प्रकल्पात यावर्षी 'लोकसंख्या-शिक्षण' व 'एकात्मिक ग्रामीण विकास' हे दोन महत्त्वाचे प्रकल्प महाविद्यालयाने हाती घेतले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये लोकसंख्येच्या प्रश्नाच्या संदर्भात जागृती निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना लोकसंख्येच्या राष्ट्रीय धोरणाविषयी अधिक माहिती व्हावी आणि समाजात वाढत्या लोकसंख्येच्या परिणामाविषयीची जाणीव वाढावी हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

एकात्मिक ग्रामीण विकास प्रकल्पात समाजविकासाची व्यापक भूमिका असून त्यादृष्टीने महाविद्यालयाच्या वतीने अनेक उपक्रम ग्रामीण भागातून सुरू केलेले आहेत. समाजातील अंधश्रद्धा, निरक्षरता, परंपरागत रूढी, परंपरा, जातीयवाद यांच्या निर्मूलनाचे कार्य या द्वारा करावयाचे आहे.

**आजचा युवक-विद्यार्थी**

आजचा युवक-विद्यार्थी भारतीय संस्कृतीच्या परंपरेपासून दूर जात आहे. त्याच्या प्रकृतीत विकृती निर्माण होत आहेत. त्यांच्यात शिक्षणाबद्दल, शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींबद्दल आस्था दिसत नाही. एकूणच उदासीनतेच्या विळख्यात तो सापडला आहे. त्यामुळेच तो बेशिस्तीचा गुलाम बनला आहे. मादक पदार्थांच्या आहारी तो जाऊ लागला आहे. सद्गुण चांगले संस्कार यापासून तो दूर चालला आहे आपल्या उज्ज्वल भारतीय परंपरेची त्यास

विस्मृती झाली आहे. आजची ही मोठी चिंतेची बाब आहे. या विळख्यातून त्याची मुक्तता करणे हे शिक्षणसंस्थांचे, त्यांत काम करणाऱ्या शिक्षक–प्राध्यापकांचे काम आहे. त्यासाठी या युवकांवर–विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार व्हावेत या दृष्टीने संस्कार केंद्राची निर्मिती होणे जरूरीचे वाटते. त्याद्वारा प्रभावी कार्य करता येईल. आमच्या महाविद्यालयाने या दृष्टीने हा उपक्रम हाती घेण्याचे ठरविले आहे.

**आमच्या देशाची स्थिती**

देशाचे आजचे चित्रही मोठे चिंताजनक आहे. देशात वेळोवेळी होणाऱ्या समस्यांमुळे संपूर्ण देश आंदोलित होतो. आज दहशतवादाचा भस्मासुर आपले विक्राळ रूप दाखवून आम्हाला भयभीत करीत आहे. जात, धर्म यांचा संकुचित व चुकीचा अर्थ लावून एक प्रकारचा घरभेदेपणा निर्माण केला जात आहे. भ्रष्टाचाराची मुळे खोलवर रुजत चालली आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. विभक्त कुटुंबाची वाढ होत आहे. जीवन धकाधकीचे बनले आहे. त्यामुळे एकेकाळी एकत्र कुटुंबातून वडिलधाऱ्या मंडळींकडून बालमनावर होणारे संस्कार थांबले आहेत. पाळणाघरांची संख्या, वृद्धाश्रमांची संख्या वाढते आहे. झोपडपट्ट्यांची भरमसाठ वाढ व त्यामुळे उद्‌भवणाऱ्या अनेक समस्या यामुळे शासनही हबकून गेले आहे. या परिस्थितीत प्रश्न पडतो की, या सर्व गुंतागुंतीतून कोण व कसा मार्ग काढणार आहेत ? आजचे राज्यकर्ते, पुढारी, समाजसेवक काही आदर्श निर्माण करणार आहेत का ? एकविसाव्या शतकाचे हे खरे आव्हान आहे.

या आव्हानाचे शिवधनुष्य पेलणारी कोणती तरी शक्ती, व्यक्ती आम्हांला भेटेल का ? हे शिवधनुष्य पेलणाऱ्या व्यक्तीच्या वाटेकडे आम्ही डोळे लावून बसलो आहोत. आजच्या या अंधार युगातून जाताना प्रकाशाचा एखादा किरण दिसावा तसा बाबा आमटे आणि त्यांच्या सारख्याच अगदी फारच थोड्या लोकांचा विश्वास वाटतो. पण ती कावड धारण करून त्या कावडीतील सुमधुर जल सर्वसामान्यांपर्यंत पोचविणारे खांदे कुठे आहेत ? त्यांना हात देणाऱ्यांची साथ कुठे आहे ? या एकूण परिस्थितीचा विचार केला की, निराशाच पदरी पडते.

पण निराश होऊन चालणार नाही अंधारातून प्रकाशाकडे नेणारे नवे नेतृत्व आम्हाला लाभेल असा विश्वास वाटतो. आजच्या शिक्षणाकडे आम्ही याच दृष्टीने पहात आहोत.

**'अनेकान्त ८६' मधील साहित्य**

या वर्षी आमच्या आवाहनाला विद्यार्थी–विद्यार्थिनींनी उत्तम प्रतिसाद देऊन भरपूर साहित्य दिले. त्यांतून प्रकाशन योग्य अशा साहित्याची निवड आम्ही केली. या साहित्यातील विविधता, नावीन्य वाचकांना जाणवल्याशिवाय राहणार नाही. ज्या विद्यार्थी-मित्रांनी, विद्यार्थिनींनी आम्हांला साहित्य दिले त्यांचे आम्ही आभारी आहोत.

**ऋणनिर्देश**

हा अंक वेळेवर वाचकांच्या हाती द्यावा असा संकल्प आम्ही केला होता. त्यानुसार त्यासाठी सर्वांचेच सहकार्य आम्हांला लाभले. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा याचे अचूक मार्गदर्शन व मौलिक सूचना यामुळे कामाला गती मिळते व काम वेळेवर व उत्तम होते असा अनुभव आहे. त्यांचे मार्गदर्शन आम्हाला लाभले. उपप्राचार्य प्रा. बी. बी. पाटील यांनी देखील उपयुक्त सूचना केल्या. प्रा. एस् आर् नवाथे यांनी अंकाची सजावट, ब्लॉक निर्मिती, फोटोची मांडणी यासाठी भरपूर श्रम घेतले. प्रा. डॉ. के. एम्. सुर्वे, प्रा. के. एस. अय्यर, प्रा. बी जी. देशमुख, प्रा. टी डी. यादव यांचेही उत्तम सहकार्य मिळाले. श्री. एस्. एन. पाटील, ग्रंथपाल यांनी जाहिराती मिळवून देऊन उत्तम सहकार्य दिले, तर जाहिरातदारांनी अनेकान्तला जाहिराती देऊन महाविद्यालयावरील प्रेम व्यक्त केले.

**अनेकान्त मुद्रणालय**

या वर्षीचा संपूर्ण अंक अनेकान्त मुद्रणालयात तयार झाला आहे. अंक वेळेवर, सुबक आणि सुंदर रूपात प्रकाशित होण्यात मुद्रणालयाचे व्यवस्थापक प्रा. व्ही. ए. वकील, कर्मचारी श्री. शेख, श्री निकम व श्री. लोंढे यांचे उत्तम सहकार्य लाभले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**प्रा. डॉ. दयाराम पाटील**
प्रमुख संपादक

१० एप्रिल, १९८६, वर्ष प्रतिपदा.

# अनुचिन्तन

या पूर्वीच्या लेखांकांतून 'अनेकान्तवादा'चे तात्त्विक स्वरूप समजून घेण्याचा आपण प्रयत्न केला. या तत्त्वचिंतनाचा व्यवहारात काही उपयोग आहे का याचा आज विचार करू या.

प्रत्येक वस्तू अनेक गुणधर्मांनी युक्त असते. तिच्याकडे वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून पाहता येते. प्रत्येक दृष्टिकोणानुसार समजून घेतलेले वस्तुस्वरूप त्या त्या संदर्भात सत्य असते. हे संदर्भ लक्षात येताच एकांतिक मतातील विसंगती दूर होते, आणि वस्तुस्वरूपाच्या समग्रतेची जाणीव प्रगट होते हा 'स्याद्‌वादा' चा निष्कर्ष आपण पाहिला.

तसेच, भाषेच्याद्वारे संपूर्ण सत्य कधीच व्यक्त करता येत नाही. प्रत्येक भाषिक विधान मर्यादित व आंशिक सत्यच सांगू शकते. पण तेच पूर्ण सत्य आहे असा एकांतिक आग्रह धरला की विसंगती निर्माण होते. म्हणून प्रत्येक विधानाचा संदर्भ किंवा विवक्षा समजून घेणे आवश्यक असते असे 'नयवाद' सांगतो हेही आपण समजून घेतले आहे.

'अनेकान्तवादा' ने दिलेले हे भान जर आपण सतत जागृत ठेवले तर आपला सारा आचार-विचारादी व्यवहार बदलून गेल्याशिवाय राहणार नाही.

पहिलीच गोष्ट अशी की, आपला दुराग्रह कमी होईल. 'मी म्हणतो तेच खरं' असा आपला अहंकारी अभिनिवेश गळून पडेल. आपल्या मताला कोणी विरोध केला तर आपण चिडणार नाही, रागावणार नाही, किंवा वितंडवाद घालणार नाही. तर आपण आपल्या विचाराचा आपल्याला अभिप्रेत असणारा संदर्भ स्पष्ट करून त्या संदर्भात आपले मत कसे सुसंगत आहे हे आपल्या विरोधकालाही आपण समुचितपणे पटवून देण्याचा प्रयत्न करू.

त्याच प्रमाणे, आपल्या विरोधकाचे मतही आपण अविचारीपणाने उडवून लावणार नाही किंवा त्याला एकदम मूर्खही ठरवणार नाही. त्याचेही म्हणणे आपण शांतपणे ऐकून घेऊ. त्याचा हेतू काय आहे, दृष्टिकोण कोणता आहे हे समजून घेण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न करू आणि मग आपल्या लक्षात येईल की, त्याच्याही विचारात काही तथ्यांश आहे.

अशा दुहेरी अनुभवातूनच आपल्या ठायी समजूतदारपणाची एक प्रगल्भ व सहिष्णू जाणीव विकसित होईल.

आज आपण पाहतो की, माणसा-माणसांमधील संबंध, मग ते कौटुंबिक पातळीवरचे असोत, सामाजिक पातळीवरचे असोत की राष्ट्रीय पातळीवरचे असोत, अधिकाधिक तणावपूर्ण होत चालले आहेत. कोणी कोणाला समजून घ्यायलाच तयार नाही. घरा-घरांत कलह, मित्रा-मित्रात वितुष्ट, गटा-गटामध्ये वैर, धर्मा-धर्मात कटुता, राष्ट्रा-राष्ट्रात शत्रुता अशी आजची परिस्थिती स्फोटक बनली आहे. वास्तविक पाहता, आजच्या लोकशाहीच्या वातावरणात विरोधकांचे म्हणणेही समजून घेण्याची सहिष्णुवृत्ती वाढायला हवी. पण त्या ऐवजी उलट 'विरोधासाठी विरोध' अशी दुराग्रही प्रवृत्तीच प्रबळ होत असलेली दिसून येते. प्रत्येक जण 'माझंच खरं' असं म्हणतो आहे आणि दुसऱ्याला खोटं ठरवतो आहे. आणि हा दुराग्रह अट्टाहासाने चालविण्यासाठी अलौकिक बुद्धिमत्ता, अपार साधन-संपत्ती आणि अफाट सत्ता या आपल्या अमूल्य शक्तींना माणूस आज विपरीत अभिनिवेशाने वेठीला धरतो आहे.

यावर उपाय एकच- एकमेकांना 'समजून' घेणं. आणि मानवी इतिहासात कधी जाणवली नाही इतक्या प्रकर्षाने आज त्याची आवश्यकता जाणवू लागली आहे.

या मानवी जीवनात केवढी विविधता आहे, केवढी विचित्रता आहे. प्रत्येक व्यक्तीचे संदर्भ वेगळे. संस्कार, परिस्थिती, पार्श्वभूमी, हेतू, दृष्टिकोण, विचार पद्धती, प्रवृत्ती सगळं व्यक्तिगणिक भिन्नभिन्न. चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, सत्य-असत्य, सुंदर-कुरूप, इष्ट-अनिष्ट या कल्पनाही स्थल-काल व्यक्तिनुसार बदलणाऱ्या. आणि तरीही ही सारी विविधता, विचित्रता, भिन्नता एका समग्र व्यापक 'अस्तित्वा' तच सामावलेली आहे. म्हणूनच ती परस्परांच्या पूर्ण विरोधात नाही, एकमेकांना छेद देणारी नाही; तर ती परस्पर सापेक्ष आहे हे 'स्याद्‌वादा' ने स्पष्ट केलं आहे.

भाषिक व्यवहारही असाच व्यक्तिनुसार बदलणारा. शब्द तेच, अभिप्राय वेगळे. व्यवहारातील अनेक अपसमज आणि गैरसमज भाषेच्या संदिग्धतेमुळे निर्माण होतात. हे सर्व टाळण्यासाठीच केवळ शब्दांपेक्षा त्या

शब्दांमागे असणारा वक्त्याचा अभिप्राय समजून घेण्याची नयविवक्षा नयवादाने सांगितली आहे.

असा हा अनेकान्तवाद प्रत्येकाच्या आचारविचारात रुजला पाहिजे. प्रत्येकाच्या वागण्या-बोलण्यातून व्यक्त झाला पाहिजे. तेव्हाच माणसा-माणसांमधील विरोधी बृत्ती मावळतील. खऱ्या अर्थानं सहकार्य वाढेल. शांततामय सहजीवनाचा आदर्श प्रत्यक्षात अवतरेल.

महात्माजींनी म्हटलं होतं, "माणसानं 'माझं ते सत्य' असा आग्रह न धरता 'सत्य ते माझं' असा आग्रह धरायला शिकलं पाहिजे." हे शिकायचं असेल तर विविधतेच्या आणि मतमतांतराच्या चकवणाऱ्या अफाट पसाऱ्यांतून नेमकं निखळ सत्य शोधू पाहणारी निर्मळ व अनाग्रही दृष्टी प्राप्त होणं आवश्यक आहे. आणि 'अनेकान्त' ही वास्तवाकडे व जीवनाकडे पाहण्याची अशी निर्मळ, सर्व समावेशक, उदार, सम्यक् दृष्टी आहे.

★

---

## दिवंगतांना श्रद्धांजली

**१९८५-८६ या शैक्षणिक वर्षात पुढील व्यक्तींचे दुःखद निधन झाले.**

इतिहास संशोधक ग. ह. खरे
आचार्य दादा धर्माधिकारी
राजकवी यशवंत
श्रीमती मालतीबाई दांडेकर
कथाकार लक्ष्मणराव सरदेसाई
तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ति
प्राचार्य ल. नी. छापेकर
प्राचार्य प्र. रा. दामले
भाई माधवराव बागल
नटवर्य काशिनाथ घाणेकर
के. के. शहा
अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे चिटणीस डॉ. व. भा. कोठारी यांच्या मातोश्री श्रीमती राजूबाई कोठारी,
ज्यु. कॉलेजमधील प्रा. बी. एल. दबडे यांचे पिताजी श्री. लक्ष्मण नाना दबडे
प्रा. ए. बी. देसाई यांच्या मातोश्री सौ. श्रीमती देसाई,
प्रा. के. एस्. अय्यर यांचे पिताजी मोसूर सुब्रह्मण्यम् अय्यर

या सर्वांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली

---

म
रा
ठी
विभाग

# कलावंताची किमया

कोणतंही बलदंड व्यक्तिमत्व मग तो कलावंत असो वा प्रज्ञावंत, मला वाटतं, तो जो कोणी कलावंत किंवा प्रज्ञावंत असतो, तो त्याच्यातील 'मी' मुळच असतो. हा 'मी' फार महत्वाचा. सगळी सळसळ तिथून सुरू होते.

आपल्या सगळ्या धडपडीला, आविष्काराला शक्ती देणारा आपल्यातला 'मी' च असतो. आज जे कोणी तुम्ही कवी आहात, लेखक आहात, चित्रकार आहात किंवा आणि कोणी आहात, ते त्या 'मी' मुळं आहात. तुमच्यात तो असाधारण 'मी' आहे म्हणून तुम्ही आहात. त्या 'मी' मुळे तुमच्या जाणिवा जागृत राहतात, संवेदना सक्षम होतात आणि त्यांच्या स्वभावधर्मामुळं कोणाला चित्रकला जमते, तर कोणाला शब्दकळा वश होते. आपण कलावंत लेखक आहात म्हणजे एका परीनं भाग्यवंत आहात.

इतरांना कळ्या दिसतात किंवा त्यांची फुलं झालेली दिसतात. लेखक हाच एक असा भाग्यवान आहे, की तो त्या कळ्यांचं रूपांतर होतांना त्यांचं ते हळूहळू उमलणं पाहू शकतो. ती स्थितिगती त्याला आकळते.

परमेश्वरानं तुम्हा कलावंत साहित्यिकांना वेगळे डोळे दिले आहेत त्या डोळ्यांनी पहा, टिपा, त्या दिव्य दृष्टीला जे दिसेल ते तुमच्या जाणिवेकडं सोपवा आणि मग त्या अनुभवाचं सोनं करा. अहो कविता, कथा म्हणजे ही चैतन्याची फुलं आहेत ! चैतन्याची फुलं करण्याची कला तुम्हाला लाभली आहे.

'भाषा' हे केवढं मोठं माध्यम तुमच्या हातात आहे.

**—श्री. शंकर पाटील**

( २५-२६-२७ ऑक्टोबर १९८५ रोजी नांदेड येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणातून. )

**आनंदवनीचे श्रमयोगी बाबा आमटे यांचे युवकांना आवाहन......**

## मी बांग दिली आहे

क्रांतीच्या जळजळत्या ज्वाला पेरण्यासाठी
आणि करुणेची मंद मधुर फुले फुलविण्यासाठी
मला आता घ्यायचा आहे
आयुष्यातला शेवटचा हंगाम.........
महत्प्रिय देशाच्या
ठसठसणाऱ्या वेदना व कसकसणारी दुःखे
मला सेवाव्रती ओठांनी
सांज सारखी टिपायची आहेत
कालच्या निबिड अंधारात
वावचळून गेलेल्या
आजच्या पुत्रांना
दाखवायची आहे
उद्याच्या उजेडाची लखलखती दिशा
म्हणूनच मी माझ्या पावलांना गती दिली आहे
हरवलेल्या वेदनेशी संगती जोडण्यासाठी.
वर्तमानाच्या झोताबरोबर लसलसणारे
माझे अखेरचे पिक
उद्याच्या पिढीसाठी
नवा हुंकार रुजवणारे
पहिले पिक ठरू शकेल.
एका सेवासक्त आनंद मनाने पाहिलेले
ते हिरवेगार स्वप्न आहे.

★ ★ ★

माझ्या आयुष्यातला
शेवटचा हंगाम घेताना
मी तुम्हाला बांग दिली आहे.
या पिकाळ प्रदेशात
स्वप्नांचे पिक घ्यायचे की नाही
हे तुम्ही ठरवायचे आहे !

'साधना'–१९ डिसेंबर १९८५



# क वि ता

## वाटतं कधी

वाटतं कधी कॉलेज सोडावं
राजकारणात पडावं
नगरसेवकापासून खासदार बनावं
भ्रष्टाचार, लाचलुचपत यांचा गळा दाबावा
ढोंगी पुढाऱ्यांचा बुरखा फाडावा ।

वाटतं कधी कॉलेज सोडावं
संपादक व्हावं
भ्रष्टाचाराचा बुरखा फाडावा
अन्यायाला वाचा फोडावी
नाहीच मिळाली दाद तर
बेभान होऊन भटकावं ।

वाटतं कधीतरी कॉलेज सोडून
खेड्यात जावं
अज्ञान रुढीचा करावा प्रतिकार
मागास बंधू-भगिनींना करावे हुशार
त्यांचा आनंद आपला मानून जीवन कंठावं ।

वाटतं कधी कॉलेज सोडावं
कुठंतरी काम करावं-लग्न करावं
कामावरून थकून आल्यानंतर
तिनं दिलेलं पाणी प्यावं
भाकर होईपर्यंत तिच्या बांगड्यांची किणकिण
पैंजणांची छूम छूम ऐकत राहावं ।
तिनं केलेली भाकरी
चवीनं खावी
खाता तिचं बोलणं गोडीनं ऐकावं
आणि शेवटी
तिच्यातच आपलं जीवन समर्पित करावं
कधी वाटतं कॉलेज सोडावं ।

**शेलार आर. पी.**
टी. वाय्. बी. कॉम्.

## जीवन नाट्य

मी नाटकात काम करत आहे.
जन्माला आले तेव्हा पासून
किंबहुना तेव्हा पासूनच सुरू झालय
माझं नाटकातलं काम

नाटकात आहेत कितीतरी पात्र
चित्रविचित्र चांगली आणि वाईट
मी ही आहे त्यातलीच एक
कोणाला माहित चांगली की वाईट

नाटकात मी इतकी रंगले
वेळेचं मला भानच नाही
तोंडाला लावलेला रंग पुसून
परत जायचं ध्यानच नाही

जरी मला नसेल वेळेचे भान
नाटकाचा सूत्रधार जो आहे 'सुपरमॅन'
त्याला हे काम करावच लागेल
मला नाटकातून काढावच लागेल

जावं लागेल मला परत
तुम्हाला राम राम करत
नाटकातील पात्रांची व माझी
मैत्री तुटेल काही काळ
पण......
तीही पात्रे येतील वरती
आहे मला याची पक्की खात्री

**कु. भूषणी व्ही. कांबळे**
टी. वाय्. बी. कॉम्.

# यंत्रयुगात

अवतरले हे यंत्राचे युग
यंत्राच्या भोवती फिरे जग
तू-मी सारी यंत्रे आधी
आणि माणसे उरली तर मग !

दावली कळ अन् फिरली चाके
खुपसा यंत्रा माजी डोके
नको भावना नको कळवळा
नको मनाचे उसवू टाके ।
रीत नवी यंत्राची पाळा
मिचकावुनी शिणलेला डोळा
प्रिय मानुनी इथे करावा
खुशाल यंत्रासंगे चाळा ॥

नको कुणाच्या भेटी गाठी
नको कुणाची नजर चोरटी
पुढे असावी दिवसा-रात्री
रसायनाची जळती भट्टी ॥

वेडी स्वप्ने वेडया आशा
कशास आता हव्याहव्याशा
उरुन गेला मंत्र जगाचा
यंत्रयुगाचा धर्म 'निराशा'! ॥

जिते जागते जीव परंतु
यंत्रातील वळवळते जंतु
यंत्रासंगे जगणे आणि अखेर यंत्रापाशी मृत्यु ॥

**कु. लता रंगनाथ गोसावी**
एफ्. वाय्. बी. एस्सी.

# हे असच चालायचं

वर्ण द्वेषी आग अंतरी
लोक हिताचे वरसोंग
कर्तृत्वाची धमक न अंगी
देश भक्तीचे वर ढोंग
हे असच चालायचं

गल्लोगल्ली पुढारी झालं
आश्वासनाचं पिक आलं
इथं कोणीबी येऊन म्हणलं
जन कल्याण आम्हीच केलं
हे असंच चालायचं

गावगन्ना हे असच चालायचं
खरं खोटयाचं बोलायचं नसतं
जग भुलून त्याला हो फसतं
दिसतं तसं हो सारंच नसतं
हे असचं चालायचं

कुणी काय करायचं
हे –
ज्यानं त्यानं स्वतःच ठरवायचं
हे असचं चालायचं
हे असचं चालायचं.

**पिसाळ डी. जी.**
एफ्. वाय्. बी. ए.

# प्रवास

जीवनाच्या प्रवासात
चाललो होतो वहात
दुःखाच्या भोवऱ्यात
फिरत फिरत
प्रीतीच्या स्टेशनात
दिलास तू हात
प्रवाहावर करून मात
दिलीस तू साथ
जाणून जीवनाचे मोल
सावरलास माझा तोल
जीवन माती मोल
आनंदाने फुलविल
हात हातात घेतलेस
सुरू झाला प्रवास
आता आपल्या जीवनाला
येतो सुखाचा सुवास

**संजय बाबुराव मोरे**
एस. वाय्. बी. कॉम.

# भय

कधी वाटते भय या प्रकाशाचे
कदाचित हा दिपवून टाकेल
कधी वाटते भय या अंधाराचे
कदाचित हा लोपवून टाकेल
कधी वाटते भय या सखीचे
कदाचित ही मैत्रीचे पाश तोडेल
कधी वाटते भय स्वतःच्याच अंतरंगाचे
कदाचित हा आत्मविश्वास डळमळेल
कधी वाटते भय हया दोन डोळयांचे
कदाचित फसवतील आपुल्या मनाते

**कु. ज्योती गणदास**
एफ्. वाय्. बी. कॉम्.

# एक फूल वेलीवरचं

एक फूल वेलीवरचं
रोज खेळ खेळायचं
वाऱ्यावरोबर डुलायचं
अन्
पानावरोबर नाचायचं
कधी
खुदकन् हसायचं
तर कधी
मुळूमुळू रडायचं
पण एक दिवस त्यानं ठरवलं
कधी नाही कोमेजायचं
असच टवटवीत रहायचं
यासाठीच— अरसिक मित्रांनो
ते कधीच नाही तोडायचं

**कु. अंजली कुलकर्णी**
टी. वाय् बी. ए.

# आंधळ्या जगात

आंधळ्या जगात वावरतांना........
आशेचा मला किरण दिसला,
डोळयांना तो दिसत नव्हता
पण स्पर्शाने मला तो जाणवत होता
सहानुभूतीची मला गरज नव्हती
जीवन जगायला मी समर्थ होतो
अन् हातात तिच्या हात होता
काळचा कुट्ट अंधारात........
आता चाचपडण्याची गरज नव्हती,
खंबीरतेने ती उभी होती,
म्हणूनच जगण्याची आस होती

**कु. उज्ज्वला बंडगर**
एस्. वाय्. बी. ए.

# आढावा

कशाला मारता देशाच्या उन्नतीच्या मोठाल्या गप्पा
दारिद्र्य, बेकारी उपासमारी याने त्रासला आहे हृदयाचा कप्पा
तुम्हाला वाटतं हा प्रश्न आहे साधा सरळ सोपा
मात्र तो आहे गुंतागुंतीचा न सुटणारा तिढा
विज्ञानाची दृष्टी प्रयत्नाची कास सर्व आहे
काय नाही...... ?
विद्वत्तेचा अभाव नाही, पण तिला योग्य दिशाच नाही
आम्ही दिलेली कामे करतो खाली मान घालून
कधी प्रती प्रश्न विचारायचे आम्हास ठाऊक नाही
इतरांच्या प्रगतिकडे आपण पहायचे वळून वळून
काम करायचे म्हटल्यावर जायचे त्रासून गळून
मग कसा दिसेल तुम्हाला प्रगतीचा माथा ।
अशीच किती दिवस वाचत राहणार दुर्दैवाची गाथा ।

**कु. विद्युत केळकर**
टी. वाय्. बी.एस्सी.

# अबोली

अवचित रस्त्यामध्ये भेटलीस
काय बोलावे कळेना
गच्च भरून आले आभाळ
पण थेंब काही गळेना
आठवणींच्या गोफाचा पीळ काही सुटेना
तुझी नुसतीच चलबिचल
माझा संभ्रम संपेना
शब्द सारे एकवटले
पण सूर काही जुळेना
नुसतेच करून स्मित
तू गेलीस
पण पाऊल माझे निघेना
अबोलीच्या व्यथा काय
आजही मला कळेना

**अशोक आटोळे**
एस्. वाय्. बी. कॉम्.

# सत्कर्म

आठवणींच्या वेलीवर
स्वप्नरूपी पक्षी येतिल का ?
अलिप्त अशा मनामध्ये
मूर्त असे स्वरूप प्राप्त होईल का ?
इच्छेच्या सागरावर
प्रयत्नांची लाट येईल का ?
प्रशांत भावनांना
स्पर्श कोणी करेल का ?
संकुचित विचारांना
विशाल स्वरूप येईल का ?
अबोल अशा विचारांना
वाचा साद घालील का ?
भाग्यशाली हातांनी
सत्कर्म कधी घडेल का ?

**श्रीकांत कुलकर्णी**
टी. वाय्. बी. कॉम्.



# भिन्नता

सूर्योदय होतो नित्य
पण तेथे आकाशात
प्रकाश ना येथे येतो
आम्ही नित्य अंधारात

यंत्रांच्या आवाज येतो
वाहनांची गर्दी तेथे
येथे गर्दी झोपड्यांची
अवाच्य शब्द या येथे

उमलती फुले तेथे
तो सुगंधही तिकडे
उघड्या गटारी येथे
नागडी मुले इकडे

श्रीमंती उतली तेथे
प्रसन्न सारी दैवते
येथे सर्व मानवास
दारिद्र्यता प्रसन्नते

तेथे जातात ते वरती
येथे आम्ही चाललो खालती
तेथे ते म्हणे संस्कारित
आम्ही मात्र मात्र संस्कारहीन

म्हणून सुधारीत ते
आणि आम्ही असे दीन
नकोत तुमची फुले नकोच तयांचा वास
राहू अंधारात आम्ही, नका करू मात्र द्वेष

**डी. एम्. शिपणकर**
एम्. कॉम. प्रथम वर्ष

# हे मर्त्य मानवा

हे मर्त्य मानवा
गेला कुठे तुझा मानव धर्म
कशासाठी कुणासाठी
करतोस हे रावणी कर्म
आहे तुझ्याच सारखा
सर्वमानव समाज
मग कशासाठी उठवतोस भेदभावाचे आवाज
असेल तुला
मिटवावयाचा सर्व प्रकारचा वाद
तर सोडून दे
हा 'उच्च–नीच', 'काळा–गोरा' भेदभाव
हे मर्त्यमानवा कर महत् कार्य

**खाडे एस्. एम्.**
एफ्. वाय्. बी. ए.

# मूक उच्चार

आजकाल ऋतूंची गडे वचने चुकार
हा वसंत उसना हे बहार उधार
या कळीचे नेमके कोणते नाव ?
शोधास हिच्या सारे भ्रमर फरार
एवढी का असत्याची तुला यावी शिसारी
हरेक प्रांजळांना आज याचाच विकार
पाझरतो काय तुझ्या अश्रूंत ओलावा ?
हे माझ्या अंगावर कसे कोरडे तुषार
माझ्या इज्जतीची कुठे मला खंत ?
करता कशाला हा पोकळ प्रचार ?
बंदा बुलंद हा ॐकार आमुचा
घोषणेचा का तुमच्या तुम्हाला अहंकार ?
शेवटी दोन दारीचा मी असा भिकारी
कुठे मला पुकार तर कुठे मला नकार
नकोस काढू माझ्या जाण्याचा मागोवा
प्रत्येक रस्त्याशी माझ्या पाऊलांचा करार
नको करू उगाच बरसात अश्रूंची
येईल कधी समाधीतून मूक उच्चार ?

**संदीप सुभेदार**
एफ्. वाय्. बी. ए.

# एकदा तरी पहाटे (गझल)

एकदा तरी पहाटे तू उजळून जा
हे श्वास रेशमाचे तू मोहरून जा
आता माझ्याजवळ ते चोरटे स्पर्श नाहीत
तुझ्या हळव्या शपथा तू ओळखून जा
या चांदण्या रात्रीत माझे आकाश कोरडे
ही आरास तारकांची तू सजवून जा
आता उरात राहिल्या थोड्या जड आशा
एकेक राग आता तू आळवून जा
या चंद्रमौळी वाटा आता उदास झाल्या
तुझ्या परतीच्या हाकात तू मिसळून जा

**सुनील खडके**
एफ्. वाय्. बी. ए.



# उज्ज्वल यश

**( प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण )**



पी. आर पाटील
एम ए. (इतिहास)



कु. हेमांगी कात्रे
एम. कॉम.



जे. एल. चौधरी
बी. ए (भूगोल)



कु. संगीता हरनोळ
बी एस्सी. (वनस्पतिशास्त्र)



ए. एम कांबळे
बी. कॉम. (अकौन्टन्सी)

## ★ उल्लेखनीय ★



कु. ज्योती मरकळे
आंतरराष्ट्रीय एन. एस. एस. शिबीर, तिरुपती येथे पुणे विद्यापीठातर्फे प्रतिनिधित्व



कु. सविता चिनके
शंकर्स इन्टरनॅशनल कॉम्पिटिशन १९८५ पेन्टिंगचे पारितोषिक, हस्ते उपराष्ट्रपती मा. श्री. आर. वेंकटरामन

## महाविद्यालय वर्धापन दिन



ना. श्री. शरद पवार
( विरोधी पक्ष नेते )



श्री. कमलकिशोर कदम
उपसभापती : महाराष्ट्र राज्य विधानसभा

## बारामती नगरपरिषद– अध्यक्ष, उपाध्यक्ष सत्कार ( हस्ते कमलकिशोर कदम )



श्री. विनोदकुमार गुजर, अध्यक्ष



श्री. दिगंबर तावरे, उपाध्यक्ष



स्वातंत्र्य सैनिक श्री. पोपटलाल शहा (पुण) यांचा सत्कार



डॉ. एस. जी. कामत

## कविवर्य मोरोपंत वाद व वक्तृत्व स्पर्धा– ( प्रमुख पाहुणे, खासदार श्री. संभाजीराव काकडे )



वादस्पर्धा ढाल स्वीकारताना– उपेंद्र खरे नितीन आपटे
आय. एल. एस. लॉ कॉलेज, पुणे



वक्तृत्व स्पर्धा ढाल स्वीकारताना– अभिराम भडकमकर
बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे.

## रक्तदान शिबीर ( १५ ऑगस्ट १९८५ )





नगराध्यक्ष मा. श्री. विनोदकुमार गुजर, डॉ. कोठारी व उपजिल्हाधिकारी श्री. वानखेडे यांच्या उपस्थितीत

## अमेरिकन चित्रीकरण पथकाची भेट





जीवशास्त्र प्रयोगशाळा

वार्षिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभ– हस्ते प्राचार्य बाळ गाडगीळ





कु. संगीता बेलपत्रे श्री. जवाहर चौधरी

वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ– हस्ते श्री. शंकर पाटील





श्री. पी. डी. [illegible] व श्री एस. एन्. कांबळे श्री. एस्. डी. इंगुले व श्री. बी. एन. होनराव

आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा



प्राचार्यांच्या समवेत कबड्डी उपविजयी संघ

# उच्च शिक्षण बदलात प्राध्यापकाची भूमिका


**डॉ. वि. ग. भिडे**
एम्. एस्सी., पीएच्. डी. ( लंडन )
एफ् एन् ए, एफ् ए एस्सी
कुलगुरु– पुणे विद्यापीठ.




श्री. राजीव गांधींनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून देशाच्या विकासात आणि समाजाच्या उद्धारात शिक्षणाचे किती महत्व आहे आणि हे महत्व जाणून शिक्षणप्रणालीत आमुलाग्र बदल करणे कसे आवश्यक आहे या बद्दल अनेकदा प्रतिपादन केले आहे. शिक्षणाचा व्यापक अर्थ ध्यानी घेऊन त्यांनी मानवी शक्ती विकास मंत्रालय नव्याने नुकतेच स्थापन केले आहे. त्यांच्याच प्रोत्साहनाने शिक्षण मंत्रालयाचे नवे शैक्षणिक धोरण कसे असावे या विषयी विचार विनिमय सुरू केला. या विचारमंथनातून तयार झालेली पुस्तिका ' शिक्षणाचे आव्हान ' त्यावेळचे शिक्षण मंत्री ना. कृष्णचंद्र पंत यांनी लोकसभेपुढे ठेवले तेव्हापासून या विषयावर निरनिराळ्या ठिकाणी विविध स्तरावर चर्चा होत आहेत.

मी काही कोणी शिक्षण तज्ञ नाही, पण शिक्षण पद्धतीतून तयार झालेला एक विद्यार्थी आहे व या शिक्षण पद्धतीकडे व त्यातून तयार होणाऱ्या उच्चांकांकडे आणि विशेषतः त्या दोन्हीत होणाऱ्या अधोगतीकडे तसेच विद्यार्थ्यांना ज्या समाजात जीवन कंठायचे आहे त्या समाजाच्या अधोगतीकडे जरा चिंतेने व तळमळीने पाहणारा अभ्यासक आहे.

१७ व्या शतकात युरोपात औद्योगिक क्रांती सुरू झाली व तीनशे वर्षांच्या काळात मानवाने अत्यंत द्रुत गतीने प्रगती केली. जे समाज व देश या औद्योगिक क्रांतीत तातडीने सामील झाले ते झपाट्याने प्रगत झाले आणि जे देश बघ्याची भूमिका घेऊन औद्योगिक क्रांतीत सामील न होता केवळ ती कडे निष्क्रियपणे

पहात राहिले ते मागे पडले व अनेकांना आपले स्वातंत्र्यही गमवावे लागले. परिणामी जगातील देशांचे विकसित व अविकसित असे दोन गट पडले. औद्योगिक क्रांतीमुळे प्रत्येक पिढीत आमूलाग्र बदल झालेला दिसतो. जे देश शेपन्नास वर्षे निष्क्रीय राहिले ते जगाच्या पाठीमागे पडले.

गेल्या दहा वर्षात दुसरी क्रांती पहिल्या जगाच्या क्षितीजावर उगवली आहे. ही नवी क्राती अत्यंत गतीमान व प्रचंड आहे. यात मानवी कौशल्या ऐवजी इलेक्ट्रॉनिक्स व संगणक यांचा सर्रास वापर होऊ लागला. ही क्रांती अमेरिका व जपानमध्य सुरू झाली. एखादा देश ५–१० वर्षे निष्क्रीय राहिला तर तो कायमचा मागे पडण्याचा धोका आहे. या क्रांतीच्या वेगाची जाणीव भारतात ज्या प्रमाणात व्हायला पाहिजे त्या प्रमाणात ती झाल्याचे दिसत नाही. सध्याच्या शाळा–कॉलेजातील मुलामुलींना या नव्या क्रांतीत वेगाने सामील करणे हे आजच्या शिक्षणाचे एक उद्दिष्ट असले पाहिजे.

गतिमान देशात समाज घटकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यावेळी सांगोपांग विचार करून निर्णय घ्यावे लागणार आहेत आणि हे निर्णय घेताना वैज्ञानिक दृष्टीकोन अंगिकारणे अटळ बनले आहे.

वैज्ञानिक प्रगतीमुळेच समाजाच्या विविध घटकात असंतुलन व वितुष्ठ निर्माण होऊ पहात आहे ते टाळण्यासाठी विज्ञानाच्या वेगाशी जुळवून घेत असतानाच जीवनमूल्यांचाही विसर पडून चालणार नाही.

भारतात ३५ वर्षांपूर्वी समाजातील आकाराने छोटा वर्ग शिक्षण घेत आहे. जागतिक विज्ञानाच्या क्षेतात दर दहा वर्षांनी प्रवेग निर्माण होत आहे. हा प्रवेगही मोठा आहे. हे ध्यानात घेता प्रत्येक समाजघटकास केवळ २–४ वर्षे औपचारिक शिक्षण घेऊन चालणार नसून अध्ययनाची प्रक्रिया सतत सुरू असली पाहिजे ती निरंतर हवी. पूर्वीच्या स्थिर शिक्षणाची जागा गतीशील शिक्षणाने घ्यायला हवी, म्हणजे नव्या शिक्षणपद्धतीचा अवलंब करणं आवश्यक आहे.

महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यातही निरक्षरता फार मोठी आहे. निरक्षर देश अपेक्षित प्रगती करू शकत नाही. निरक्षरता नाहीशी करण्यासाठी शाळा शिक्षक यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढवायला हवी शिक्षणावरील खर्चाचे प्रमाणही वाढवायला हवे.

भारतात दहावी अथवा बारावी नंतर एक वर्षाची राष्ट्रीय सेवा सक्तीची करायला हवी. या वर्षात प्रत्येक विद्यार्थ्याने प्राथमिक शिक्षकाचे काम सक्तीने केले पाहिजे. यामुळे निरक्षरतेचे प्रमाण घटेल. विद्यार्थ्यांना समाजाच्या समस्या समजतील. ज्ञान पुस्तकाबाहेरही आहे याची विद्यार्थी शिक्षक यांना जाणीव झाली पाहिजे त्यादृष्टीने शिक्षकाने विद्यार्थ्यांची जिज्ञासा उत्तेजित केली पाहिजे.

उपलब्ध साधन सामुग्री आणि ज्ञानकौशल्य प्राप्तो यांची प्राप्त परीस्थितीत सांगड घालण्यासाठी शिक्षकाचा शिक्षण विषयक परंपरागत दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. त्यासाठी 'समाज महाविद्यालय' ( कम्युनिटी कॉलेज ) व मुक्त विद्यापीठ (ओपन युनिव्हर्सिटी) या कल्पना रूजायला हव्यात

विकसनशील देशात शैक्षणिक क्रांती घडायची असेल तर प्रथम शिक्षक बदलला पाहिजे. तोच शैक्षणिक बदल घडविणारा महत्वाचा घटक आहे. शिक्षणाचे आव्हान हे मुख्य ते शिक्षकास असून ते त्याने स्विकारले पाहिजे, त्यासाठी समाजाने, शासनकर्त्यांनी शिक्षकास समर्थ केले पाहिजे, आवश्यक त्या सुविधा व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली पाहिजे, तरच अपेक्षित शैक्षणिक बदल घडू शकतील.

( पुक्टो बुलेटिन– नोव्हेंबर, डिसेंबर १९८५ )







*१९८५ हे आंतरराष्ट्रीय युवक वर्ष म्हणून साजरे झाले, त्या निमित्त महाविद्यालयीन युवकांनी व्यक्त केलेल्या भावना.......*

# युवकांच्या कवडशातून

**सुनील पवार पाटील, टी. वाय्. बी. ए.**

"......काळ व निसर्ग यांच्या कार्यामध्ये मनुष्य-प्राणी हा भागीदार आहे व ही भागीदारी तुम्ही आपल्या पिढीतही प्रेमाने, सहकार्याने व कठोर प्रयत्नांनी शेवटपर्यंत टीकवून देशाचा सार्वभौम विकास व प्रगती करून घेतली पाहिजे तुम्ही भारताचे भावी आधार-स्तंभ आहात, ज्यांच्या आधारावर भारताला आधुनिक काळामध्ये नवे यशस्वी पाऊल टाकायचे आहे. तुमच्यापैकी कुणी डॉक्टर होईल, कोणी इंजिनीयर होईल, कोणी वकील होईल तर कोणी मंत्री होईल. आपण काहीही झालात तरी देशासाठी तुमचा उपयोग व्हावा. देश तुमच्या उदयोन्मुख पिढीच्या हातात सुरक्षित राहील अशी सदिच्छा व्यक्त करून तुमच्या भावी जीवनाला शुभेच्छा देतो. जय हिंद !" अशा भारावलेल्या शब्दांनी आमच्या एस्. एस्. सी. च्या वर्गाला मुख्याध्यापकांनी निरोप दिला व आपली दमदार पावले टाकीत ते शांतपणे स्टेजवरून खाली उतरले. भावी आयुष्याची सुखस्वप्ने पहात आम्ही घरी परतलो. मुख्याध्यापकाचे शब्द आमच्या कानी अजूनही गुंजत होते.

रिझल्ट लागला. कॉलेज ॲडमिशनच्या त्या लांबलचक रांगा, मेरीटवरील ॲडमिशन्स, वशिलेबाजी, मनाविरूद्ध शिक्षणाची नाईलाजास्तव घरच्यांकडून झालेली जबरदस्ती, घरातील वेगळ्या वातावरणामुळे मनाचा कोंडमारा, कॉलेजमधील नवीन जीवन, वातावरण काही सहकाऱ्यांची स्वच्छंद वागणूक, संपत्तीचे हिडीस प्रदर्शन, टगेगिरीचे प्राथमिक धडे, अभ्यासाकडे दुर्लक्ष, कॉलेजच्या वातावरणातील निरनिराळे गट, त्यांच्या मर्कट लीला, अध्यापकवर्गाशी असलेली बेदरकार वागणूक, महाविद्यालयीन निवडणूकांना देण्यात आलेले अवास्तव महत्व, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागलेले मतभेद व त्याचा भावी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा विचार केला तर, मुख्याध्यापकांनी निरोप समारंभात युवाजनाचे भावी आयुष्याचे रंगविलेले चित्र वास्तव की अवास्तव याचीच शंका मनामध्ये घर करून रहाते. फक्त एकच एक विचार मनात येतो ..... पुढे काय !......

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळामधील युवाशक्तीपुढे निरनिराळे आदर्श होते. प्रथम देशाचे व नंतर माझे हितसंबंध कसे सुरक्षित रहातील याची काटेकोरपणे दक्षता घेतली जात होती. अनेकांनी 'रामराज्याची' कल्पना अस्तित्वात आणण्यासाठी अखंड प्रयत्न केले. संत सज्जनाचे आदर्श, स्वातंत्र्यासाठी केलेल्या निरनिराळ्या नेत्यांची त्यागाची महती, गुरुजनांबद्दलची आत्मीयता व आदराची भावना असे निरनिराळे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून केलेली वाटचाल निश्चितच डोळस वाटचाल होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी शिकवलेली कर्तव्यनिष्ठा, महात्मा गांधींनी मातृभुमीसाठी दिलेली अहिंसेची शिकवण, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी सोसलेले कष्ट, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, क्षमता, बंधुता हा दिलेला अमूल्य मंत्र यांची शिदोरी बांधून युवापिढीने केलेली खंबीर वाटचाल निश्चितच यशस्वितेच्या अतिउच्च शिखराकडे घेवून जाणारी नव्हती काय !

स्वराज्य स्थापनेच्यावेळी बाल शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या उभारणीसाठी संसाराची होळी करणारी विश्वासू सहकाऱ्यांची सेना तयार केली होती. शिव छत्रपतींच्या काळात त्यांच्याच बालमावळ्याने स्वामीनिष्ठा व कर्तव्यनिष्ठेसाठी, वेशांतर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनाच 'खबरदार जर टाच मारूनी जाल पुढे चिंधड्या उडवीन राई, राई एवढ्या' असे दिलेले बाणेदार उत्तर आज या युवापिढीतील

मनात श्री. छत्रपतींच्या कार्यक्षेत्रात राहूनसुद्धा आढळू शकत नाही यासारखी दुसरी शोकांतिका ती कोणती ? सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांमधील अशिक्षित युवकांना हाताशीं धरून छत्रपतींनी निर्मिलेल्या स्वराज्याने हिमालयापासून ते कन्याकुमारीपर्यंत व बंगालच्या उपसागरापासून ते अरबी समुद्रापर्यंत आपली सत्ता गाजवली. कुठल्या विश्वविद्यालयामध्ये यांनी पदव्या घेतल्या होत्या ! स्वराज्याची स्थापना व त्याचे संरक्षण याचे बांधलेले कंकण हीच त्यांची पदवी होती, हेच त्यांचे भावी जीवन होते.

शेतकऱ्याचा मुलगा शेतकरीच बनणार, सोनाराचा मुलगा हा सोनारकीच करणार, शिंप्याचा मुलगा हा शिंपीच होणार असा सर्वसाधारण मधला काळ जरी गेलेला असला तरी आज मात्र काळामध्ये फार मोठ्या प्रमाणावर बदल घडून आलेला आहे. आज एखादा शेतकऱ्याचा मुलगा डॉक्टर अथवा वकील बनू शकतो. पुजाऱ्याचा मुलगा खुशाल चपला–बुटाचे दुकान काढतो तर चांभाराचा मुलगा कलेक्टर होतो. बदलत्या काळाची ही महती अशीच बदलत रहाणार नाही, ती बदलली पाहिजे. 'आचार स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य म्हणजे स्वच्छंदी जीवन' हे शाप की वरदान हाही वादाचा विषय होवू शकतो.

पूर्वीच्या काळातील युवक म्हटल्यावर उंच बांधा, रूंद छाती, सशक्त प्रकृती डोळ्यांसमोर उभी रहाते. मात्र हल्लीचा युवक तो हाच काय ! असे विचारण्याची पाळी आपल्याला येते.

एकेकाळी लाल मातीचे आखाडे गाजविणारा एखादा पहेलवान किंवा कबड्डी, खो–खो मधील दम घुमवणाऱ्या एखाद्या खेळाडूबद्दल लोकांना कुतुहल, सहानुभूती व रास्त अभिमान वाटत असे. समाजामधून देशी खेळांना व मैदानी खेळांना मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे त्या खेळाची वाढ झाली व म्हणूनच राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय खेळाडू देशामध्ये तयार झाले. तरुण युवक म्हटल्यावर तो एखाद्या व्यायाम शाळेचा अथवा स्पोर्टस क्लबचा सभासद असायचाच. आजच्या युवकांना खेळात रस दिसतच नाही व खेळ वाढवण्यासाठी शासनाचे तसेच संबंधीतांचे प्रयत्नही नाहीत. 'भक्कम शरीरातील मनही भक्कम असते' याचा शोध व बोध कधी घेतलाच जात नाही व तो घेण्याचा कोणी फारसा प्रयत्नही करीत नाही. परीक्षांमधील भ्रष्टाचार, लाचलुचपत, वशीलेबाजी, कॉपी, मेरीट यामध्ये न बसणारे असंख्य युवा आज अंधारात चाचपडत आहेत, अडखळत आहेत. यशस्वी आयुष्याचा धागा हाती पकडण्याचा एक अयशस्वी प्रयत्न करीत आहेत.

दोन वर्षांपूर्वी दिल्लीला 'अेशियाड' झालं. अनेक देशामधील अनेक संघ भारतामध्ये चमकले. परंतू भारताने भरविलेल्या मायदेशामधील या सामन्यामध्ये तो स्वतः किती यशस्वी ठरला. त्याच्या अपयशाची कारणे समजावून घेण्याचा एवढा तरी प्रयत्न कोणी केला आहे काय ? विदेशी तर सोडाच पण देशी खेळात तरी आपण कितपत कामगिरी करू शकलो ? याच सामन्यांमधील 'कुस्ती' या खेळाचं सांघिक अजिंक्यपद जपानला मिळालं. त्या जपानी कुस्ती शिक्षकाची मुलाखत आली होती "तुमच्या या नेत्रदीपक विजयाचे रहस्य काय ?" या एका वार्ताहराने विचारलेल्या प्रश्नाला त्याने दिलेले उत्तर मोठे विचार करण्यासारखे आहे. तो म्हणाला "आम्हाला सांघिक अजिंक्यपद मिळाले असले तरी त्यात आम्हाला समाधान नाही. कारण, यापेक्षाही जास्त अपेक्षा आम्ही बाळगल्या होत्या". विजयाच्या बेहोशीमधील या जपानी कुस्ती शिक्षकाचे उद्‌गार जरा जास्तच अवास्तव वाटले. परंतु त्याने नंतर दिलेल्या माहितीनंतर खात्री पटली की त्याचे उद्‌गार योग्य होते.

आपल्या देशामध्ये बोटावर मोजण्या इतकी जी पब्लिक स्कूल्स आहेत, तशी जपानमध्ये सर्वच पब्लिक स्कूल्स आहेत. वयाच्या पाचव्या वर्षांपासून वयाच्या दहाव्या वर्षांपर्यंत तो मुलगा कोणत्या खेळामध्ये, कोणत्या विषयामध्ये पारंगत होणार याचे अचूक निदान केले जाते व त्यानुसार त्या विद्यार्थ्याला त्या त्या विषयाचे व त्या त्या खेळाचे शास्त्रशुद्ध शिक्षण दिले जाते. लहान मन व शरीर लवचीक असते व ताबडतोब वळते. त्याला योग्य आकार दिला जातो. तेथील प्रत्येक शाळेमध्ये खेळांची, अभ्यासाची सर्व साधने उपलब्ध असतात. त्या तुलनेने आपल्याकडील शाळा म्हणजे कोंडवाडेच समजले पाहिजेत.

मुले ही राष्ट्राची बहुमोल संपत्ती आहेत. तिचे पालनपोषण करण्याची सर्व जबाबदारी राष्ट्राची पर्यायाने शासनाची असते व म्हणूनच अब्जावधी रुपये खर्च करून ही राष्ट्रीय संपत्ती वाढविली जाते व यामुळेच दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेले 'जपान' सारखे राष्ट्र राखेतून उठून आज अमेरिकेसारख्या तुल्यबळ व अग्रगण्य राष्ट्रापुढे ताठ मानेने पुन्हा उभे राहते.

'बोलाचीच कढी व बोलाचाच भात' या प्रमाणे आपले पुढारी भाषणामध्येच ज्ञानामृत पाजण्याचा मक्ता घेऊन येतात व जातात. आज काळ झपाट्याने बदलत चालला आहे. जगाच्या जेट युगामध्ये आपण अजूनही बैलगाडीतच आहोत. आज आपल्या तरुण पंतप्रधानांनी कितीही कॉंप्युटरची भाषा वापरली तरी या कॉंपुटरला खुराक देणारी मंडळी भारतीयच आहेत हे विसरून चालणार नाही व म्हणूनच आजचा युवक कॉंप्युटरच्या युगाकडे विस्मयाने पहात आहे.

"आपला भारत देश अफाट आहे. देशाची लोकसंख्या फार मोठी आहे व दररोज हजारोंची भर त्यात पडत आहे व त्या मानाने आपली साधनसामुग्री अत्यंत अपुरी आहे" हे तुणतुणे आपण किती दिवस वाजवणार आहोत ! हे आपल्याला आव्हान आहे, आपण त्याला सामोरे जावून ते स्वीकारू ही जिद्द आपल्या कृतीमध्ये केव्हा उतरणार ! काळाची गरज लक्षात घेवून देशातील ही युवापिढी केव्हा आक्रमक धोरणे स्वीकारणार ! प्रश्न अनेक आहेत, उत्तरेही आपल्याजवळ आहेत. परंतु काळाच्या ओघामध्ये बुरसटलेल्या विचारामध्ये आपण ती हरवून बसलो आहोत. सर्व काही अजूनही शक्य आहे. वेळ अजूनही गेलेली नाही.

'A youth can do any thing, from nothing.

परंतु, एकाच साच्यातून निघणाऱ्या असंख्य नाण्याप्रमाणेच आजचा तरुण बाहेर पडत आहे. आपण हे बदलले पाहिजे. साचे बदलले की नाणेही बदलेल. साचे बदलण्याची जबाबदारी सरकारची, पर्यायाने लोकप्रतिनिधींची, सामाजिक संस्थांची, शासनातील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची व समाजातील सर्व घटकांची आहे. 'गाढ झोपलेल्याला आपण उठवू शकू. परंतु झोपल्याचे सोंग करणाऱ्याला आपण कसे उठवू शकणार !' परंतु युवापिढीने स्वयंस्फूर्तीने एकत्र येवून जर लढले तर या झोपेचे सोंग घेतलेल्या समाजातील विनाशक शक्तींना उठवण्यासाठी आपण नक्कीच वेगळ्या मार्गाचा अवलंब करू. तरुण पिढी जागृत करण्याची, त्याचा पाया भक्कम करण्याची, मजबूत करण्याचे अगदी युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याचीच आज खरी देशाला गरज आहे.

युवक वर्षानिमित्त तरुण पिढीने जर ही खूणगाठ मनाशी पक्की बांधली तरच 'युवक वर्ष' हे खऱ्या अर्थाने भारतामध्ये साजरे झाले असे अभिमानाने म्हणावे लागेल व त्याचवेळी आमच्या मुख्याध्यापकांचे निरोप समारंभाचे ते शब्द खरे होऊ शकतील असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

卐

---

## शिक्षणाचा खरा अर्थ

"ज्ञान केवळ पुस्तकातूनच मिळते असे नाही. सामान्यपणे मी असे मानतो की, ज्यामुळे ज्ञानाचा पाठलाग करण्याची, ज्ञानाची सफर पुरी करण्याची शक्ती आणि दृष्टी माणसात निर्माण होते ते शिक्षण होय. पदवीपर्यंत मनुष्य शिकतो आणि पदवी परीक्षेनंतर सर्वांच्या संमतीने कुलगुरू त्याच्यावर अनुग्रह करतात. त्या अनुग्रहाचा अर्थ असा असतो की, स्वतःच्या परिश्रमाने अधिक ज्ञान मिळविण्यास तुम्ही आता पात्र झाला आहात. शिक्षणाचा हा खरा अर्थ आहे."

—यशवंतराव चव्हाण

---

# युवकांच्या जाणिवांचा शोध – बोध

**राजकुमार बाफना**, एफ्. वाय्. बी. ए.

हे युवकवर्ष म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरे केले. या पूर्वी महिला वर्ष, बालक वर्ष, अपंग वर्ष अशी वेगवेगळी वर्षे साजरी करण्यात आली. कोणतेही वर्ष जाहीर झाल्यानंतर ते संपेपर्यंत त्याचा उदो उदो करायचा, की लगेच कुठले तरी वर्ष जाहीर करायचे, त्याचा उद्घोष करायचा व परत ते संपल्यानंतर आणखी कुठल्या तरी वर्षाची सुरूवात .. ...

ही साखळी अशीच चालू ठेवायची का ? शासकीय पातळीवर या वर्षाचा उदो उदो करायचा व वर्ष संपताच भुतकाळ नुसता विसरायचा नाही तर त्याला गाडून टाकायचे अशीच आपली आतापर्यंत चालत आलेली परंपरा याही वर्षी चालू ठेवायची का ? अशा अनेक प्रश्नांनी आम्हा युवकांना नुसते भंडावून सोडले आहे म्हणून या लेखाचा प्रपंच कदाचित या वृत्तांतातील मते अतिशय टोकाची वाटतील व टोकाची आहेत म्हणून बोचतील सुद्धा. ही बोचली तर युवकांच्या अंतःस्थ भिडली व ते अंतर्मुख होऊन विचार करण्यासारखी परिस्थिती जरी यामुळे निर्माण केली तरी हे श्रम सार्थकी लागेल असेच मी समजेन.

**भारतीय समाज–**

या संदर्भात भारतीय समाजाचा विचार केला तर आपणास असे आढळून येईल की हा समाज या संकल्पनेत बसणारा नाहीच मुळी, हा समाज किंवा देश अनेक तुकडयामध्ये विभागला आहे. हे तुकडे निर्माण होण्याची प्रक्रिया खूप जुनी आहे समाज या विशेषणाला हे तुकडे पात्र नाहीत. हे तुकडे का निर्माण झाले ? याचा विचार केला असता आपणास असे आढळून येईल की, धर्म, जाती, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा अनेक कारणामुळे हा समाज विखुरला आहे नुसता विखुरला असता तर काही वाटले नसते. पण कधीतरी निर्माण झालेल्या या तुकडयांनी आता या क्षणी स्वतंत्र बेटाचे स्वरूप घेतलेले आहे. ही बेटे स्वयंपूर्ण नाहीत. जीवनाच्या मुलभूत गरजांच्या संदर्भात किंवा काही अनिवार्य कारणांमुळे या बेटांना एकमेकाशी देवघेव करावी लागते एवढाच या बेटांना सांधणारा दुवा आहे. स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जपण्याचा या वेडया आणि अतिरेकी विचारांनी या तुकडयांना असे भारावून टाकले आहे की, या प्रयत्नात आपण आत्मनाश करून घेत आहोत याची जाणीव या बधीर तुकडयांना नाही. पराकोटीच्या वैयक्तिक स्वार्थाची भावना, असंकुचितपणा, आत्मकेंद्रितता या कुंपणांनी या बेटाच्या ज्ञानचक्षुंना बंद करून टाकले आहे याची खंत किंवा लाज या तुकडयांना नाही.

डोळे बंद केल्यामुळे बाह्य परिस्थिती बदलायची थांबत नाही तर आपण बदलणाऱ्या युगाचे स्वागत पाठी दाखवून करतोय याचे भानही त्यांना नाही. अशा बदलाच्या काळात आव्हानांना तोंड देण्याचे व त्यांच्याशी झगडण्याचे सामर्थ्य फक्त युवकांच्या जवळ आहे पण......

**युवकांच्या अपेक्षा–**

माझ्यामते सध्या काय परिस्थिती आहे या युवकांची ? सरकारी आकडेवारी असे दर्शविते की या देशात ५ कोटी तरुण बेकार आहेत. ५०% पेक्षा अधिक लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. प्रश्न असा निर्माण होतो की, राज्यकर्त्यांनी या देशात शिक्षण पद्धती राबविली ह्या राज्यकर्त्यांनी सध्याच्या बेकार तरुणांना असेच ( बेकार ) ठेवण्याचा विचार केला आहे काय ? की ते या संबंधीचा विचार करण्याचे कार्य मागे घेतले आहे आणि जर घेतले असतील तर ते सध्या काय करतात ? आणि ही वर दर्शविलेली संख्या वाढत आहे. त्यांना वाटते तरी काय ? हे बेकार तरुण वैफल्याने ग्रासून जातील नाही तर काय ? उद्याची सुंदर स्वप्ने पाहणार आहेत काय ? ही वैफल्यग्रस्त पिढी जर समाजविघातक बनली तर हा दोष या पिढीचा नसून येथील राज्यकर्त्यांचा आहे. काळाची गरज ओळखून व लोकसंख्येतील शिक्षण घेणाऱ्या घटकांचा देशासाठी विविध बाबतीत उपयुक्त असणाऱ्या योजनांमध्ये समावेश करून हा प्रश्न हे राज्यकर्ते सोडवू शकले असते परंतु खुर्चीत ( राजकारणाची ) आपले आयुष्य वेचणाऱ्या राज्यकर्त्यांना आणि राजकीय पक्ष पुढाऱ्यांना काळाचे एवढे भान नाही.

जीवनाभिमुख, समाजाभिमुख शिक्षणाचा अभाव. यामुळे हा युवक वैफल्याने ग्रासला आहे. कळप, तट, गट, संघटना यांनी हा युवक दुभंगला आहे. त्याचे हे दुभंगलेपण असेच कायम राहणार काय ? दुभंगलेला युवक ज्या तुकडयामध्ये विभागला गेला आहे ते परिवर्तन घडवून आणू शकतील काय ? समाज हा मुळातच स्थितीशील असतो व त्याप्रमाणेच हे तुकडे देखील आहेत. त्याच्याकडून परिवर्तनाची अपेक्षा करावयाची काय ? उद्याच्या पिढीला हा आजचा तरुण दुभंगलेपणाचा वारसा देणार काय ? आणि हे दुष्टचक्र असेच चालू राहिले तर राष्ट्रासाठी, समतेसाठी, बंधुत्वासाठी बलिदान केलेल्या थोर नेत्यांचा वारसा सांगण्यास आपण लायक आहोत काय ?

**आजची गरज–**

सर्वव्यापी राष्ट्रवादाची निर्मीती ही आजच्या काळाची गरज आहे. हा राष्ट्रवाद, स्वतंत्रता, समता, बंधूता या अटीवर आधारलेला असला पाहिजे. या राष्ट्रवादाच्या संकल्पनेचे पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी ही आम्हा युवकावर आहे. ते करण्याची आमची संपूर्ण तयारी आहे

वर उल्लेखलेल्या तुकडयामध्ये या क्षणी कमीत कमी संवाद घडवून आणावा व सुसंवाद घडवून आणण्याचा प्रयत्न करावा. एक विशाल, सर्वशक्ती संपन्न आणि विषमताविरहीत समाजाची संकल्पना, राष्ट्रीय हिताचा विचार करता किती महत्वाची आहे. याचा प्रसार व प्रचार करण्याची जबाबदारी आजच्या युवकावर आहे.

विविध पातळीवर कार्य करणाऱ्या सेवाभावी संघटना या संदर्भात युवकांना मदत मार्गदर्शन करतील. ( कमीत कमी एवढे वर्ष तरी ) अशी आशा वाटते. ही आव्हाने पेलून एकसंघ समाज बनवण्याचे आव्हान काळाने आम्हा युवकांच्यापुढे उभे केले आहे. एक सुंदर राष्ट्रनिर्मितीचे आव्हान सुद्धा काळाने आमच्यापुढे उभे केले आहे.

जर आम्ही युवक या आव्हानांना सामोरे गेलो नाही तर......

काळ आम्हाला कंव्हाच क्षमा करणार नाही.

★

# तरुण पिढीतील असंतोष

**मोहन जगदाळे**, टी. वाय्. बी. एस्सी

आज सर्व जगभर एकच चर्चा विशेष प्रमाणात ऐकण्यात येते, ती म्हणजे आजची तरुण पिढी ! मग त्यात अनेक प्रश्न निर्माण होतात. आजची तरुण पिढी असंतुष्ठ आहे काय ? असेल तर असंतोषाचे कारण काय ? याशिवाय तरुण पिढीवर आक्षेप घेतले जातात की, आजचा तरुण असमंजस आहे, ध्येयहीन आहे, बेजबाबदार आहे. आशावादी नाही. मग खरोखरच तो ध्येयहीन आहे काय ? त्याच्या मनात देशप्रेम नाही काय ? देशात रामराज्य प्रस्थापित व्हावे असे त्याला वाटत नाही काय ? असले अनेक प्रश्न डोळयासमोर येतात व नकळत आपले मन त्यांच्या उत्तराच्या शोधात निघते. प्रथम तरुण म्हणजे कोण व त्याची पिढी कोणती याचा विचार करणे जरूर आहे. कारण एखादा ६० वर्षाचा म्हातारा देखील म्हणतो, की मी तरुण आहे. अर्थात तो मनाने तरुण आहे असे म्हणतो. त्याला मात्र तरुणांत जमा करता येणार नाही.

साधारण २१ वर्षे वयाच्या पुढे गेलेले तरुण–तरुणी म्हणजे आजची तरुण पिढी आहे असे आपण समजू. कारण याच वयात त्याला मतदानाचा हक्क प्राप्त होतो.

दुसरा प्रश्न असा निर्माण होतो की, या असंतोषाचा उगम कधी झाला ? स्वातंत्र्यापूर्वी की स्वातंत्र्यानंतर ? तर याचे उत्तर दोन्ही वेळेस होता, असे येईल. फरक इतकाच की स्वातंत्र्यापूर्वी परतंत्र्यामुळे तरुण असंतुष्ठ होता. काही महाभाग म्हणतात की, ब्रिटीशांचा काळ चांगला होता, त्या काळात आजच्या इतक्या अडचणी येत नव्हत्या. परंतु तो भाग वेगळा आहे. लो. टिळक, म. गांधी, पं. नेहरू वगैरे साख्यांच्या महान नेतृत्वामुळे व कर्तबगारीने स्वातंत्र्य मिळाले. लोकशाही पद्धतीने आर्थिक विकास करावयाचा ह्या धोरणांचा संकल्प केला व या मार्गाने योजनाबद्ध कार्यक्रम आखण्यात आले. परंतु राज्यकर्त्यांना आर्थिक विकास न साधता आल्यामुळे देशात बेकारी वाढीस लागली व आज हा बेकारीचा प्रश्न भेसूर स्वरुपात सरकारपुढे उभा राहिला. आज शिक्षणाचा प्रसार इतक्या झपाट्याने झाला आहे की, दरवर्षी लाखो पदवीधर बाहेर पडत आहेत. परंतु त्यांना नोकरी नसल्यामुळे तो सर्व वर्ग असंतुष्ठ आहे. त्यात स्त्रियांनी-सुद्धा नोकरीचे पाऊल उचलल्यामुळे बेकारीचा प्रश्न अधिकच वाढला. ज्या देशात हजारो इंजिनीयर्स बेकार फिरतात त्या देशाच्या राजकारणाला काय म्हणावे ? त्यातच आजची पद्धत इतकी सदोष आहे की त्यामुळे तरुणाचे मन असंतुष्ठ झाल्याखेरीज रहात नाही. आजचे जे शिक्षण शाळा–कॉलेजमधून दिले जाते त्याचा विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यात काडीमात्रही उपयोग होत नाही. हे शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीला माहीत असते. पण जुनी प्रथा मोडून नवीन प्रथा सुरू करण्याचे धाडस कोणी करत नाही. शहरातून, तालुक्यातून ग्रंथालये असतात. परंतु त्यातील पुस्तके कित्येक वर्षे कोरीच असतात. कांही अनुभवी मंडळी असा आक्षेप घेतात की आजचे विद्यार्थी फक्त गाईडस् वापरतात, क्लासेसला जातात व निकस असे शिक्षण घेतात. मग ह्या मंडळींना आम्हाला असे सांगावेसे वाटते की, हे मार्ग आम्हाला कुणी दिले ? आम्हाला वाघिणींचं दूध तुम्ही पाजलं होतं कां, जेणे करून आम्हाला आमची ताकद दाखविण्यास संधी मिळावी ? व मग अशा पोचट शिक्षणपद्धतीतून बाहेर पडलेला तरुण समाचात घडणाऱ्या घटना पाहतो तेव्हा वैफल्यग्रस्तच असणार, तो उत्साहाने रसरसलेला असेल अशी कल्पना करणेच चुकीचे आहे.

स्वातंत्र्य मिळून आज ३६ वर्षे झाली, परंतू या काळात राजकारण इतके दुबळे बनले की त्यामुळे ज्या ज्या क्षेत्रात आर्थिक विकास होण्याऐवजी ऱ्हासच होत गेला. जगातील कोणताही प्रगत देश असा विचार करणार नाही की आपल्याप्रमाणे भारत देश बलवान आणि सुखसमृद्ध व्हावा त्यांना नेहमी असेच वाटेल की हा देश नेहमीच लुळापांगळा व प्रगत देशावर अवलंबून असावा. ही साधी गोष्ट आम्हा तरुणांना चटकन कळते.

आज भाषावार प्रांतरचना पाहिली म्हणजे समाधान होण्याऐवजी चीडच जास्त येते. यामुळे भाषावाद व प्रांतीय वाद निर्माण झाले. मी बंगाली म्हणून मला बंगालचाच जास्त अभिमान, मी मराठा म्हणून महाराष्ट्राचा मला अभिमान अशी वृत्ती भारतीय तरुणात भिनली आहे. त्यातच जातीयता नष्ठ होण्याऐवजी ती वाढीस कशी लागावी हाच विचार काही लोकांनी केलेला दिसतो. विशिष्ठ जात मागासलेली, विशिष्ठ जातीसाटी वेगळे कायदे, यामुळे जातीयता व प्रांतीयता वाढीस लागली. माझा एक अनुभव सांगतो, आपला महाराष्ट्रीय तरुण किती हुशार आणि निरीक्षणात चतुर आहे हे त्यावरून कळेल. मी आस्ट्रेलिया–भारत क्रिकेट सामन्याविषयी वाचले होते की खूप गर्दी, गॅलरी पूर्ण भरलेली होती व एका सज्जनाचा एका माणसाला धक्का लागला व जमीन आकाश करीत तो लोकांच्या डोक्यांवरून गडगडत खाली जाऊ लागला. त्याला वाटले आपली शंभर वर्षे भरली. तेवढ्यात एक आवाज आला, "अरे जाने दो, ये तो हिन्दू है और महाराष्ट्रीयन हैं।" हे ऐकून तिसऱ्याने जागा दिली. तो विचार करीत बसला. ह्याने इतक्या लवकर कसे ओळखले ? कारण आमचे अवधान मद्रासी तर अवमान पाकिस्तानी, आणि एका क्षणात त्याच्या ध्यानात आले की आपल्या कानाला छिद्रे होती. यावरून तरुणात जातीयता किती भिनलीं आहे हे दिसून येते, आणि जर संपूर्ण भारतात एकात्मता कायम टिकवायची असेल तर एकसंघ राज्यपद्धती, सर्व नागरिकांना धार्मिक, सामाजिक एकच कायदे सर्वांना समान संधी या गोष्टी अंमलात यावयास हव्या, या गोष्टी नाहीत म्हणून आजचा तरुण असंतुष्ट आहे.





आजची शासन पद्धती आणि नेतृत्व आम्हाला स्वार्थी आणि नालायक आहे असे वाटते. आजचा सुशिक्षित तरुण राजकारणात भाग घेत नाही याचे पहिले कारण तेथे त्याला वाव फार कमी. सुदैवाने संधी मिळालीच तर त्याचा सबंध जुन्या लोकांशी येतो व काही पुरोगामी विचार मांडले की तो म्हणतो, "तुम्ही आजकालची पोरं ! तुम्हाला यातला काय अनुभव ? आमचे केस पांढरे झाले. ते काही उन्हामुळे नव्हे" हे ऐकल्यावर त्यांना असे सांगावेसे वाटते की, मान्य आहे तुमचे केस म्हातारपणी पांढरे झाले पण आजचा आमचा तरुण पहा ! तारुण्यातच त्याचे केस पांढरे व्हायला लागले. मग जास्त अनुभवी कोण ? तुम्ही की आम्ही ? असो राजकारणात तरुणाला प्रवेश मिळाला नाही म्हणजे काही कर्ज काढून तो उद्योगधंद्याकडे वळतो, परंतु तेथेही अपयश आल्यामुळे साध्या नोकरीवर त्याला समाधान मानावे लागते व त्या तुटपुंज्या उत्पन्नावर तो गुजराण करतो. राजकारण आहे केवळ भंकसगिरी. आपलं कसं ठीक चाललंय. राजीव गांधी पंतप्रधान होवो अथवा आणिक कोणी होवो असा निराशावाद तरुणांच्या मनात भिनलेला आहे व त्यामुळे आजची शासनव्यवस्था मुळासकट उखडून टाकावी असे त्याला वाटते व त्यासाठी योग्य मार्ग व मार्गदर्शक न मिळाल्यामुळे तो कधी कधी विध्वंसक वृत्तीचा अवलंब करतो. आज देशात सर्व ठिकाणी चारित्र्यहीनता भ्रष्टता व अकार्यक्षमता दिसून येते. कार्यक्षम माणसे समाजातून खड्यासारखी दूर फेकली जातात व उपेक्षिली जातात. चारित्र्यहीन ध्येयशून्य व अकार्यक्षम माणसे नेतृत्व करतात. हे दृश्य फारच अशान्त करणारे आहे व देशाला अधोगतीला नेणारे आहे. हे सुधारणे अत्यावश्यक आहे व ही सुधारणा आजचे तरुणच करू शकतील.

तारुण्य हा प्रत्येक गोष्टीचा मनावर परिणाम करून घेणारा काळ आहे. एखाद्या वाईट गोष्टीचाही त्याच्या मनावर चटकन परिणाम होतो. त्याला एक वाटते की लोकप्रियतेच्या आणि समृद्धीच्या शिखरावर जाण्यासाठी शिक्षणाचीच गरज आहे. म्हणून त्या जीवनाचा त्याला उबग येतो. आणि मग त्यातच जाता जाता त्यांचे लक्ष रस्त्यावरून भिरभिरत असते. एका बाजूला असलेल्या गलिच्छ झोपड्या ! परदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी हजारो रुपयांचा खर्च मेजवांनीसाठी होतो व बाहेर उभ्या असलेल्या भिकाऱ्याला रखवालदार सोटा दाखवितो. पैसेवाले वैद्यकीय उपचारांसाठी विमानाने परदेशी जातात व एखाद्या स्वातंत्र्य सैनिकाचे प्रेत मात्र रुग्णालयापुढे कुजत पडते. साम्यवादी म्हणवून संपाच्या नावाखाली सामान्य कामगार नागविला जातो व १० रुपये पगारवाढ मागणारा नोकरी गमावून बसतो. परदेशी मुलांना हत्ती भेट म्हणून पाठवितात तर झोपडीतले बालक पाण्यात कालवलेल्या पिठाऱ्या दुधावर भूक भागविते. राष्ट्रीय अधिवेशनासाठी लाखो रुपये खर्च होतात व झोपड्या पडलेल्या निराधारांना फुटपाथशिवाय थारा नसतो. मदतीसाठी गरीब निधी देतो व तो निधी मध्येच गायब होतो. पंढरीच्या विठोबाच्या दर्शनाला पैसे द्यावे लागतात. आधीच उमेदवार निश्चित झालेल्या जागेसाठी चार हजार उमेदवार मुलाखतीसाठी येतात व निराश होऊन परत जातात. अभ्यासात प्रथम आलेला विद्यार्थी परदेशात जाऊन स्थिर होतो व भारताला भिकारी म्हणतो आणि भारताचा नागरिक असल्याची त्याला लाज वाटते हे पाहिले म्हणजे असे वाटते की हाच आदर्श आजचे तरुण–तरुणी डोळ्यासमोर ठेवून वागतील काय ?

❋

---

**वक्तृत्व–प्रचंड सामर्थ्य**

**उत्तम वक्ता होण्यासाठी विषयाची तयारीहि उत्तम पाहिजे. काय बोलायचे हे माहीत पाहिजे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी ना. गोखले ह्यांनी जगड्व्याळ तयारी केली होती. म्हणून ते साऱ्या हिंदुस्थानामधले पहिल्या प्रतीचे वक्ते होऊन बसले होते. समाजवादाचे शिक्षण बहुजन समाजाला देण्यासाठी प्रभावी वक्तृत्वाची फार जरूरी आहे. वक्तृत्व हे आयुष्यातले एक प्रचंड सामर्थ्य आहे. हे सामर्थ्य ज्याच्या जवळ असेल तो मानवाचा नेता होतो असा आजपर्यंत जगातला इतिहास आहे.**

**आचार्य प्र. के. अत्रे**

---

# बाबा आमटे

डी. एस्. बनकर, एम्. ए. ( मराठी ) द्वितीय वर्ष

समाजात अनेक दु:खी पीडित लोक असतात. कुष्ठरोग्यांसारखे समाजाने टाकून दिलेले, उपेक्षिलेलेही लोक असतात. सर्व बाजूने अशा लोकांची कोंडी होते. त्यांना कोणाचाच आधार रहात नाही. रोगग्रस्त असल्याने समाज जवळ करत नाही. कुष्ठरोग असाध्य म्हणून त्यावर इलाज लेला जात नाही. असे जीवन जगणारे कितीतरी लोक कुष्ठरोगाने ग्रस्त झालेले या जगात आहेत, आपल्या देशात आहेत.

दीनदलितांची कुष्ठरोग्यांची सेवा महात्मा गांधींनी केली. कुष्ठरोगी असलेले परचुरे शास्त्री यांची शुश्रूषा गांधीजींनी केली. भगवान येशूने सुद्धा कुष्ठ पीडितांना जवळ केले त्यांना प्रेम दिले. विनोबाजींनी सुद्धा कुष्ठपीडितांना शेती करण्यास प्रोत्साहन देऊन त्यांना नवी जीवनदृष्टी दिली.

दु:खाने पीडित असलेल्या लोकांची सेवा करण्याचे, त्यांच्या जीवनात नवा आनंद देण्याचे फार मोठे कार्य आपल्या देशात श्री. बाबा आमटे करीत आहेत.

बाबा आमटे यांचे पूर्ण नांव मुरलीधर देवीदास आमटे त्यांचा जन्म २६ डिसेंबर १९१४ साली झाला. विदर्भातील श्रीमंत घराण्यात त्यांचे बालपण मोठ्या ऐश्वर्यात गेले. त्यांचे शिक्षण वरोडा व नागपूर येथे झाले. ते अतिशय हुशार होते. 'गीतांजली' हे रवींद्रनाथांचे पुस्तक विद्यार्थी दशेतच त्यांनी वाचले. त्याचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव पडला. त्यासाठी ते बंगाली भाषा शिकले. रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनात गेले. रवींद्रनाथांच्या दर्शनाने जगातील दीनदुबळ्यांच्या बद्दल त्यांच्या मनात करुणा व प्रेम निर्माण झाले. मानवाची सेवा ही ईश्वराची सेवा हा विचार त्यांच्या मनात पूर्णपणे रूजला.

चैनी व विलासी जीवन संपुष्टात येऊन बाबा एका साधकाप्रमाणे जीवन जगू लागले. आत्मोद्धार करण्यास व ईश्वराचा शोध घेण्यास ते हिमालयात गेले. भारतातील सारे आश्रम त्यांनी पायी फिरून पालथे घातले आणि या भ्रमंतीत कळून चुकले की– "तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलासी".

विद्यार्थीदशेत त्यांनी शरीर प्रकृतीकडेही लक्ष पुरविले. त्यांनी शरीर कमावले, कुस्त्यांचे फडही जिंकले. त्यामुळे त्यांची शरीरप्रकृती सुदढ झाली. विद्यार्थीदशेतील वाचन, मनन, चिंतन आणि पुढे गांधीजी आणि विनोबाजी यांचा सहवास त्यांना लाभला. त्यांच्या विचाराने, आचाराने ते अतिशय प्रभावी झाले. त्यांचे जीवन पूर्णपणे बदलले. बाबांनी गांधीजींच्या एकादश व्रताचा स्वीकार केला.

सत्तरीच्या घरात असलेला, कॅन्सरसारख्या दुखण्यांलाही न जुमानणारा मृत्युंजयी वीरपुरुष म्हणजे बाबा आमटे होत. सत्कार्यासाठी सदैव बलिदानास तत्पर असणाऱ्या महापुरुषाला मात्र कुणीही विभूती, युगपुरुष, महामानव आदि नावाने संबोधणे अजिबात आवडत नाही. ते आपल्या एका कवितेत म्हणतात––

'माणूस माझे नाव, माणूस माझे नाव
दहा दिशांच्या रिंगणातही, पुढेच माझी धाव"

सभोवतालचे आपले देशबांधव अज्ञान, दु:ख, दारिद्र्य, दैन्य यात खितपत पडले असतानाच आपणच तेवढा आपला आत्मोद्धार करावा हा विचार त्यांना पटेना. बाबांच्या मनात मानवजातीबद्दल अपार करुणा निर्माण झाली. "स्वत:त रत असलेला अखेर रिता होतो आणि इतरासाठी स्वत: मरणारा तृप्तीने तुडुंब भरलेला असतो" याची जाणीव त्यांना झाली आणि एम्. ए., एल्.एल्. बी झालेल्या मुरलीधर देवीदास आमटे यांनी आपले जीवन मानवतेच्या सेवेसाठी झोकून दिले

बाबांचे शिक्षण झाल्यानंतर प्रारंभी त्यांनी वरोडा येथे काही दिवस वकीली केली. वरोड्यातील नागरिकांची मनोभावे सेवा करू लागले. तत्परतेने निरपेक्ष





मदत करण्याच्या गुणांमुळे ते लोकप्रिय झाले. नगरपरिषदेवर निवडून आल्यावर ते वरोडा नगरपरिषदेचे उपाध्यक्ष झाले. या काळात त्यांनी नगरपालिकेच्या सेवकांचे जीवन जवळून पाहिले. महार, भंगी, अन्य दीनदलितांचे हाल-व्यथा त्यांच्या लक्षात आल्या. घृणा त्यांच्या मनातून निघून गेली आणि त्या ठिकाणी मानव धर्माची स्थापना झाली.

कुष्ठ रोग्यांची सेवाशुश्रूषा करण्याचे व त्यांना नवजीवन देण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. यासाठी त्यांनी कुष्ठरोग व त्यावरील उपचार याचा अभ्यास केला. डॉ. आर. व्ही. वारदेकरांनी कुष्ठरोगावर लिहिलेल्या ग्रंथाचा त्यांनी अभ्यास केला. कलकत्ता येथे जाऊन ट्रॉपिकल स्कूल ऑफ मेडिसीन या संस्थेत कुष्ठरोगासंबंधीचा अभ्यास प्रथम श्रेणीत पूर्ण केला.

पुढे कुष्ठ रोग्यांसाठी स्थापन केलेल्या 'आनंदवन' वसाहतीचा १०० एकर जंगलाच्या जागेत विनोबाजींच्या हस्ते शुभारंभ केला. या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी सौ. साधनाताई, त्यांचे पुत्र डॉ. प्रकाश, डॉ. विकास, आणि त्यांच्या सुना डॉ. मंदा व डॉ. भारती यांचेही संपूर्ण सहकार्य लाभले. अशाप्रकारे सर्व कुटुंबाने परंपरागत व्यवसायाच्या शिक्षणात प्रावीण्य मिळवून ग्रामीण विभागात सर्वांनीच समाजकार्यास वाहून घेऊन सतीचे वाण घ्यावे असा परिवार दुर्मिळ. त्यांनी घेतलेले हे व्रत पाहिले की सावरकरांच्या त्या ओळींची प्रचीती येते.

की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेचे
लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने
जे दिव्यदाहक म्हणोनि असावयाचे
बुद्ध्याची वाण धरिले करि हे सतीचे

या जंगलमय प्रदेशात कुष्ठरोग्यासाठी त्यांनी आश्रम सुरु केला आहे. हाताचे खुंट पसरून भीक मागणारे हात एकरी ऐंशी मण धान्य पिकवू लागले पोल्ट्रीफार्म तयार केले, सर्व जंगल हळूहळू लोप पावून सर्व परिसर फळे, फुले, वृक्ष, वेली, भाजीपाला यांनी बहरून आला. सर्व दृष्य नंदनवनासारखे दिसू लागले. १९५४ साली 'सर्व्हिस सिव्हल इंटरनॅशनल' या संस्थेच्या श्रमपथकाने आनंदवनात दोन पक्त्या इमारती स्वत: श्रम करून बांधून दिल्या. अशा प्रकारे, कुष्ठरोग्यांना समर्थ जीवन जगण्याची प्रेरणा देऊन कुष्ठरोग्यांना नवे जीवन दिले.

बाबांनी वनाचे रूपांतर आनंदवनात केले. त्यातून अनेक सेवाभावी संस्था व कार्यकर्ते निर्माण झाले. आनंदवनात त्यांनी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. कुष्ठपिडितांच्या मुलासाठी बालवाडी सुरू केली. कुष्ठपीडितांना होणाऱ्या परंतु रोगमुक्त असणाऱ्या मुलासाठी गोकुळ ही शाळा सुरू केली. आर्टस्, सायन्स, कॉमर्स व ॲग्रिकल्चरल महाविद्यालये सुरू केली. अंध, अपंग, दुर्बल मनोरुग्ण, मूकबधिर, अपघातग्रस्त यांना उपचाराची व व्यवसाय शिक्षणाची सोय संधिनिकेतन या संस्थेद्वारा उपलब्ध करून दिली. कुष्ठरोग्यांना रोगमुक्त झाल्यावर स्वतंत्र व्यवसाय करता यावा म्हणून त्यांच्यासाठी अनेक व्यवसाय शिक्षणक्रम सुरू केले.

कुष्ठरोगापासून मुक्त झालेल्या पण समाजाने ज्यांचा स्वीकार केला नाही व ज्यांना स्वेच्छेने राहायचे आहे अशा लोकासाठी मुक्तिसदन सूरू केले. ग्रामीण भागातील आदिवासींना मदत करण्याच्या दृष्टीने 'लोकबिरादरी' चा उपक्रम सुरू केला.

आपल्या देशातीलच नव्हे तर परदेशातीलही अनेक नामवंत लोक आनंदवनास भेट देतात व तेथील कार्य पाहून भारावून जातात; आणि आनंदवन हे आनंदाचे सुखाचे प्रत्यक्ष दर्शन आहे, माणुसकीच्या साध्या तत्वावर आधारलेले पण विज्ञानाची जाणीव ठेवून असलेले एक केंद्र आहे. ही योजना बाबांनी भान राखून आखली व बेभान होऊन ती साकार केली आहे.

इ. स. १९६७ साली 'सोमनाथ प्रकल्प' सुरू केला. वरोड्यापासून १०० कि. मी. अंतरावर सोमनाथ येथे 'श्रमिक विद्यापीठाची' कल्पना साकार झाली. या ठिकाणी अपंग व दुर्बल मुलांना व्यावसायिक प्रशिक्षणाची सोय केली. तेथील १३०० एकर पडीक जमिनीतील जवळ जवळ ६०० एकर जमीन शेतीखाली आली आहे. अत्याधुनिक शेतकी यंत्र वापरून तेथे शेती केली जाते. शेती व्यवसायास पूरक असे अनेक जोडधंदे तेथे चालू आहेत.

दरवर्षी मे महिन्यात सोमनाथ येथे आंतरभारतीतर्फे १०० युवकांची छावणी भरते. 'भारत जोडो' या महामंत्राने भारून जाऊन सारे एकदिलाने, एकात्मतेच्या

भावनेने श्रमदान करून रचनात्मक कार्य करतात. त्यासाठी दरवर्षी साऱ्या देशांतील तरुण सहभागी होतात.

वाबांची ही गरुड भरारी मनोमन पहात असताना रोगमुक्त झालेल्या आनंदवनातील ध्येयधुंद तरुणांचे गीत कानाला सुखवीते मंत्रमुग्धही करते. आनंदवनाचे आव्हान बनून हे गतीचे गीत आपणासमोर येते—

शृंखला पायी असू दे मी गतीचे गीत गाई
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही ।। धृ ।।
पांगळ्यांच्या सोबतीला येऊ द्या बलदंड बाहू
निर्मितीच्या मुक्तगंगा, द्या इथे मातीत वाहू ।।

आपल्या देशाच्या आजच्या परिस्थितीचा बाबांनी गंभीरपणे विचार केला आणि त्यांनी "भारत जोडो" ची योजना पुढे मांडली. दि. २४ डिसेंबर १९८५ या पूज्य साने गुरुजींच्या जन्मदिनी युवकांची सायकल फेरी कन्याकुमारी पासून बाबांच्या प्रेरणेने सुरू झाली असून ती भारतभर भ्रमण करणार आहे.

बाबांनी केलेले हे प्रचंड कार्य आहे. त्याचे वर्णन शब्दांनी करणे अवघड आहे. प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहण्यातच त्यातील आनंद अनुभवता येतो त्याची भव्यता लक्षात येते.

मानवतेची सेवा करणाऱ्या बाबांना उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य लाभो ही प्रार्थना.

★

*With Best Compliments from*

**POONA CHEMICAL LABORATORY**

**207 Mangalwar Peth,**

**Poona 411 011.**

28899

*Manufacturers of fine Chemicals.*



# संयुक्त महाराष्ट्र : स्वप्न आणि साफल्य

**आनंदराव कदम,** एस्. वाय्. बी. ए.

मराठी भाषिकांचे दीर्घ काळाचे स्वप्न साकार झाले ते १ मे १९६० या दिवशी. या दिवशी मराठी भाषिकांच्या 'महाराष्ट्र' राज्याची स्थापना झाली. मुंबई या त्रिभाषिक राज्यात गुजराती, मराठी, कन्नड या भाषा बोलणारे लोक होते. या राज्यात कोणत्याही प्रदेशाचा व लोकांचा समान विकास साधला गेला नाही. मराठी भाषिकांवर तर यावेळी खूपच अन्याय होत होता. महात्माजींच्या भाषिक तत्त्वावर राज्याची स्थापना करण्याच्या विचारांना गती येऊ लागली. तत्कालीन केंद्र सरकारने भाषिक तत्वावर महाराष्ट्राची निर्मिती करण्यास विलंब लावण्याचे धोरण ठेवले पण संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मराठी भाषिकांनी जो अभूतपूर्व लढा दिला. त्यामुळे सरकारला महाराष्ट्राची निर्मिती करावी लागली.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती व्हावी अशी मागणी स्वातंत्र्यापासून होती. महाराष्ट्र प्रत्यक्षात जरी अस्तित्वात नव्हते. तरी प्रत्येक मराठी जनतेच्या मनात व हृदयात या राज्याची निर्मिती झाली होती. मराठी भाषिकांची स्वतंत्र अस्मिता टिकविण्यासाठी स्वतंत्र मराठी राज्याची आवश्यकता भासत होती. मराठी जनतेच्या या उत्कट भावनांना एकत्र आणून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी मराठी भाषिक लोकात एकमत होते.

सत्तारूढ काँग्रेस पक्षाची मंडळी ही सत्तेत सहभागी असल्याने महाराष्ट्र निर्मितीच्या आंदोलनास त्यांचा विरोध होता. किंबहुना जरी त्यांच्या मनापासून विरोध नसला तरी त्यांना श्रेष्ठीच्या दडपणामुळे ही मागणी उचलून धरता आली नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी योग्य वातावरण तयार करण्याची फार मोठी कामगिरी साहित्यिकांनी व वृत्तपत्रांनी केली. जनतेत जागृती व स्वाभिमान निर्माण करण्याचे फार मोठी जबाबदारी साहित्यिकांनी बजावली आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी 'संयुक्त महाराष्ट्र समिती' ही स्थापन करण्यात आली. जवळजवळ सर्वच विरोधी पक्ष या समितीत सामील झाले. काँग्रेस मधील काही लोक या समितीच्या नेतृत्वाखाली आंदोलनात सक्रियपणे उतरले.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचे सारे श्रेय संयुक्त महाराष्ट्र समितीला द्यावे लागेल. आचार्य अत्रे, एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे, जयवंतराव टिळक या नेत्यांनी समितीचे नेतृत्व अत्यंत तडफदारपणे केले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मराठी जनतेला फार मोठा लढा द्यावा लागला ते सहजासहजी मिळाले नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात एकशे पाच लोकांना हुतात्मे व्हावे लागले या हुतात्म्यांच्या रक्तातून मराठी जनतेच्या शांततामय लढ्यातून निर्माण झालेल्या या महाराष्ट्राचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे

महाराष्ट्राची निर्मिती करण्यापाठीमागे संस्कृतिक भाषिक, प्रादेशिक संलग्नता साधली जावी हे हेतु असले तरी मुख्य हेतु आर्थिक विकास हवा होता. त्रिभाषिक मुंबई राज्यात गुजराती भाषिकांचे वर्चस्व जास्त होते. आर्थिक विकासाच्या बाबतीत मराठी भाषिकांवर व प्रदेशावर अन्याय होत होता. यातूनच विकासाचा असमतोल झाला. मराठी प्रदेशाचा व मराठी भाषिकांचा सर्वांगीण विकास साधने हे स्वप्न महाराष्ट्राच्या निर्मिती मागे होती. राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करावा ही अपेक्षा होती. सर्व मराठी प्रदेशाचा समान विकास साधला जाईल. अशी स्वप्ने महाराष्ट्राच्या निर्मितीमागे होती.

१९८५ हे महाराष्ट्र राज्याचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. हा रौप्य महोत्सव साजरा करीत असतानाच आपण महाराष्ट्राच्या निर्मितीमागची स्वप्ने प्रत्यक्षात आली आहेत काय ? याचा गंभीरतापूर्वक विचार केला पाहिजे. महाराष्ट्राच्या निर्मितीला २५ वर्षे पूर्ण झाली. हा रौप्यमहोत्सव आपण मोठ्या थाटाने महाराष्ट्रभर साजरा केला. विद्युत रोषनाई व इतर

आतषबाजी केली. पण हा आनंदी दिन साजरा करीत असताना आपण आपल्या २५ वर्षांच्या प्रगतीचा आढावा घेणे आवश्य आहे.

महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी महाराष्ट्रातील अनेक विभाग हे मागासलेले होते. विदर्भ, मराठवाडा, कोकण हे भाग अत्यंत मागासलेले होते. शेतकरी, शेतमजूर यांची स्थिती वाईट होती. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सर्व विभागांचा समान विकास साधला जाईल अशी अपेक्षा होती. परंतु अजुनही हे भाग मागासलेलेच आहेत. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या विकासाला फार मोठा हातभार लावला व आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मोलाचे प्रयत्न केले. राज्यात सहकारी चळवळीचा पाया त्यांनी घातला. सहकारी चळवळ महाराष्ट्रात जोर धरू लागली. साखर कारखाने हे महाराष्ट्राचे भूषण झाले. पण हा सर्व विकास फक्त पश्चिम महाराष्ट्रापूरताच मर्यादित राहिला. विदर्भ, मराठवाडा, कोकण या प्रदेशाकडे दुर्लक्ष झाले असेच म्हणावे लागेल.

२५ वर्षांनंतरही आज महाराष्ट्राला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. बेकारीचा प्रश्न हा राष्ट्रीय स्तरावरील असला तरीही महाराष्ट्रात बेकारीचे स्वरूप भयानक आहे. ओद्योगिक विकासाच्या बाबतीत आपण भरीव प्रगती केली असली तरी औद्योगिक विकास हा मुंबई, ठाणे या शहरापुरताच मर्यादित राहिला आहे. मराठवाडा, विदर्भ, कोकण या भागात औद्योगिक विकास आवश्यक तेवढा झाला नाही. त्यामुळे तेथे बेकारीचे प्रमाण फारच मोठे आहे. राज्यात बडे म्हणजे मूलभूत उद्योगधंदे स्थापन झाले नाहीत. अशा प्रकारे बेकारीवर मात करण्यास व औद्योगिक विकासाचा समतोल साधण्यास आपणाला यश आले नाही.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा अत्यंत जिव्हाळचाचा प्रश्न म्हणजे पाण्याचा प्रश्न महाराष्ट्रात गेल्या २५ वर्षात अनेक पाटबंधारे योजना आखल्या गेल्या परंतु तरीही जास्तीत जास्त जमिनीला पाटबंधाऱ्याचे पाणी पुरविण्यास अद्याप यश आलेले नाही. ज्या योजना झाल्या त्या काही विभागापुरत्याच मर्यादित झाल्या. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न योग्यपणे झाले नाहीत.

हरिजन, शेतमजूर, आदिवासी या खालच्या स्तरावरील लोकांचे प्रश्न तर अत्यंत गंभीर आहेत. त्यांच्या या प्रश्नाची जाणीवपूर्वक सोडवणूक गेल्या २५ वर्षात योग्य त्या गतीने झाली नाही. आदिवासींच्या कल्याणाकडे जरी लक्ष देण्यात आले तरीही योजनांची फळे त्यांच्यापर्यंत पोहचू शकली नाहीत. शेतमजूर, हरिजन वर्ग हा उपेक्षित असलेला वर्ग २५ वर्षांच्या काळातही उपेक्षीतच राहिला आहे. शैक्षणिक क्षेत्रात महाराष्ट्राने भरीव प्रगती केली आहे. महाराष्ट्रात महाविद्यालये, माध्यमिक शाळा, इंजिनिअरिंग कॉलेजेस, कृषि विद्यापीठ मेडिकल कॉलेजेस इ. संस्था भरमसाठ वाढल्या परंतू तरीही समाजातील खालच्या थरातील मुलांना शिक्षणाची संधी आर्थिक अडचणीमुळे मिळू शकलेली नाही. शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता व दर्जा फार चांगला आहे असेही म्हणता येणार नाही. संस्थात्मक वाढ झाली. परंतू गुणात्मकता वाढली नाही. म्हणूनच आज मराठी माणूस कोणत्याही स्पर्धेत इतर प्रदेशाच्या मानाने फारच पाठीमागे आहे.

वरील प्रकारे गेल्या २५ वर्षातील महाराष्ट्राच्या प्रगतीचा आढावा घेतला तर असे दिसते की, महाराष्ट्राच्या निर्मिती मागचे स्वप्न प्रत्यक्षात आले आहे असे म्हणने धाडसाचेच ठरेल. महाराष्ट्राचे हे वास्तव चित्र आहे. आपण नेमके कोठे आहोत याची जाणीव मराठी जनतेला अजूनही झालेली नाही. तुलनात्मक दृष्टिकोणातून विचार केला तर आपण खूपच मागे आहोत.

महाराष्ट्राचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत असतानाच आपणाला पुढील अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे. ही आव्हाने स्वीकारली नाहीत तर महाराष्ट्राला अवकळा येईल. समान विकासातून समानता निर्माण करण्याचे प्रयत्न करावे लागतील तरच संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात येण्यास मदत होईल.

★





# तिरुपती दर्शन

कु ज्योती मरकळे, टी. वाय्. बी. ए.

एका उमलणाऱ्या पहाटे तिरुपतीला जायचं ठरलं. आणि सकाळी जणू काही गुलाबाची कळी मोहकपणे वेडावून हसते आहे असच जणू वाटलं. आम्ही अती उत्साहाने निळसर पहाट असतानाच उठलो. पण पहाटेवर लज्जेचा लालिमा चढून कोवळी सूर्यकिरणं ओल्या केसांच्या बटांवर कधी खेळ लागले हेच कळलं नाही. आणि मग सगळीच लगभग वाढली. निळ्या ओढण्या लेवून जायच्या विचारात असणाऱ्या आम्ही निसर्गाने बहाल केलेल्या पिवळ्या ओढण्या परिधान करून प्रसिद्ध तिरुपती शहराची वाट मुग्ध आणि अनोख्या विचारांच्या वावटळीत पार करू लागलो.

निसर्गाच्या मुक्त अविष्काराचा ठायी ठायी प्रत्यय येऊ लागला. गाडी घाट चढू लागली. आमचं मन तर केव्हाच घाट चढू लागलं होतं. खरच ! त्या घाटात मुक्तपणे शब्दात वर्णन करून केवळ अशक्य आहे. निसर्गाच्या सौंदर्याचा मुक्तपणे अविष्कार मी जणु काही पहिल्यांदाच पहात होते. वारंवार मन भुलावण्या घेत भोवऱ्यासारखं फिरत होतं, तर मधेच पतंगासारखं उंच झेपावत होतं. माझ्याच मनाला आळा घालण्यासाठी माझे हात असमर्थ ठरत होते. पण असं मन वेडावून जाण्याने देखील मी वारंवार मोहरत होते. आणि यावेळी माझ्या मनात सहज विचार आला की माणसाचं आणि निसर्गाचं किती जवळचं नातं आहे ! अगदी माणसा माणसाचं असतं त्यापेक्षाही कितीतरी जवळचं. माणसाच्या मनावर निसर्गाच्या नुसत्या दर्शनाने इतका खोलवर परिणाम होत असेल असं मला यापूर्वी तरी वाटलं नव्हतं, पण असो, असं झालं होतं खरं.

एका बाजूला दोन डोळे अपुरे पडतील असे उंच उंच सुंदर काळेपणा लाभलेलं कातळ. अगदी एकसंघ, कोठेही दगडाचा अपुरेपणा, तर दुसऱ्या बाजूला खोलवर हिरवीगार आपले पदलालित्य उमटवीत खोलवर फुललेली रानफुले वाऱ्याच्या झुळकीने हळूच डुलवीत आपल्या अंगाखांद्यावर दिमाखाने नाचवीत असलेली सुंदर पण तरीही पाहताक्षणीच हृदयात खोलवर खड्डा पाडणारी दरी आणि या दोहोमधून चालणारा काळाकुळकुळीत डांबरी रस्ता, पोटातील पाणी देखील न हालता आमचा प्रवास चालला होता.

निसर्गाचं हे मुक्त सोंदर्य पहायला दोन डोळे अपुरे आहेत असच सारखं वाटत होतं. मनाची कविकल्पना सारखी घिरट्या घालत होती. मधेच बालकवींच्या कविता आठवत होत्या, तर ना. धो. महानोरांचा रानमेवा चाखावासा वाटत होता.

या सर्वाची अनुभूती घेत असतानाच मित्र-मैत्रीणींच्या 'आलं आलं' या गलक्याने माझी कविकल्पना क्षणभर फुलपाखराभोवतीच रिंगण घेत राहिली आणि कुणीतरी पायाला दोरा बांधल्याने फुलपाखराची अवस्था क्षणभर तडफडल्यासारखी झाली.

प्रथम उंच प्रवेसद्वार नजरेसमोर आलं. तिरुपती शहरात प्रवेश करण्यासाठी खास केले होते. आम्ही आम्ही आत गेलो आणि त्याच वेळी कानावर धीरगंभीर आवाजात मंत्रघोष आणि वेदघोष ऐकू आला. अगदी कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. खरी भारतीय भूमी ती हीच असावी असही क्षणभर वाटून गेलं. त्या पवित्र वातावरणात भारावल्या अवस्थेत आम्ही पुढं पुढं सरकू लागलो.

मी N. S. S. तर्फे गेले असल्यामुळे आम्हाला देवाचं दर्शन विनामूल्य होतं, पण इतरांना मात्र प्रत्येकी २५ रु. दर होता. देवस्थान श्रीमंत होतं यात शंकाच नव्हती. पण साधं देवाचं दर्शन घ्यायला सुद्धा पैसे पडावेत ना ! माझं मन क्षणभर विषण्ण झालं. मी सगळ्या गर्दीकडे एकवार पाहिले. सगळेजण पैसे भरूनच आले होते. पैसे भरल्याने यांना सगळ्यांना देव भेटेल का ? इतक्या लांबून आपण प्रवास खर्च करून तरी का येतो ? परत डोळे भरून देव पाहण्यासाठीच

ना ! या लोकांना कधी कळणार आहे कुणास ठाऊक ? प्रवेशद्वाराजवळ असलेल्या भिकाऱ्यांनी तरी देवाचं दर्शन घेतलं आहे की नाही कोणास ठाऊक, ते तर इथले रहिवासीच पण त्यांची २५ रु. भरण्याची ऐपत नाही म्हणून त्यांना देवाचं दर्शन नाकारलं जातं. किती समतोल न्याय आहे पहा ! आणि तोही देवाच्याच दारी. चालायचंच ! पण मला प्रामाणिकपणे वाटतं की श्रद्धा असेल तर पैसे भरून तरी देवाला जाऊ नये, कारण जिथे पैसा येतो तिथे श्रद्धा नष्ट होत जाते आणि केवळ कर्तव्यबुद्धी उरते. इतर जातात म्हणून मी जातो. केवळ प्रतिष्ठेसाठी किंवा आपल्याकडून काही चुकू नये. काही वाईट घडलं तर, हे केलं नाही म्हणून ठपका येऊ नये एवढीच भावना त्या पाठीमागे उरते. देवाविषयीच्या आत्मिक भावनेला थारा उरत नाही.

आणि एवढे पैसे भरूनही देवाला डोळे भरून हृदयात साठवून ठेवता येत नाही. नारळ आपटावा तसं देवांपुढे पुजाऱ्याने ( स्वतःच्या हाताने ) धरून एकदा डोकं आपटलं की दोन मिनीटात तिथून रवानगी. ही दर्शन घ्यायची रीत झाली आणि तेही पैसे भरून बरं का ! जाऊ द्या झालं. शेवटी देव जोपर्यंत जागा होत नाही तोपर्यंत हे असंच चालणार दिसतंय.

देवाचं दर्शन घेऊन दुसऱ्यानी वाहिलेल्या दागिन्यांनी नखशिखांत मढविलेली मूर्ती पाहून आम्ही बाहेर आलो. प्रसाद घेतला तोही विकत, आणि निघालो.

सगळीकडे एक विचित्र दृश्य दिसू लागलं. निदान मला तरी ते विचित्र वाटलं. कारण तिथे या गोष्टीची सवय असावी. स्त्री–पुरुष दोघांनीही आपल्या केसाचं मुंडन करून घेतलं होतं. डोक्यावरील संपूर्ण केस काढून टाकले होते. मी एकीला विचारले, तर ती म्हणाली देवासाठी आणि श्रद्धा म्हणून.

मी परत मनाशी तेच वाक्य उच्चारलं. देवासाठी श्रद्धा म्हणून, जे सुंदर आहे ते कुरूप करायचं, का तर देवासाठी, त्यादे सांगितलेले नसताना देखील. जे आपण देवाची देणगी म्हणून आनंदाने स्वीकारतो त्याचा असा आपल्याच हाताने नाश करायचा ! किती वेडी श्रद्धा !

माझं तर असं ठाम मत आहे की देवाला जर डोळे असते म्हणजे देव आहे असं मानलं तर त्याला डोळे असणारच, पण हेच डोडे उघडून त्याने जरा डोळस नजरेने या मुंडन केलेल्या जमावाकडे एक जरी दृष्टिक्षेप टाकला तरी त्याने लागलीच आपले डोळे मिटून घेतले असते. पुन्हा न उघडण्यासाठी. आपणच निर्माण केलेल्या नैसर्गिक सुंदरतेची आपल्याच खोट्या नावाचा वापर करून मानवाने चालवलेली दारुण शोकांतिका पाहून त्याच्या मनाला खचितच वेदना झाल्या असत्या. मला त्या बिचाऱ्या देवाची अतिशय कीव वाटते.

तिरुपतीची बाजारपेठ मात्र अतिशय देखणी व सुंदर आहे. सुबक हस्तिदंती मूर्ती, निरनिराळ्या कलात्मक वस्तु यांचा नुसता खच होता. पण तिरुपतीच्या लोकांच्या व्यापारी मनोवृत्तीचं करावं तेवढं कौतुक थोडच आहे. भोळ्या लोकांनी वेड्या श्रद्धेपायी दान केलेल्या केसांचाच सुंदर गंगावनाचा व्यापार मांडलेला आपल्याला दिसून येतो. यावरून आपणच मनाशी विचार केलेला बरा.

मघाचाच प्रवेशद्वार दृष्टिपथात आलं. पण येतानाचा मनाचा मोहोर काही प्रमाणात का होईना पण पिकली पाने गळून पडावीत तसा अलगद गळून पडला आहे. 'चाफा चालेना, चाफा बोलेना, काही केल्या चाफा हसेना' ही कवी बी यांची कविता आठवली पण किती वेगळ्या अर्थाने.

भारत हा किती विविधतेने नटलेला देश आहे. मनोमय खात्रीच पटली. महाराष्ट्र आणि आंध्र दोन दिवसाचं अंतर पण या दोन दिवसाच्या प्रवासात किती जमीन आस्मानाचं अंतर आहे. एकाच देशातील दोन प्रातात संपूर्ण मानवी संस्कृती, मानवी जीवनच बदलल्याचं दिसून येतं. भाषा, पेहराव, आहार सर्व गोष्टीमधे मिळता पण एक मात्र खरं आहे भारतातील माणूस हा एकाच गोष्टीनें समान आहे, ती गोष्ट म्हणजे श्रद्धा, मूर्तिपूजा आणि अवास्तव देवभोळेपणा या गोष्टीने भारतीय माणसाची मग कोणत्याही गोष्टीवर चटकन श्रद्धा बसते. मूर्तीपूजा त्याला प्रिय आहे. आणि देवाने सांगितले या समजुतीने गोष्ट करायला मागेपुढे पहात नाही. या दृष्टीने आम्ही भारतीय एक आहोत.

भाषेचा प्रश्न मात्र फार मोठ्या प्रमाणावर दिसून आला. आंध्रमध्ये हिंदी राष्ट्रीय भाषा असून देखील तिचा पाहिजे त्या प्रमाणात वापर दिसून येत नाही. इंग्रजीचे ज्ञान यथातथाच, त्यामुळे सुसंवाद साधणे अतिशय कठीण होऊन बसते आणि या गोष्टीचा अनुभव मला दहा दिवसात चांगलाच आला. त्यामुळे अनेक गमती–जमतीही घडल्या. पण मात्र अतिशय प्रामाणिकपणे वाटत की संपूर्ण भारतात जर एकच भाषा अस्तित्वात आली तर भाषणबाजीमध्ये वापरून ठिसूळ झालेली राष्ट्रीय एकात्मता व्हायला अजिबात वेळ लागणार नाही. पण संपूर्ण भारतामध्ये एक भाषा काही होणार नाही त्याला कारणही आपणच. मग राष्ट्रीय एकात्मता तर दूरच.

असो, आहे ते ठीक आहे. पण वरवर भव्य सुंदर आणि श्रीमंत दिसणारं हे देवस्थान माणसांनीच आपल्या व्यापाराचं कसं केंद्र बनवलं आहे, हे तिथं जाऊन डोळस दृष्टीने बघितल्याशिवाय कळणार नाही. कारण तसे दररोज हजारो लोक निरनिराळ्या प्रांतातून तिथे येत असतातच, पण ते वेगळं. कारण ते त्यातलेच बनून येत असतात. पण आपल्याला मात्र त्यातले बनून वेगळं जगायचंय. कारण या सर्व गोष्टींचा डोळसपणे विचार केल्याशिवाय हे होणार नाही. आपणही या प्रवाहातलेच एक बनलो तर हे जगाच्या अंतापर्यंत असंच चालत राहणार, जसं आजपर्यंत चाललं.

★

**मायावी माघ**

**माघाचा महिना लागला. सकाळची उन्हे वाढीस लागली आहेत. पण झाडांच्या सावल्या पाने गळतीस लागल्यामुळे पूर्वीसारख्या भरदार राहिलेल्या नाहीत. हवा कुंद व धुंद आहे. धुक्याचा रंग सर्वत्र भरून राहिला आहे. झाडांच्या उघड्या बोडक्या फांद्या, पानांचे तपकिरी पिवळ्या छटांचे विशीर्ण रंग, तो भकास सुकेपणा, एक प्रकारचा चमत्कारिक अस्ताव्यस्तपणा, कुठेही पाहा, तुम्हाला दिसेल. तरीपण थंड वातावरणामुळें उन्हे अधिक आल्हाददायक वाटू लागल्यामुळे एकंदर देखावा उदास वाटत नाही हे खरे. थंडीच्या उत्तेजकपणामुळे ही विशीर्णता, उत्तरोत्तर वाढत जाणारी शुष्कता, पुढे येणाऱ्या वसंत वैभवाची पार्श्वभूमीच होय. हे मनाला आतून सारखे जाणवत असते.**

**–दुर्गा भागवत**

*With Best Compliments from*

**CENTRAL BOOK DEPOT**

**658 Narayan Peth,**
**Appa Balawant Chowk,**
**Pune – 411 030.**

# कोलाहल

**अशोक आटोळे, एस्. वाय्. बी. कॉम्.**

सन १९७२ चे वर्ष सर्वत्र दुष्काळी कामे सुरू होती. रावणगावपासून किमान २ कि. मी. अंतरावर पाझर तलावाचे काम चालू होते. लोक लवकर घरची कामे संपवून डोक्यावर पाटी, खोरे घेऊन यंत्रासारखी एकामागे एक धावत होती. सकाळी आठ वाजता कामावर हजर रहाण्याचा मुकादमाचा हुकूम होता.

गंगू त्या गावातच रहात होती. तिची गवताची झोपडी गावाच्या एका बाजूला होती. तिने आजपर्यंत फार कष्ट सोसले होते. आला दिवस कसातरी घालवीत होती. लग्न झाल्यावर अवघ्या तीनच वर्षांनी परमेश्वराने तिच्या पदरी वैधव्य दान केले तिचा पती पाटलाच्या चाकरीवर होता. संसार फारसा नसला तरी थोडा बहुत सुखी होता. तिला त्यातच सुख वाटे, पण अचानक देवाने तिच्या पतीला तिच्यापासून कायमचे हिरावून घेतले. तिला आभाळ फाटल्यासारखे वाटले. आता जगण्यात तरी काय अर्थ एवढ्यापर्यंत तिच्या मनात विचार आले. पण समोर बसलेल्या काशाला पाहून तिने विचार केलेला होता. तरी आजयर्यंत त्याच्यासाठीच कष्ट काढून जगत होती.

गंगूने घरातील पसारा आवरला व दोन वर्षाच्या काशाला घेऊन ती तळ्यावर निघाली. तिला घरूनच निघण्यास वेळ झाला. त्यामुळे वाटेत तिला कोणीच दिसेना ती झपाझपा पावले टाकीत होती. रात्रीपासून पोटात अन्नाचा कण नसल्यामुळे तिला भोवळ आल्यासारखे होत होते. ती स्वतःला सावरीत पाय ओढत चालत होती. एकदाची ती तळ्यावर गेली व हजेरी न झालेली ऐकून तिला हायसे वाटले.

एवढ्यात एकजण ओरडला, "सुकडी आली ! सुकडी आली !" सर्व कामे जागच्या जागी थांबली व लोक निंबाच्या झाडाखाली पळाले. सायकलवरून सुकडीवाला आला व त्याने सुकडीचे पोते सोडले. सर्वांच्या अगोदर गंगू गर्दीतून बाहेर आली व धोतराच्या एका कोपऱ्यात सुकडी बांधली.

सर्वांना सुकडी वाटल्यावर लोक आपापल्या कामाला लागले. गंगूने पाहिले, सुकडीचे अर्धे ठिके शिल्लक होते. गंगूने कशाचे तरी निमित्त केले व ती सरळ दूर रस्त्याने पुढे गेली. तिला वाटत होते एवढ्या सुकडीमधून थोडी सुकडी देण्यास तो नाही म्हणणार नाही सुकडीवाला जवळ आला तशी ती उठून रस्त्यावर आली व म्हणाली, "साहेब, मला थोडी सुकडी द्या की." सुकडीवाला सायकलवरून उतरला तशा गंगूच्या आशा बळावल्या. "तुम्हाला सुकडी नाही मिळाली ?" असे म्हणून तो पोते सोडू लागला, "मिळाली पण आणखी थोडी हवी आहे. मी दोन दिवसापासून उपाशी आहे, मी गरीब आहे, माझ्या मुलाच्या पोटात अन्नाचा कण नाही". एवढ्यात त्याच्या चेहऱ्यावरचे भाव एकदम बदलले व तो म्हणाला, "दोन वेळा सुकडी देता येत नाही" व तो निघून गेला. हे शब्द गंगूच्या कानात विषासारखे भिनत गेले. तिला उकळलेले तेल कानात ओतल्याप्रमाणे झाले. ती डोळे मिटून खाली बसली. डोळे उघडल्यावर पाहिले, सुकडीवाला दूर निघून गेला होता. ती उठली व तळ्यावर जाऊन माती उचलू लागली.

इकडे सुकडीवाला पाटलाच्या वाड्यावर गेला. पाटील दारातच सुपारी कातरीत बसला होता. पाटलाने सुकडीवाल्याचे स्वागत केले. त्यांच्या बराच वेळ गप्पा झाल्या, चहा पिऊन झाल्यावर तो निघाला. व सुकडीच्या ठिक्याकडे पाहून म्हणाला, "पाटील सुकडी ठेवून घ्या, नाहीतर मी हे ओझे कोठे नेऊ ?" ते ऐकून पाटील चेहऱ्यावर प्रश्नार्थक भाव आणून म्हणाला, "मी काय करू ठेवून, कोणी खात नाही.". "जनावरे तरी खातील की" असे म्हणत तो ओझे ठेवून निघून गेला. पाटलाने गड्याला बोलावून सुकडी म्हशीपुढे ठेवण्यास सांगितले.

संध्याकाळी पाचच्या सुमारास धापा टाकत लोक गावाकडे निघाले. गंगूनें काश्याला कडेवर घेतले व



सर्वांच्या पाठीमागून गावाकडे निघाली जोराचे वारे वाहू लागले तसा तिचा तोल जाऊ लागला. ती पाय ओढत ओढत चालत राहिली. तिचे डोळे एकदम चमकले. रस्त्यावर पन्नास पैशाचे नाणे दिसले. तिने बाजूला पाहून ते नाणे उचलून घतले. आता तिची पावले झपझप पडू लागली. तिच्या मनात विचारांची चक्रे फिरू लागली. समोरून काळेकुट्ट ढग आकाशात झेपावत होते. ढगांनी आकाशात गर्दी केली.

घरात येऊन गंगूने दिवा लावला. काशाला खाली बसविले व ती पाटलिणीकडे दूध आणण्यासाठी गेली. वाड्यात शिरताच म्हशीच्या समोर सांडलेल्या सुकडीवर तिची नजर गेली ती तशीच पुढे गेली व पाटलिणीकडून पंचवीस पैशाचे दूध घेतले. घरी येऊन दूध पातेल्यात ओतले ती वाण्याच्या दुकानात गूळ आणण्यासाठी गेली गुळाचा खडा घेऊन ती घराच्या वाटेने चालू लागली. माझा काशा आवडीने दूध-गूळ सुकडी खाईल. या आनंदात ती घरी आली. चार काटक्या गोळा करून चुलीत कोंबल्या व जाळ लावला. बाहेर विजा कडाडत होत्या. जोराचे वारे वहात होते. ती पातेले घेण्यास गेली व एकदम थबकली. पातेले रिकामेच होते. तिने वळून पाहिले तर मोत्या जिभा चाटत दारात उभा होता. तो शेपटीचा गोंडा चाळवत होता. गंगूने पुड्यातील गुळाचा खडा मोत्याच्या दिशेने भिरकावला व वेड्यागत ओरडली, "खंड्या, तू पण माझी परीक्षा बघतोस". तिला भोवळ आली व ती बेशुद्ध पडली.

जेव्हा शुद्धीवर आली तेव्हा पहाते तो काशा शेजारी रडत होता. शेजारणी कडेने घोळका करून बसल्या होत्या. पाऊस पडत होता, वारे शांत झाले होते. मोत्या गुळाचा खडा घेऊन फरार झाला होता. गंगूला शेजारणीने भाकरी घातली व काशाला घेऊन अंथरूणावर पडली व विचार करू लागली. पावसामुळे उद्यापासून तळे बंद होणार होते. या विचारातच तिचा डोळा लागला.

# ठेविले अनंते..... !

**कु. कल्पना बाळासाहेब पवार, टी. वाय्. बी. ए.**

'ठेविले अनंते तैसेचि रहावे......' अभ्यासात मूड लागतो न लागतो तोच उजवीकडून जगतापबाईंचा आणि डावीकडून कदमांचा रेडिओ रात्रीच्या साडेदहाची पुणे केंद्राची 'आपली आवड' (झोपेचा विमोड) कोकलू लागला. कोणत्या खटचाळ श्रोत्यांना आवडत असेल तो अभंग कोणास ठाऊक; पण त्याने माझ्या अभ्यासाचा मूड घालवून मला खूप दूरच्या भूतकाळात ढकलून दिले. स्वतःच्या शरीराकडे एकवेळ वारकाईनं पाहून घेतलं. आपलं शरीर सुदृढ करण्यासाठी घरातील झाडून साऱ्या माणसांनी कसे व किती प्रयत्न केले यांची गोळाबेरीज एका पारड्यात आणि माझं शरीर दुसऱ्या पारड्यात घालून त्यांची तुला केली तर माझे पारडे आजपर्यंत नेहमीच वर राहिलेले आहे. मला राहून राहून खंत वाटते ती त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले याची. माझं शरीर असं आहे याची मला मुळीच खंत वाटत नाही.

घरात खूप सुखासीनता उसूनही बालपणी माझं शरीर असंच राहिलं. कोडकौतुकाला मर्यादा नव्हती; पण माझं शरीर मर्यादा सोडायला तयार नव्हतं. मी थोडा मोठा झाल्यावर कधी कधी आजोबांबरोबर शेजारच्या गांवच्या यात्रा पाहण्यासाठी जात असे. त्या यात्रामधील कुस्त्या पाहतेवेळी मला असं वाटायचं या पहिलवानासारखे शरीर कमावून आपणही कुस्त्या कराव्यात ! घरी येताना वाटेत आजोबांची व माझी प्रश्नोत्तरे सुरू. "आबा, पहिलवान होण्यासाठी काय करावं लागतं हो ?" मी कुतुहलाने विचारीत असे.

"जयंत, त्यासाठी शेरभर दूध प्यावं लागतं, व्यायाम करावा लागतो" असा ढोबळ सल्ला आजोबा मला देत.

"पण काय हो आबा, दूध प्याल्यामुळं काय होतं ?"

"दुधानं शरीर वाढतं आणि व्यायामानं ते बळकट होतं गाढवा ! दुधाचं नाव घेतोस का कधी ? चहासाठी जीव सोडतोस नुसता ! कसं तुझं शरीर सुधारायचं ? लाज नाही वाटत विचारायला ; " तिरीमिरीला येऊन आजोबा बोलत.

आजोबांच्या बोलण्याचा राग येऊन मी दूध पिऊन दररोज सकाळ संध्याकाळ व्यायामाला सुरवात केली. परिणामी अभ्यासाकडं दुर्लक्ष होऊन शाळेत छडीचाही रतीब सुरू झाला ! कारण व्यायामानं शरीर थकून जायचं आणि झोप मग असा काही हल्ला करायची की, रात्री वाचायला घेतलेलं पुस्तक रात्रभर माझ्या तोंडावर विसावायचं ! झालं, अभ्यास आणि व्यायाम अशा दुहेरी कात्रीत मी सापडलो. शेवटी 'गेला खड्ड्यात तो व्यायाम' असं म्हणून मी व्यायाम सोडून दिला.

प्राथमिक सातवी करून मी हायस्कूलमध्ये गेलो तेव्हा अभ्यासाबरोबर सुदृढ शरीराचीही निकड वाटू लागली आणि म्हणून मी पुन्हा व्यायाम सुरू केला, पण परिणाम मात्र शून्य ! त्यात एक दिवस आमच्या सरांनी कोणत्यातरी संदर्भात अभंगातील वरील ओळ म्हटली, "ठेविले अनंते, तैसेचि रहावे ' तेव्हापासून माझ्या जीवनावर या ओळीचा इतका प्रभाव पडला आहे की, आपल्याजवळ जे आहे त्यातच समाधान मानणे हा माझा स्वभावधर्मच बनला आहे.

आठवणीचं एक प्रकरण संपलं आणि मग आठवण झाली ती शब्बूची.

शब्बू आमच्या वर्गातील एक मुलगी होती. तिला सर्व शब्बू या नावाने ओळखत. रंगानं गोरीगोमटी, गुबगुबीत गाल आणि काहीशी स्थूल होती. आता ती लग्न होऊन सासरी गेली. पण एक गमतीशीर आठवण ठेवून गेली.

कॉलेजच्या पहिल्या दोन वर्षांत तिच्या लठ्ठपणावर कुणी फिश्-पाँड दिला नाही; पण तिसऱ्या वर्षी तिला तिच्या लठ्ठपणावर काहीतरी फिश्-पाँड मिळाला आणि तेव्हापासून ती फारच अस्वस्थ झाली. लठ्ठपणा कमी करण्याचा उपाय ती शोधू लागली.

शब्बूची अगदी जवळची मैत्रीण होती मिस् जयमाला. या बाईसाहेबांना शब्बूची कीव आली आणि त्यांनी शब्बूला एक मोलाचा सल्ला दिला. 'स्थूलपणा कमी करावयाचा झाल्यास आठवड्यातून कमीत कमी एक संपूर्ण दिवस आणि संपूर्ण रात्र कडकडीत उपवास केला पाहिजे.' बिचारी शब्बू ! मैत्रीणीचा हा सल्ला ग्राह्य मानून शब्बूने दुसऱ्या दिवशी उपवास करायचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी न्याहारीची वेळ झाली तरी ती उठली नाही. शब्बू अजून उठते आहे हे पाहून तिचे पपा तिच्यावर रागावले. यावर 'माझे डोके दुखते आहे, माझी प्रतीक्षा कुणी करू नका' असे तिने लगेच सांगून टाकले. तेव्हा कुठं पपांचा पारा उतरला. आईने तिला अमृतांजन लावण्यास सांगितले.

आईच्या आग्रहास्तव एक कप कॉफीशिवाय काही न खाता शब्बू कॉलेजवर आली. माझी गाठ पडताच मी "काय दीदी ! कसं काय ? " हा नेहमीचा सवाल केला. तत्क्षणी मला अमृतांजनाचा वास आला. न राहून मी विचारले, दीदी तब्येत बरी नाही का आज तुझी ? " तेव्हा आपले हसू दाबत ती म्हणाली, "तसं विशेष काही नाही. डोकं दुखतंय साधारण " आणि फारसं न बोलता निघून गेली.

कॉलेजचं गॅदरिंग जवळ आलं होतं. त्याबाबतीत वर्गप्रतिनिधींची आज मिटिंग होणार होती. शब्बू आमच्या वर्गाची प्रतिनिधी होती. मिटींगची नोटीस वाचताच तिला कसंसच झालं ! मिटिंग म्हटल्यानंतर अल्पोपहार होणार. शब्बूने मिटिंग अटेन्ड केली. पण काही खाल्ली-प्याली नाही. मिटींग संपल्यानंतर ती घरी आली. चहाची खूप आठवण होऊनही तिनं चहा घेतला नाही. काही न खाण्याची जणू तिनं भीष्म प्रतिज्ञाच केली होती. 'साप्ताहीक रणशिंग' वाचायला घेतलं. तोच पहिल्या पानावर 'हॉटेल गंगासागर' ची लांबलचक जाहिरात फोटोसह आली होती. 'शाकाहारी व मांसाहारी जेवणाची उत्तम सोय. जिलेबी आणि टेस्टदार सामोसे यांची टेस्ट पाहण्यासाठी एकवेळ हॉटेल गंगासागरला भेट द्या' अशी ती जाहिरात पाहताच तिच्या तोंडाला पाणी सुटल्यावाचून राहीलं नाही. पण तत्क्षणी तिला आपल्या उपवासाची आठवण झाली आणि तिनं लगेच पेपर फेकून दिला.



संध्याकाळी तिची सुनिता नावाची मैत्रीण आली. शब्बूने तिला आपल्या उपवासाची कल्पना दिली आणि संपूर्ण रात्र अजून उपाशी काढायची असल्याचेही सांगितले. पण रात्री सर्वांच्या आग्रहास्तव जेवण करावेच लागणार आणि आपली प्रतिज्ञा मोडणार यावर ती तोडगा शोधू लागली. तेवढ्यात सुनिताने तिला छान कल्पना सुचविली. दोघीही खोलीतून बाहेर पडल्या आणि सुनिताने शब्बूच्या आईला 'मी शब्बूला माझ्या घरी जेवायला नेतेय ' असे सांगितले.

त्या दोघी घरातून बाहेर पडल्या. शब्बू भुकेनं कासावीस झाली होती. चालण्याइतकं त्राण तिच्यात राहीलं नव्हतं. पण ती हट्टाला पेटली होती. त्या दोघींनी बागेत एक-दीड तास गप्पा मारल्या व नंतर एकमेकींचा निरोप घेतला.

शब्बू घरी आली. डायनिंग रूममध्ये जाऊन ती दोन ग्लास पाणी ढसाढसा प्याली आणि सर्वांच्या आधी बिछान्यात घुसली. दिवसाचे बारा तास निघून गेले होते. आता रात्रीचेही बारा तास निघून जातील अशी तिची भावना होती. पण छे ! सर्व परिवार यथेच्छ ताव मारून निद्राधीन झाला होता. पण बिचारी शब्बू मात्र तळमळत होती.

रात्रीचे बारा वाजले तरी तिला झोप येईना. शेवटी भूक असह्य होऊन तिचे पाय आपोआप डायनिंग रूमकडे वळले पण आत शिरताना ती एका खुर्चीला चांगलीच ठेचकळली. अंधारात फ्रीज उघडून हाताला लागतील तेवढी केळी आणि सफरचंद तिनं फस्त केली. नंतर कपाट उघडून तोंड गच्च भरून चिवडा घेतला. खुर्चीच्या आवाजाने मात्र आई जागी झाली. मांजर वगैरे आले असेल असे वाटून आईने डायनिंग रूमचा स्वीच दाबला. तशी शब्बू दचकली. घाईघाईने तिने पळ काढला, पण तिचे बिंग केव्हाच बाहेर पडले होते. आईच्याही अगोदर राजू डायनिंग रूमकडे आला होता. 'अरे शब्बू तू ? ' दोघांनीही आश्चर्याने विचारले. इतक्यात पपाही आले आणि त्यांनी विचारले, 'काय करत होतीस अंधारात ? ' पण शब्बू कसले तोंड उघडते ! तिला अस्पष्ट हुंदका आला. त्याबरोबर तिच्या तोंडातील चिवडा बाहेर पडला. तिची ती अवस्था पाहून सर्वांत हशा पिकला. पपा तर पोट धरून हसू लागले. नंतर त्यांनी तिच्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. 'दिवसभर काही खाल्लं नव्हतंस, मैत्रिणीकडे जेवलीस का ? संकोचानं तशीच घरी आलीस ? घरी येताच काही कस सांगितलं नाहीस ? चोर पावलांनी डायनिंग रूममध्ये घुसून चिवडा का खात होतीस ? ' वगैरे. पण मुळूमुळू रडण्यापलिकडं तिनं काहीच उत्तर दिलं नाही.

दुसऱ्या दिवशी मिस् जयमाला हिची कॉलेजवर गाठ पडताच शब्बूनं तिला आपली रात्री कशी फजिती झाली याचं करुण रसात वर्णन करून सांगितल. कांहीसं वाईट वाटून मिस जयमाला हिने तिला दुसरा सोपा उपाय सुचविला. घर आणि एस्. टी. स्टॅन्ड यातील अंतर जरा कमी असल्याने 'दररोज घरापासून एस्. टी. स्टॅन्डपर्यंत पळत जाऊन बस पकडत जा' असे सांगितले. असा तो सुटसुटीत उपाय तिनं दुसऱ्या दिवशी अंमलात आणायचा निश्चय केला; पण एस्. टी. पकडायला पळत असताना तिच्या साडीचा पदर फाटकाच्या अणकुचीदार सळईत अडकला. शरीर वेगात असल्याने तिला जोराचा हिसका बसला. तशी ती गरकन् फिरून धपकन् आपटली. दोन्ही गुडघे फुटले आणि साडीही फाटली. तीन-चार दिवस तिचा कॉलेजवर पत्ता नव्हता.

ती जेव्हा कॉलेजवर आली तेव्हा मी तिला गैर-हजेरीचं कारण विचारलं, तेव्हा तिने आपल्या करुण कथेचं रसभरीत वर्णन केलं. ते ऐकून मला हसू तर आलेच, पण त्याचबरोबर खूप वाईटही वाटले. कारण आम्ही दोघेही एकाच माळेचे मणी ! नंतर मी तिला शरीर वाढविण्यासाठी कसे प्रयत्न केले व अयशस्वी झाले ते सांगून म्हटले, 'दिदी, निसर्गानं कोणत्याच माणसाला परिपूर्ण, सर्वगुणसंपन्न केलेलं नाही. प्रत्येक माणसात कोणती ना कोणती तरी उणीव ( शारिरीक, मानसिक, बौद्धिक ) असतेच. त्यासाठी व्यर्थ खंत करण्यात काय अर्थ ? निसर्गानं जे दिलंय त्यातच समाधान मानणे हा मानवाचा आद्य धर्म आहे. त्यासाठी कुठल्याशा संताने म्हटलं आहे, "ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असु द्यावे समाधान ! "

शब्बूला माझे म्हणणे पटले असावे; कारण ती लगेच पुढं म्हणाली, "मी लठ्ठ असेन नाहीतर आहे त्यापेक्षाही लठ्ठ होईन ! कुणालाही माझ्या लठ्ठपणाशी काही घेणं नाही ! "

★

# निसर्ग– मानवाचा सखा

**अरुणा यादव**, एस्. वाय्. बी. ए.

जीवन म्हणजे विश्वाच्या भयाण भुयारातून बाहेर पडण्यासाठी धडपडणारे पाखरू आहे आणि निसर्गाच्या सानिध्यात त्याचा अर्थ मानवाला कळतो. मानवाच्या किमान गरजा पूर्ण होतात त्या निसर्गातच; म्हणून निसर्गास महत्वाचे स्थान दिले जाते.

आयुष्यातल्या अनुभवाच्या स्मृती माणसाच्या मनावर कोरल्या जातात तसा निसर्ग सृष्टीच्या मनावर कोरलेलं एक भाव–चित्र आहे निसर्गाचं व सृष्टीचं अतूट नातं आहे. एखाद्या जागेपाशी जशा भावना गुंतून राहतात तसा निसर्ग सृष्टीच्या थेंबाथेंबाशी एकजीव झाला आहे. बोटीच्या नांगरासारखा सृष्टीला घट्ट चिकटून बसला आहे.

निसर्ग हा मानवाचा जीवनाधार आहे. पेरलेलं उगवतं ते निसर्गाच्या शक्तीने हे अतूट नातं मानवाने समजून घेतलं पाहिजे. मानवी जीवनाला वेड लावणारा हा निसर्ग नेहमी आनंद देतो. निळ्या आकाशाची छाया त्या हिरव्यागार धरणीला मिळत आहे. या सृष्टीच्या मांडीवर डोलणारं गवत, सुंदर कोमल किरण पसरून वाऱ्याच्या लहरी बरोबर डोलणारी फूलं, डोंगरदऱ्यातील खळखळ वाहणारा पाण्याचा धबधबा, नदीकाठची हिरवी डोलणारी राने, झुळझुळ वाहणारा धबधबा, झुळझुळ वाहणारा झरा, कडेला दाट पसरलेली झाडे, सुंदर पर्वत, हिरवळीवर बागडणारी रंगीबेरंगी फुलपाखरे, डोंगरामधून वर येत असलेला सूर्य, निळसर पांढरे कापसासारखे पळणारे ढग, इत्यादी सौंदर्यप्रधान गोष्टी, सौंदर्य, प्रेम, आनंद, सुख, संगीत यांच्या साह्याने निसर्ग जाणिवांचा स्पर्श मानवाला देत आहे व त्यातून व्यक्तीला प्रेरणा मिळत आहे. निसर्गाने व्यक्तीला रम्य उज्ज्वल यश प्राप्त करून दिले आहे.

नातं हे झाडाच्या कुंपणाप्रमाणे असते तसंच निसर्गाचं व सृष्टीचं नातं आहे. निसर्गावर हजारो गीते भिजलेली आहेत. तसेच काही निसर्गकवी सुद्धा झाले, की ज्यांनी आपल्या निसर्गावर लिहिलेल्या कविता लोकांच्या पुढे मांडल्या. त्या हृदयाला दिलासा देतात.

उषा हासरी, वीज नाचरी, पर्जन्याच्या सरींवर सरी,
मेघांचे डौलात चालणे, वाऱ्याचे बेताल वागणे,
संध्येची सौवर्ण शांतता, आणि निशेचो रम्य गूढता,
हे सृष्टीचे सुंदर विलसित पाहुनि झाली हृदये हर्षित ।

महाराष्ट्रीयन माणसात अनेक गुण आहेत तसेच दोषही आहेत. काही सर्वसामान्य माणसं आपल्या प्रांतावर प्रेम करतात. कुणी जातीवर, कुणी देशावर, रंगावर तर कुणी निसर्गावर.

व्यक्ती तितके विचार. म्हणून प्रत्येकाच्या आवडी–निवडी वेगवेगळ्या असतात. मानव हा निसर्गाचा एक घटक आहे. हल्ली निसर्गाच्या सानिध्यात असणारा आनंद शहरी माणसाच्याही लक्षात येऊ लागला आहे. काही कारणाने माणसं जीवनाविषयी उदास बनतात. डॉक्टरी इलाज करूनही बरा न होणारा एखाद्या रोगाने पछाडलेला मानव शेवटी कंटाळून निसर्गाला सोबती करतो किंवा एखादा प्रिय व्यक्ती जेव्हा दुरावते तेव्हा माणसाच्या भरलेल्या जगात देखील माणसाला एकटं एकटं वाटतं आणि त्यावेळेस त्या प्रिय व्यक्तीची कमतरता भरून काढतो तो निसर्गच.

निसर्गप्रेमाची जाण सौंदर्यवादी रसिक व्यक्तींना जास्त दिसून येते. अशा व्यक्ती निसर्गात आपले देहभान विसरतात अशा व्यक्तींना निसर्गाचा कधीच कंटाळा येत नाही. फुलांचा तसेच त्याच्या सुगंधाचाही येत नाही.

हृदयाला दिलासा, आनंद देणारा निसर्ग मानवापेक्षा शक्तीमान व वरचढ आहे. कारण जे भूकंप, पूर, वादळ असे काही घडतं ते निसर्गाच्या शक्तीनेच. यास मानव विरोध करू शकत नाही, त्यामुळे निसर्ग मानवापेक्षा वरचढ आहे.

निसर्गाच्या सानिध्याचा माणसाच्या मनाला खूप फायदा होतो. निसर्ग सौंदर्याचा आनंद ज्याने समजून घेतला आहे तोच निसर्गाचे महत्व समजू शकेल.

निसर्ग हा माणसाच्या मनाला मोहविणारा सुंदर विषय आहे. हा विषय ज्या व्यक्तीने सौंदर्याच्या दृष्टीने पाहिलाय ते मोठे कलावंत, कवी, लेखक, दिग्दर्शक झालेले दिसतात.

हा आल्हाददायक देखाव्याचा खजिना निसर्गाजवळ आहे व तो केवळ मानवासाठीच !

---

**आपल्याला समानतेवर आधारलेली समाजरचना हवी आहे. या ध्येयाच्या पूर्तीसाठी आधी आपणास शिक्षणाचे व्यवस्थित नियोजन करावे लागेल आणि विषमतेची व अन्यायाची पाळेमुळे उखडून टाकण्यासाठी शर्थ करावी लागेल. शिक्षण हेच समाजाच्या नवरचनेचे साधन आहे. लोकशाही समाजव्यवस्था प्रस्थापित करायची असेल तर आपल्या शिक्षणाचे उद्दिष्ट– उत्पादक, नागरिक आणि मानव म्हणून व्यक्तिमात्राचा विकास करणे हेच असले पाहिजे.**

**शारीरिक मानसिक आणि आत्मिक– आपल्या सर्व स्वाभाविक शक्ती आणि प्रतिभा यांचा जास्तीत जास्त विकास करून घेण्याची संधी प्रत्येक माणसाला मिळाली पाहिजे. सर्वांना समान संधी हा लोकशाहीचा पाया आहे आणि मनुष्यमात्राच्या आत्म्याच्या प्रतिष्ठेवर आपली श्रद्धा असेल तरच समान संधीचे तत्व प्रत्यक्षात आणू शकू.**

**डॉ. एस्. राधाकृष्णन्**

---

*With Best Compliments from*

**MANNEYS**

**BOOK SELLERS**

**7, Arsenal Road, POONA 411 001.**

63683

# बदल

कु. सुनीता एस्. भराटे, एम्. ए. ( मराठी ) द्वितीय वर्ष

उदास, भकास चेहऱ्याने बायजा अद्यापही एका जागेवर बसत होती. सदैव उमाच्या फोटोकडे पाहून डोळे गाळत होती. त्या निर्जीव फोटोशी कांहीही असंबध्द बोलत होती. पण त्याला कारूण्याची झालर होती. 'उमा बेटी माझ्यावर रागावली कां ? तुला फ्रॉक, पैंजण दिले नाही म्हणून रूसली कां ?' असे बोलून रडत होती. बायजा स्वतः जेवत नसे. बबन तिच्या नवऱ्याला तर कांहीच वाटत नव्हते. एक बेफिकीर पिता होता तो. सदैव दारूच्या नशेत चूर असे. मावशी चार दोन गोष्टी बायजाला समजावत. पण त्याचा बायजावर कांही परिणाम नव्हता. ती उमाच्या मृत्यूचे दुःख कवटाळून बसली होती.

खरे तर उमाच्या मृत्यूला एव्हाना महिना झाला होता. बायजा तिची आई असल्याने आईचे दुःख मीही समजत होते उमाच्या आठवणीने तिचा जीव कासावीस होत असे. घर मोठे मोठे वाटत असे. मलाही वाटायचे, बायजा मावशींचा संवाद ऐकावा, पण वाटायचे सारखे भेटायला जावे तर ती उमाच्या आठवणीने वेडीपीसी होते. त्यापेक्षा दुःख जरा हलके झाल्यावर गेलेले बरे.

बायजाचे दुःख मला पहावत नव्हते तिची अवस्था विचित्र होती पण तिला सावरणे भाग होते. दुःखाने दुःख वाढत जाणार होते. आपल्या एका मुलाकडे पाहून तिने उमाच्या मृत्यूचे विष पचवायला हवे. उमा येते, हसते, खेळते, बोलते हे सगळे बायजाचे भास होते. कल्पनेतले खेळ होते. बायजाचा नवरा बबन हा आहे तसाच होता, केवळ नावाला बाप होता. जन्म दिल्याने कर्तव्य संपत नाही. योग्य तऱ्हेने त्यांचे पालनपोषण करणे हेही आवश्यक ठरते.

बिचारी बायजा, तिचे नशीबच फुटके. लग्नाच्या अगोदरपासून पिण्याची सवय असलेल्या तर्र पतीच्या पदरात ती पडली व "पदरी पडलं नी पवित्र झालं" म्हणून आज कित्येक वर्षे संसार रडतखडत करतेय.

आज बायजाला भेटायचेच ठरवून मी तिच्याकडे गेले होते. पण तिचे दार लोटलेले होते. आत डोकावले, महेश तिचा मुलगा चटईवर झोपला होता. मी दारात येवून अर्धा तास झाला तरी त्याला पत्ता नव्हता. बायजाही कोठे नव्हती. बहुधा मनाला विरंगुळा वाटावा म्हणून गेली असेन कोठेतरी. तास होत आला तरी ती येण्याची चिन्हे दिसेनात. महेशला विचारावे तर त्याचीही झोपमोड करवेना. बसल्या बसल्या माझे डोळे तिच्या घरावर नजर फिरवू लागले.

एक छोटीशी पण स्वस्छ व टापटीपीचा साक्षात्कार तिथे घडत होता. मोजकीच पण व्यवस्थित शेल्फमध्ये मांडलेली भांडी. एका बाजूला पांढरा शुभ्र टेबलक्लॉथ नाजूक भरतकाम असलला आच्छादित टेबल, त्यावर वेलवेटचा सजीव वाटणारा गुलाबांचा फ्लॉवरपॉट. टेबलाच्या वरच्या बाजूला भितीवर एक छोटी फळी, त्यावर लाल रेशमी कापडावर विराजमान झालेली मोहक श्यामल कृष्णाची मूर्ती. मूर्तीला घातलेल्या पांढऱ्या शुभ्र पारिजातकाच्या फुलांचा मंद सुवास दरवळत होता. एका कोपऱ्यात सेकंड हॅन्ड मशीन, एक खुर्ची. भिरभिरती नजर पुनः दाराकडे वळाली. सारवलेल्या अंगणात रेखीव रांगोळी घातली होती. पुनः नजर आत येवून दाराच्या वरच्या बाजूला स्थिरावली. उमाचा हसरा फोटो, त्यालाही एक हार लटकावलेला होता. या सर्वावरून बायजा आता सावरलेली असावी असे वाटले व तिची कलापूर्ण दृष्टीही जाणवली. महेश अद्याप झोपलेला होता.

तेवढ्यात जांभया देत महेश उठला. बराच वेळ झाला तरी बायजा येईना. शेवटी ती कोठेततरी कीर्तनास गेली हे समजताच मी महेशचा निरोप घेऊन बाहेर पडले.

मी रस्त्याने झपाझप चालत होते, पण उमाचा फोटो कांही डोळ्यापुढून हलेना. इवलीशी उमा मोठी गोड होती. माझी चिंकी नी ती एकाच वयाच्या. उमा गेल्यावर मलाही फार उमाळे यायचे. मी माझ्याच विचारात चालले होते. नकळत मन भूतकाळाचा वेध घेऊ लागले.

माझी नि बायजाची दोन तीन वर्षापूर्वीची मैत्री. आम्ही दोघी एकाच शिवणक्लासमध्ये असल्याने व जवळपास रहात असल्याने मैत्री झाली. एकमेकींच्या सुखदुःखाची देवघेव करीत असू

बायजाच्या जीवनाचा गत चित्रपट माझ्या डोळ्यासमोर हळूहळू साकार झाला. २२ वर्षापूर्वी बायजा बबनची पत्नी म्हणून येथे आली. वडिलांकडे हुंडा द्यायला पैसा नाही म्हणून जेमतेम स्थळ पाहून तिला उजवली. कोठल्या तरी कारखान्यात तिचा नवरा कामाला होता पिण्याची सवय व मी म्हणणारी महागाई. आर्थिक ओढाताण होऊ नये म्हणून ती शिवण शिकली महेशवर बापाची वाईट सावली पडू नये, घाणेरडे संस्कार होऊ नये म्हणून शहरात ठेवले. त्याच्या पाठीवर बारा वर्षानी झालेली उमा हे तिचे अत्यंत लाडके अपत्य होते. एकीकडे पिणारा नवरा, दुसरीकडे पोराचे शिक्षण यात पोरीची तिने कधी हौस केली नाही. गेल्या वर्षी महेश बी. कॉम झाला. पण हलकी नोकरी करण्याची लाज वाटते, तर चांगली नोकरी मिळेना. वशिला लावायचा तर पाच दहा हजार कोठून आणायचे ? हाडाची काडे करून बायजाने महेशला शिकवले ते तो मोठा झाल्यावर चार पैसे मिळवील, आपल्याला सुख लाभेल, उमाचे लाड पुरवेल या आशेवर. पण सगळे वाया गेले होते. बारा वर्षाची तिची तपश्चर्या फळाला आली नाही. त्यामुळे दिवसेंदिवस बायजा खंगत चालली होती तिचा कृश चेहरा काळवंडून गेला होता तशातच समोर हे दुःख ठाकले होते.

तो दिवस कोठला होता हे आठवत नाही. पण पावसाळ्याचे दिवस होते. उमा पहिलीला नदीच्या पलिकडील शाळेत जात असे. धुंवाधार पाऊस कोसळत होता. महेशला बायजा उमाला आणण्यासाठी विनवत होती. पण शहरात आरामशीर राहण्याची सवय व आळसावलेले शरीर त्यामुळे त्याला काम नको वाटे. अखेर बायजा छत्री घेऊन निघाली पण जोराच्या पावसाने रौद्र रूप धारण केल्याने शाळा एक तास अगोदर सोडली. उमाला काय पावसात मजाच वाटते. ती चिंब भिजून आली होती. भिजलेल्या शरीरावर आता छत्री धरून काय उपयोग ?

बायजाने तिला खरखचून कोरडे केले. गरम चहा दिला पण रात्रीची उमा हुडहुड करू लागली. तिला जोराची थंडी, ताप, सर्दी याने तीन दिवस जाम झाली. नवऱ्याचे पिणे व मुलांची बेफीकीर वृत्ती याने बायजाचा धीर खचत चालला होता. उमाचा ताप चढत होता उतरत होता. पण ती दिवसेंदिवस अशक्त होत चालली होती. दहा दिवस झाले तरी तिचा ताप उतरण्याची चिन्हे दिसेनात.

एक दिवस बायजाने धीर करून डॉ. गोखल्यांना विचारले, "डॉक्टर जे कांही असेल ते स्पष्ट सांगा." शेवटी डॉक्टरांना जी शंका होती तीच खरी ठरली. दोन दिवस वाट पाहून उमाचे दुखणे न्यूमोनियावर गेले होते. तिला दवाखान्यात ॲडमिट करणे भाग होते. अखेर जवळचा पैसा संपत आला होता पण पोरीचा जीव वाचला पाहिजे. काय होईल ते होवो. पुढचामागचा विचार न करता बायजाने चार मणी व मंगळसूत्र मोडले व ५०० रु. घेऊन तिने महेशच्या मदतीने उमाला ॲडमिट केले. तिचा ताप १०४ होता. दवाखान्यात येऊन तीन दिवस झाले. उमाच्या पोटात अन्नाचा कण नव्हता. दिवसात तीन तीन बाटल्या सलाईन होत होते पण फरक नव्हता. डॉक्टर आपल्या परीने शिकस्तीने प्रयत्न करीत होते. पण ताप उतरण्याचे चिन्ह दिसेना.

अखेर शेवटच्या दिवशी उमा बेशुद्ध झाली. बारा तास झाले तरी ती डोळे उघडेना रात्री बारापर्यंत डोळे उघडणे भाग होते. ती शुद्धीवर यायला हवी. डॉक्टरही तिच्याजवळ बसून होते पण दुर्दैव. शेवटी काहीच इलाज झाला नाही. सर्वांना हवीहवीशी वाटणारी उमा देवाला प्रिय झाली होती. पहाटे तीन वाजता तिची प्राणज्योत मालवली. त्यावेळी बायजाने केलेला आक्रोश पहावत नव्हता. बायजाने जिवाचे रान केले पण यश आले नाही. दुखाच्या मालिकेत अजून एका दुःखाची भर पडली.

मनात येते की बायजाने महेशला एवढे शिकवले पण शेवटी काय साधले ? कदाचित् त्याने मिळेल ती नोकरी

पत्करली असती तर तेवढाच दिलासा मिळाला असता. शहराच्या ठिकाणी उमाला दाखवले असते, उमा बरीही झाली असती. पण नाही, उमाचे आयुष्यच तेवढे होते कितीही कांहीही केले व ती कितीही लाडकी असली तरी देवाचे तिला बोलावणे आले होते.

पण एक चांगले झाले. उमाच्या मृत्यूने महेशचे डोळे उघडले, उमाचा मृत्यू, आईचे कष्ट, तिची जिवाची होणारी तडफड, वडिलांचे पिणे यामुळे बायजावर होणारा परिणाम याची त्याला जाण आली. कळत नकळत त्याच्यात बदल झाला. गेल्याच महिन्यापासून तो एका वर्कशॉपमध्ये ४०० रुपये महिन्यावर काम करण्यास तयार झाला. त्याला हे कळून चुकले की आपल्यासाठी आईने किती खस्ता काढल्या. आईला सुख देणे आपले कर्तव्य आहे. काम करण्यास लाज कशाला हवी. कोणी आपल्याला चार पैसे देणार नाही की अन्न खायला देणार नाही. गेली दोन वर्षे आपण विनाकारण बेकारीत वाया घालविली आता असे करून चालणार नाही. उमाची आपण मोठा भाऊ या नात्याने कुठली हौस केली नाही की आईने आपल्या शिक्षणासाठी पैसा पुरवला विचारीला साधा फ्रॉक की पैंजण नाही. शेवटी आपले आयुष्य मातीमोल गेले. बहिणीसाठी नाही निदान आईसाठी तरी मला काम करायलाच हवे हे त्याला मनोमन पटले व तो आज वर्कशॉपमध्ये काम करतोय. बायजाही आता उमाचे दुःख हळूहळू विसरत आहे, नव्हे तिला विसरायलाच हवे कारण महेशही तिचाच मुलगा आहे ना? त्याच्यासाठी तरी तिला जगायला हवे, उमाचे दुःख विसरायला हवे. तिला आनंद आहे तो यातच की तिचा महेश तरी मार्गी लागला. उद्या त्याचे लग्न होईल, त्याला मुलगी होईल तीच आपली उमा. तिच्यातच उमाला शोधायचे या आशेवरच ती जगतेय? जगायला हवे, फक्त महेशसाठी.


*With Best Compliments from*

**POPULAR BOOK HOUSE**

**75, Deccan Gymkhana,**
**Pune - 411 004 ( India )**

**51737**




# हिन्दी विभाग

## रात

रात में
कंपन हुआ
मैं चौंक उठा।
जब हवाने
मुझे हिलाया-जगाया।
मैं देख रहा था
रात के अंधेरे को
क्षितिज में
विलीन होते हुए;
और उस रात में
फीका पडता चाँद।
जो बीता था,
मुझसे अलविदा
कह रहा था।
मुझे इन्तजार था
आने वाली सुबह का,
क्योंकि, रात
मरनेवाली थी,
और सुबह का सूरज
पैदा होनेवाला था।

**कांबळे व्ही. के.**
एम्. ए. ( हिन्दी ) ( प्रथम वर्ष )

## देखते देखते

देखते देखते
गुजर चुकी रातें गमोंकी
कितनी हद तक मैं ......
सहलाता रहा–
हर घडी हर पल
न जाने उस वक्त
इतनी उदासी क्यों थी।
इरादे बन चुके थे सपने
और मैं बन चुका था–
एक बुलबुला उसका,
जो अब टूट चुका हूँ
बिलकुल सपनोंकी तरह।
अहिस्ता– अहिस्ता
वक्त डूबता रहा,
उसके साथ–साथ
मैं भी डूबता रहा
एक अनजाने साये की तरह।
जैसे भुला था दिशा,
भटकता रहा–
चलता रहा दूर... दूर।
देखते देखते यह क्या हो गया
मेरा भी अस्तित्व डूब गया
देखते... देखते...।

**अनिल पी. पानसे**
टी. वाय्. बी. ए.

# फैशन की दुनिया में

गोरे ई. एस्, एम्. ए. ( हिन्दी ) प्रथम वर्ष

प्रदीप की पूर्व सूचना के अनुसार मैं उसे लेने के लिए स्टेशन पर पहुँचा, किन्तु वह पहले ही स्टेशन पर पहुँच चुका था और शायद वह अपने किसी परिचित व्यक्ति से बातें कर रहा था। उसे आश्चर्यचकित करने के दृष्टि से मैं उसके पीछे से चुपचाप गया और जोर से उसकी पीठ पर हाथ दे मारा और कहा—

हॅलो, प्रदीप कैसे हो ?

किन्तु जब मैंने उसकी ओर देखा तो मेरी खुशी अपने आप उड गयी, चेहरा फीका पड गया। क्षणभर के लिए ऐसा लगा मानो पैरो तले की धरती खिसक गई हो; आसमान फट गया हो। पसीनेसे मेरा चेहरा पीला हो गया, क्योंकि वह प्रदीप नहीं था, वह तो एक अत्याधुनिक भारतीय नारी थी जिसके बाल मेरे दोस्त प्रदीप की तरह थे, उसकी बुशशर्ट–पतलून बिलकुल पुरुषों जैसी थी। महिला की पीठ पर हाथ पडते ही वह बोली,

आप कौन हैं ? फिर बोली, आप चाहें जो भी हों, बडे बदतमीज हो।

देवी के मुख से कर्णप्रिय शब्द सुनकर मैं तो शर्म से पानी पानी ही हो गया और बडी ही नम्रता से बोला, आय ॲम रिअली व्हेरी सॉरी। मैंने आपको पीछे से देखा और पीछे से आप साक्षात् मेरे मित्र जैसी प्रतीत हो रही थीं। वह आज बम्बई से पूना आ रहा है।

महिला शायद पढी–लिखी थी और कुछ अधिक समझदार होने के कारण आगे बोली,

देखिये, आगे ऐसी गलती न करना, वरना आपको प्यार की बजाय मार खाना पडेगी।

उस दिन ना तो गाडी आई और ना ही प्रदीप आया, किन्तु मैं लज्जित होकर वापस जरूर आ गया।

घर आकर पडा–पडा सोचने लगा कि यह आज कैसे हुआ ? क्यों हुआ ?

मैं सोचने लगा, मैंने प्रदीप का रूप इस महिला को कैसे दे दिया। मस्तिष्क पर जोर डालनें पर फैशन का प्रभाव मेरे मन पर उभरने लगा।

'फैशन' आधुनिक युग की देन है, जिसे ना कोई निर्मित करता है, ना ही उसके निर्माण में कोई ऐसा परिवर्तन है, जो मनुष्य ( नर या नारी ) में अपने आप उदित होता है। अगर एक विशेष व्यक्ति कोई नये प्रकार का पहनावा अपनाता है तो अन्य सभी लोग उस व्यक्ति का अनुसरण प्रारम्भ कर देते हैं। इस संदर्भ में बेल बॉटम का उदाहरण स्पष्ट है। शायद किसी नें अपनी पतलून का निचला हिस्सा अधिक चौडा कर दिया होगा और वही आज आम जनता की प्रिय पोशाख बन गयी है।

रंग उतरी हुई मोटे कपडे की पतलून को 'जिन्स्, नाम से अंग्रेजी में जाना जाता है। आज के नौजवान अच्छी और कीमती पतलूनों पर पता नहीं कैसे कैसे चिथडे लगा लेते हैं, और अपने आप को भिखारियों की संज्ञा देते हैं। यह केवल 'फैशन' की आड में होनेवाला परिवर्तन है।

यह आधुनिक युग फैशनेबेल लोगों से परिपूर्ण है। इस युग में कल की लैला आज के मजनू के रूप में दिखाई पडती है, तो कल का फरहाद-शिरीं-बनने में अपना सम्मान समझने लगा है। आज का नौजवान स्वस्थ व तंदुरुस्त होने के बजाय पतला-सा बनारसी एक्के के घोडे के समान नजर आता है। लंबे लंबे बाल उनकी गर्दन के नीचे तक बिखरे होते हैं। ये लोग समाज में सर्व साधारण जीवन व्यतीत करनेवाले व्यक्तियों को मुसीबत में डाल देते हैं कि वे उस नव युवक से स्त्रीलिंग में बात करें या पुल्लिंग में, क्योंकि ऐसे तरुण-तरुणियों से सर्व–साधारण मध्यम वर्ग के लोगों का संपर्क बस–स्थानकों पर या सिनेमा घरों में आता है।

आज भारतीय सुंदर स्त्री वह नहीं कहलाती जो साधारण साडी पहनती हो, जिसके बाल लंबे हों, जिसमें शर्मीलापन, भोलापन हो, जो उसकी वफा का द्योतक हो, बल्कि आज सुंदर नारी वही है जिसके बाल कटे हुअे हों, साडी के बजाय पतलून व बुशर्ट पहनती हो, आचार–विचार–व्यवहार जिसका पुरुषों जैसा हो।

ऐसी देवियाँ जब शहर की सुंदर व सजी हुई दूकानों के बीच सडकों पर चलती हैं तो ऐसा लगता हैं जैसे पर कटी हुई मुर्गियाँ फुदक फुदक कर उडने का प्रयत्न कर रही हों। इनके जूतों या सैंडलों का हाय हिल इतना 'हाय' होता है कि उन्हें सडकों पर चलना कठिन होता है। परिणामतः ना ही वे कॉलेज की ऊँची ऊँची सीढियाँ चढकर लेक्चर में समय पर उपस्थित हो सकती हैं, ना ही भाग सकती हैं। बस में चढते या उतरते समय अक्सर चोट खानी पडती है। इतनी कठिनाइयों के बावजूद भी इस प्रकार आवरण आवश्यक समझा जाता है, क्योंकि यह तो 'फैशन' है।

इस संदर्भ में सिनेमा विशेष स्थान रखता है। एक कालवधी ऐसी होती है, जब एक विशेष अभिनेत्री या अभिनेता अपने जीवन के उच्च शिखर पर जगमगा रहे होते हैं। उस अभिनेत्री या अभिनेता की वेशभूषा, केशरचना का अनुसरण आम युवक–युवतियों में आजकल पाया जाना स्वाभाविक हो गया है।

आज के जटाधारी विद्यार्थी प्रातःकाल जब महाविद्यालयों में विद्यार्जन के लिए निकल पडते हैं तो ऐसा लगता है, जैसे नाथ संप्रदाय का प्रचार करने निकले हों।

बिंदिया, सीमा, रेखा, हेमा, आशा, श्रीदेवी, जयाप्रदा देवियों के नाम हैं जो ऑटो रिक्शा व साइकिलों पर सुंदर ढंग से सजा कर लिखे हुए मिलेंगे। यह सब क्यों ? तो इसका जबाब केवल 'फैशन' ही है। एक समय था प्रत्येक युवक राधा, सरस्वती, पार्वती लक्ष्मी आदि देवियों की पूजा में लीन रहता था।

परिणामस्वरूप यह कहा जा सकता है कि फैशन वर्तमान परिस्थिति के योग्य व अनुकूल होनी चाहिए, जिसे समाज स्वीकार करे, जो सामाजिक विकास में सहाय्यक हो। अश्लीलता व अयोग्यता को जन्म देना 'फैशन' नहीं कहलाता।

*

# पुनर्भेट

कांबळे व्ही. के. एम्. ए. ( हिन्दी )

पंद्रह साल बाद वह गाँव पहुँचा। तना शरीर और उतावला मन जमीन पर पैर रखते ही नई दुल्हन की तरह रोमांचित हुए। मेरा गाँव !

नज़र उठाकर उसने इधर–उधर देखा। पहचान की एक भी निशानी नहीं थी। यह स्टैंड पहले कोलाहल-युक्त नहीं था। अब कितना बदल गया है। 'मैं भी तो बदल गया हूँ।' उसने मन को समझाया। स्टैंड के बाहर आते ही उसे रिक्षाओं ने घेर लिया। 'साहब, रिक्शा, हाथ में छोटी अटैची थी। उसे सँभालते उसने इन्कार कर दिया। 'अब चार दिन सवारी नहीं चाहिए। पूरा गांव मैं पैदल ही घूमूंगा।'

स्टैंड के बाहेर से तीन रास्ते निकलते थे। एक बाएँ और एक सामने। पुराना एकही रास्ता नहीं था, जो बाजारसे स्टैंड पर आता था। सामनेवाला

रास्ता हमें गांव ले जाता। अपना गाँव छोडते समय दूसरे गाँव के लिए कुछ कौतूहल होता है। अपने गांव से वह अच्छाही होगा ऐसा लगता है। पुराने–संबंध भुलाने हैं, नये संबंध जोडने हैं। अब इस गाँव मे पहचानें बढानी होंगी। इस विचार से वह तेजीसे चलने लगा। एक पुराने होटल में चाय पीने के लिए गया। रेडिओपर यह धुन सुनाई दी,

दुनिया में हूँ, दुनियाका तलबगार नहीं हूँ,
बाजारसे गुजरा हूँ, खरीदार नहीं हूँ।'

इस गीतने उसके कलेजे को छुआ था।

जिसके लिए उसने गाँव छोडा था, अब वह गृहस्थ जीवन में रममाण होगी और यह परदेसी। जवानी में यह हो ही जाता है। लेकिन उसके लिए यह दुनिया और घर से भी बाहर निकल गया। पहले जो मिली उसके लिए शादी का ख्वाब रचा! क्या वह भी ऐसा ही सोच रही होगी? माँ–बहनने बहुत समझाया। पिताजी से तकरार करना ठीक न समझा। घरवालों की नहीं सुनी। इसलिए आज परदेसी है।

कितना अच्छा हार्मोनियम बजाता था। और बहन नृत्य की प्रैक्टीस करती थी। उसी वक्त वह मिली जो हररोज चोरी चुपके उसका गाना सुनती थी। उनके मन में राधा–कृष्ण के प्रेमगीत मचलने लगे। दिल धडकने लगे। एक–दूसरे के लिए मन में कोमल भाव पैदा होने लगे। गाँव में उत्सव था और राज हार्मोनियम बजाता था। वह भी उसी उत्सव में शामिल थी। दुनियासे नजरें चुराकर उसे देख लेती थी और ओठों ही ओठों में मुस्कराती थी। यह उसका मैट्रिक साल था। उसको इम्तिहान के लिए पढाई पर जोर देना था, लेकिन ऐसा नहीं होनेवाला था। यह कुदरत का करिश्मा था। हार्मोनियम बजाना, घूमना और उसकी याद में दिन को भी तारे गिगना उसकी आदत हो गयी थी। नतीजा भी वही हुआ। वह इम्तिहान में फैल हो गया। उसके घरवालोंने उसे बहुत समझाया। घरसे निकालने की धमकियाँ दीं। लेकिन वह एक नहीं माना। अपने प्रिय के स्कूलके इर्दगिर्द चक्कर काटना उसने शुरू किया। दोनों को यह मालूम नहीं था कि उनकी मुहब्बत को नजर लग गयी है।

उसका बाप जमींदार था। उसके भाई को इनके मिलने जुलने के बारे में खबर मिली थी। वे आग बबूला हो गये व इसका रास्ता खोजने लगे। लडकी की शादी पास ही के गाँव के जमींदार के बेटे से तय हो गयी। राज के माता–पिता उसे समझाने लगे। जमींदार की बेटी मोटर में घूमती थी और उससे निकली धूलपर राज चलता था। उन दोनों में इतनी गहरी खाई थी। दोनों के संबंध एक कैसे होते? एक अमीर, दूसरा गरीब! झोंपडा भी कभी हवेली के साथ खडा रह सकता है? माँ–बाप ने उसे घरसे निकाल दिया। लडकी के भाई ने भी उसे डराया-धमकाया। तब उसने निर्णय किया कि उसेही क्या, दुनिया ही को क्यों न छोड दिया जाये। लेकिन उसने ऐसा नहीं किया। सिर्फ गांव छोड दिया और शहर आ गया। शहरमें आकर उसने कुछ हल्के-फुलके काम करके अपनी पढाई पूरी की। उसी दौरान मालूम हुआ उसका पति बाहरखयाली है। हरदम झगडे होते हैं। लेकिन उसने उसपर कोई ध्यान न दिया। आज वह अच्छे से ऑफिस में ऊँची जगह पर कार्यरत था और टूर के लिए सदा बाहर जाया करता था। उसी वजहसे आज वह गाँव में आया था। उसके कदम अपने पुराने मकान की तरफ चल पडे थे। उसने जाकर दरवाजे पर दस्तक दी। कोई आवाज नहीं आयी। फिर भी वह बजाते ही चला गया। पडोस के बूढे ने बताया कि यह दरवाजा दूसरों के लिए नहीं खुलता, क्योंकि यहाँ एक बूढी रहती है जो किसीसे मिलना जुलना पसंद नहीं करती। अब तुम जा सकते हो। लेकिन राज ने फिर भी दरवाजे पर दस्तक लगायी। अब की बार अंदर कोई आहट हुई और एक बूढी ने दरवाजा खोला। राज को देखकर वह बाजू हटी। राज के अंदर जाते ही उसने दरवाजे में कुंडी लगायी। बूढा आवाक् रह गया। जैसे ही बूढी के चेहरे की ओर उसने देखा, उसे चक्कर आ गया। वह वही थी जो कभी राज के लिए बेचैन थी। राज के मुँहसे निकला, "तुम!"

"हाँ, मैं! मेरी शादी तो बहुत उंचे खानदान में की गयी पर वह अंदरसे खोखला हो गया था। मेरे पति नशेबाज और बहुत कुछ थे। मुझे बहुत सताया गया। जब हमारे संबंधों के बारे में पता चला



तब मुझे घर से निकाल दिया। मायके में जाकर फिर पढाई की और एक अध्यापिका का काम करने लगी। आपकी माँ की बीमारी के दिनों में उनकी सेवा में आ गयी। आपकी बहन की शादी कर दी और माताजी के मर जाने बाद से आज तक आपही की यादों में खोई इंतजार कर रही हूँ। आज वह दिन आ गया। मेरी सारी मनोकामनाएँ पूरी हो गयीं।"

कुछ खा-पीकर दोनों सो गये। उसने सपने में अपना पुनर्मीलन देखा। जब आँख खुली और उसके बिस्तर पर पडी तो वह खाली था। वह चला गया था।

# शादी का ढकोसला

**डी. टी. जाधव, एम्. ए. ( हिन्दी ) प्रथम वर्ष**

( रवि किताब पढ रहा है इतनेमें चंदा आती है। )

चंदा– क्यों जी, क्या देख रहे हो उसमें? जरा इधर भी तो देखो।

रवि– अपना फूटा नसीब।

चंदा– क्या उसमें लिखा है?।

रवि– नहीं–नहीं तुम्हारे मुँहपर लिखा है।

चंदा– मैं क्यों अपना मुँह गंदा करने लगी।

रवि– तो क्या मेरी मुँह गंदा करने यहाँ आई हो? ( किताब पटक देता है )

चंदा– क्यों जी, बात बातपर आप झगडे पर उतारू हो जाते हैं?

रवि– तो क्या तेरे पाँव चूम लूं? सिर्फ एक महीना रह गया है इम्तहान के लिए, मालूम है महीने में कितने में कितने दिन होते हैं?

चंदा– मुझे क्या मालूम? मैं कभी स्कूल गई नहीं। होंगे यहीं कहीं चालीस-पचास। ( रवि आश्चर्य से माथे पर हाथ पटकता है )

रवि– मेरी माँ, तू यहां से जा, मुझे पढने दे वरना मैं फेल हो जाऊंगा।

चंदा– ( कुछ सोचकर ) यानी कि तुम–तुम ( जीभ दांतोंतले दबाती है ) नहीं, आप पास हो जाएँगे। है ना? फिर तो मुझे मिठाई बाँटनी पडेगी। हमारे यहाँ मेरा बडा भाई हरसाल फेल होकर आता है और पिताजी गांववालोंको मिठाई खिलाते हैं।

रवि– चंदा, क्या तुम सचमुच स्कूल में कभी गई ही नहीं?

चंदा– तो क्या मैं झूठ बोल रहीं हूँ।

रवि– पिताजी तो कह रहे थे कि तुम मैट्रिक पास हो।

चंदा– मुझे तो स्कूल क्या होता यह भी मालूम नहीं। झूट कहा होगा उन्होंने।

रवि– ( एकाएक खडा होकर ) क्या? झूट कहा होगा? ( अंदरसे माँजी 'चंदा' को पुकारती है )

चंदा– आई माँजी। ( चली जाती है ) ( रवि गुस्सेसे टेबिलपर हाथ पटकने लगता है– फिर निराश होकर माथेपर हाथ रखकर बैठता है और एकाएक चिल्लाता है )

रवि– नहीं, मेरी शादी नहीं हुई है। (बैठ जाता है।)

सचीन– ( अंदर प्रवेश करते हुए ) रवि यह सब क्या चल रहा है, क्या हालत बनायी है तूने अपनी? पिछले छे दिनोंमें तू कॉलेज में मिला नहीं। अरे यार तूने शादी की, किसींको पता तक नहीं। याद है हमें पार्टी देने का वादा था तेरा, क्या बच्चेकी शादी में पार्टी खिलाएगा हमको?

माई– अरे सचीन, तुम कब आये बेटे? तुम तो इसे

कुछ समझाओ। जबसे इसकी शादी हुई है तबसे यह पागलों की तरह बहक रहा है। कलसे इसने कुछ खाया नहीं। अब दोनों मिलकर कुछ खा लो, मैं खाना लाती हूँ। सचीन, तुम बैठना।

सचीन– आप कह रही हैं तो बैठता हूँ। लाइए जल्दी, मुझे भी भूख लगी है।

( माई खाने की चीजें और पानी ले आती है। रवि को पानी देती है। )

सचीन– माँजी, मुझे रवि पर बडा नाज है। वह हमारे कॉलेज का अनमोल हीरा है, पर न जाने आज कल इसपर कौनसा भूत सवार है, पिछले साल तो वह युनिवर्सिटी में फर्स्ट आया था, लेकिन आज कल तो पीरियड्स भी अटेन्ड नहीं करता।

माई– इस की हालत देखकर मेरा दिल भी टूटने लगा है। न जाने किस मनहूस घडीपर इसकी शादी हुई। अरे तुम कुछ खाओगे भी या बातेंही करते रहोगे? चलो शुरू करो।

( माँजी जाती हैं, रवि एक चीज उठाकर एका एक खाने लगता है। )

सचीन– (आश्चर्य से) अजब बात है, यार से पहलेही खाना शुरू किया। ( एक चीज मुंह में डालकर) रवि तू पढाई मत छोड यार, मैं सुरेश और वर्षा कोई भी तेरे बगैर पढ नहीं सकेंगे। वर्षा का तो कुछ सोच! आखिर प्यार ही तो जीवन है, अब प्यार तू क्या निभायेगा? तूने तो शादी भी कर ली, वरना तेरे और वर्षा के प्यार का ज्यूस चखनेमें हमें बडा मजा आता।

रवि– ( खाना समाप्त करके ) सची, प्यार अकेली बुरी चीज नहीं है, 'लव्ह इज लाइफ, बट लाइफ इज अ डेन्जर, सो लव्ह इज अल्सो अ डेन्जर'

सचीन– ( खाते खाते ) नहीं, यह तेरा वहम, तेरी कमजोरी है और मैं यह भी नहीं जानता कि वर्षा को चाहते हुए तूने चंदासे शादी कैसे की। क्या तू पागल हुआ था उस दिन?

रवि– पागल तो मैं अब होने जा रहा हूँ, न चंदाको अपना सकता हूँ, न वर्षा को समझा सकता हूँ। और पिताजी को देखकर तो लगता है किसीका खून पी जाऊँ।

सचीन– क्यों उन्होंने क्या किया है।

रवि– तो यह सब किसने किया है? मैं बार बार कह रहा था कि मैं चंदासे शादी नहीं करूंगा, लेकिन उन्होंने मेरी एक न सुनी।

सचीन– लेकिन भाभी तो देखनेमें वर्षासे भी बेहतर है।

रवि– सभी लोग मुखडेपर प्यार नहीं किया करते, सची। मेरा प्यार वर्षा के व्यक्तित्व पर है, जिस्मपर नहीं।

सचीन– लेकिन आज कल तो चेहरे की खूबसूरती या दिखाऊपन ही प्यार का कारण बनता जा रहा है। लेकिन मेरी समझमें नहीं आता कि पिताजीने आखिर ऐसा किया क्या कि तुम्हें मजबूरन् यह शादी करनी पडी?

रवि– उन्होंने मुझे धमकाया, अगर मैं शादीके लिए राजी न हुआ तो वे घरबार छोडकर चले जायेंगे, अगर बादमें उन्होंने उन लोगोंसे २५ हजार न लिये होते मैंने वर्षाको समझाया होता कि पितृऋण कुछ कम करने के लिए मैंने शादी की है।

सचीन– लेकिन वर्षा भी तो उनकी भाँजी ही थी और तुम दोनों एक दूसरे को चाहते भी थे!

रवि– अरे पगले, वर्षा के घरवाले इतना दहेज पिताजीको कहाँ से देते और सोसायटी में पिताजी का रोब जमता कैसे? ( चंदा बाल सँवारती हुई आती है।

सचीन– नमस्कार भाभी, हम आपके बारे में ही बातें कर रहे थे।

चंदा– सच!

सचीन– सच नहीं तो क्या झूठ खुशामद कर रहा हूँ? ( रवि की तरफ देखकर ) रवि चल, मैं अब चलता हूँ। क्या तू आ रहा है मेरे साथ?

रवि– ( चंदा की ओर देखकर ) इस मुसीबतसे बचने का कोई चारा भी तो है नहीं ( जूते बांधने लगता है )।

चंदा– कौनसी मुसीबत जी?



सचीन– भाभी, क्या है, हमारी क्रिकेट टीम बाहर जा रही है, और यह जाना नहीं चाहता।

चंदा– इन्हें तो जाना चाहिए आदमीने अपने कामसे मुंह नहीं मोडना चाहिए।

सचीन– लेकिन भाभी, अगर काम ना पसंद का हो तो?

चंदा– तो पहले ही सोचना चाहिए काम अपने पसंदका है या नहीं।

सचीन– अगर मजबूरी से लादा गया हो तो?

चंदा– फिर तो मुसीबत है, फिर भी कोई न कोई हल ढूंढ निकालना चाहिए।

रवि– सचीन चलो हम चलते हैं।

सचीन– भाभी चलता हूँ। ( रवि, सचीन चले जाते हैं, चंदा अकेली रह जाती है )

अण्णा– ( अंदर प्रवेश करते हुए ) बेटी चंदा, अकेली क्या कर रही हो?

चंदा– कुछ नहीं पिताजी, मैं चाहती हूँ कि कुछ दिन माँ के यहाँसे हो जाऊँ। आप इजाजत दे तो।

अण्णा– इजाजत तो उसकी लेनी पडेगी, वो भी तो आज कल ठीक तरहसे पेश नहीं आता।

चंदा– और आयेंगे भी कैसे, आपने उनकी मर्जी के खिलाफ में शादी जो की।

अण्णा– बेटी, मैंने भी तो उसका बूरा नहीं सोचा था। मेरा यह सपना था कि वह बडे घर का दामाद बने, लेकिन इन लडकोंको जीने की राह ही मालूम नहीं है। इतनी सी बातपर जीवन का बुरा हाल बना देते हैं।

चंदा– जो हो पिताजी, आपने सिर्फ अपनी सोची, उनकी नहीं।

( माँजी अंदर आती हैं, चंदा उन्हें प्रणाम करके चली जाती है )

माई– तुझे आशीर्वाद भी क्या दूं बेटी, भगवान करे और तेरा सुहाग सही रास्तेपर आ जाए। ( अण्णाकी ओर देखकर ) क्यों जी, तुम यहाँ क्यों बैठे हो। जाओ, बेटा किसी क्लब में झूमता होगा, ले आवो उसे, कितनी मनौतियाँ मानी थी उसके लिए मैंने, पिताके लिए उसने अपनी जिंदगी बरबाद कर दी। ( जोरसे ) आपने क्या किया उसके लिए? अगर आपने उसकी हालत न सुधारी तो मैं सिर फोडकर जान दे दूंगी।

अण्णा– तुम ऐसा क्यों कहती हो? मैं ने उसके लिए क्या करना बाकी रखा है? पढाया है, खुबसूरत बीबी है, बंगला नोकर चाकर हैं, और क्या करना चाहिए था मुझे।

रवि– ( नशेमें झूमता हुआ अंदर आता है ) बस इतनाही..... काफी है, ( लडखडाते हुए ) मुझे . दुनिया...वालो...शराबी...न ...समझो ...मैं पीता नहीं हूँ, पिलाई गई है।

माई– ( रविको सवारते हुए ) रवि... रवि, आखिर क्या मिलेगा तुझे? शराबने मनुष्यको आजतक मौतके सिवा कुछ नहीं दिया है।

रवि– और मौतके सिवा मुझे कुछ चाहिए भी नहीं। ( लडखडाते हुए ) जहाँ बेखुदीमें...कदम .. लडखडाये... वही... राह मुझको... दिखाई... गई है।

अण्णा– बंद करो यह बकवास। लानत है ऐसी संतानपर, जो माँ–बाप के नामपर एक कलंक हो, धब्बा हो। कल सोसायटी में मैं मुंह न दिखा सकूंगा। कमसे कम अपने ससुर की इज्जतका तो खयाल किया होता, लेजाओ इसे मेरे सामनेसे।

रवि– मैं...मैं... किसी ससुरवसूर को नहीं जानता, आप जानते होंगे। २५ हजार रु. दिये हैं न उसने आपको। किसी की इज्जत जहन्नुममें क्यों न जाए, मुझे कोई परवाह नहीं...है,...समझे।

अण्णा– ( रवि के मुंहपर तमाचा लगाते हुओ ) क्या कहा। ( चंदा दौडती हुई आती है )

चंदा– ( जोरसे ) 'पिताजी' ये क्या किया आपने ( रवि को लेकर जाती है। माई भी उसके साथ जाती है, अंतमें अण्णा भी जाते हैं )

( कॉलेज की लॉनपर सुरेश अपने विचारों में डूबा बैठा है, इतनेमें सचीन आता है )

सचीन– सुरेश यार, किस सोच में डूबा है? कुछ चक्कर, कुछ गोलमाल की बात जरूर होगी।

सुरेश– अरे यार, काहे का चक्कर और काहेका गोलमाल, यूँही बैठा था ।

सचीन– अैसाही तू कभी बैठ नहीं सकता । बता क्या सोच रहा था ?

सुरेश– सोच रहा था कि क्या इन्डियामें अब गुंडों का राज आने वाला है ?

सचीन– ऐसे कैसे हो सकता है मेरे दोस्त ! भारत दुनियाका अकेला देश है, जिसमें सभी धर्म, जाति, पंथ और विचारों के लोग एकसाथ भाईचारेको निभाते है ।

सुरेश– और शायद इसीलिए आज एक के बाद एक अैसे लोगोंकी हत्या की जा रही है, जिनके बगैर देश को स्थिती लाठी बगैर अंधे जंसी हो सकती है ।

सचीन– अरे बुद्दू, अंधे की एक लाठी गई तो क्या उसे दूसरी नहीं मिल सकती ?

सुरेश– कौन जाने तब तक वह बेचारा बचेगा भी या नहीं ।

सचीन– छोड दे उन बातोंको । मुझे तो लग रहा था तुझे जब आज हरियाली नजर आई है, तो जरूर कोई खास बात होगी ।

सुरेश– मुझे हरियाली क्यों नजर आने लगी बे, मूझे तो रेगीस्तान नजर आ रहा है, रेगीस्तान; जिधर देखो धूप ही धूप फैली है, छाँव का कहीं भी नामोनिशान नहीं है ।

सचीन– जरा सीधेसे बात करना यार, कुछ समझमें नहीं आ रहा है ।

सुरेश– देख बे, मुझे रेगीस्तान नजर आ रहा है जीसमें अपना रवि फसा है, अगर रवि के घरवालों जैसा चक्कर हमारे घरवाळे चलाएँ तो मैं कहीं का न रहूँगा ।

सचीन– तेरे घरवालोंको अब क्या सूझी है ।

सुरेश– तुझे वह डोनेशनवाली बात मालूम है न, मैंने कुछ दिन पहले १० हजार रु. भरे है मालूम है वे रुपये कहाँसे लाए गये हैं ?

सचीन– मुझे क्या पता तूने कहाँ डाके डाला क्या मुझे बताकर गया था ?

सुरेश– पहले तो मुझे भी मालूम नहीं था । पिताजी मामासे दहेज के रूपमें वे लाये हैं, और इम्तहान के बाद मामा की लडकी के साथ शादी करना चाहते हैं । मुझे पहले मालूम होता तो वे रुपये मैं कभी न लेता ।

सचीन– लेकिन क्या हर्ज है मामाकी लडकी से शादी करनेमें ।

सुरेश– अरे पगले, शादी के पहले हमें कुछ सोचना चाहिए या नहीं ? हमारे अपने भी कोई विचार हैं । हम आखिर बडोंका कहना मानें कबतक ?

सचीन– जबतक हम लोग अपने पैरोंपर खडा रहना नहीं जानते तबतक ।

सुरेश– ( रूआँसा होकर ) तो क्या मुझे ये शादी करनी पडेगी ?

सचीन– ऑफ कोर्स ! व्हाय नॉट ? तेरी ये शादी जरूर होगी और मैं उसमें लड्डू खाउंगा ( जोरसे हसने लगता है )

सुरेश– नहीं . नहीं मैं शादी कभी नहीं करूंगा, मेरी शादी मेरी मर्जीसे होगी, मेरी मर्जीसे ( इतनेमें रवि नशेंमें झूमता हुआ आता है )

सचीन– ( रविको संभालते हुअे ) रवि यार कितनी पी है, जरा तो खयाल होता, कॉलेज की तरफ आया है और शराब पिकर ।

रवि– सुरेश तेरी शादी न तेरी मर्जीसे होगी न तेरे बापकी मर्जी से, तेरी शादी मेरी मर्जीसे होगी मेरी मर्जीसे ( सचीन की तरफ देखकर ) क्यों बे सची, मैंने शराब पी है क्या, नहीं... पिलाई गई है, ( सुरेश की तरफ तरफ उंगली उठाकर ) मैं इसकी शादी अपनी वर्षा के साथ करूंगा, क्यों बे करेगा कि नहीं ( इतनेमें वर्षा भी वहां आ जाती है । )

वर्षा– तुम लोग इधर क्या रहे हो, और रवि तू क्यों झूम रहा है ? पी है क्या ? बहुत अच्छे । दूसरों को सुख न दे सकते हो, दुःख तो मत दिया करो ।

रवि– वर्षा...वर्षा... इधर आओ ( वर्षा रवि के पास आता है )

वर्षा– क्या है ?



रवि– बैठो तुम, मेरा कहना मानो .. तुम सुरेश के साथ शादी करो– बहुत अच्छा लडका है, तुम तो जानती हो उसे ।

वर्षा– बस और कुछ कहना है ? मैं इस जनममें शादी नहीं करनेवाली समझे ।

सचीन– रवि, इसकी बातोंमें मत आओ । पासवाले गांवका लडका बी. एस्सी. पास करके आर्मी में गया था । युद्ध में एक पैर निकम्मा हो चुका है । अब गांव आकर खेती कर रहा है । एक दिन की जान पहचान में इन दोनोंने शादी कर ली है ( वर्षा की तरफ ऊंगली उठाकर ) वो देखो लायसन्स कैसे झूल रहा है उसके गलेमें । ( रवि और सुरेश वर्षा की तरफ देखने लगते है )

वर्षा– रवि मुझे माफ करना । तुम्हारे दिलसे निकलने के लिए और कोई रास्ता भी तो न था । आत्महत्या को मै पाप समझती हूँ । मै जानती हूँ अैसी लडकियाँ डरपोक होती है ।

रवि– क्या तुम्हारी शादीमें तुम्हारे मातापिता कोई भी शरीक नहीं थे ।

वर्षा– नहीं सिर्फ हम दोनों और मामने भगवान की मूर्ति ।

रवि– फिर तो अच्छा हुआ । उन लोगोंको भी पता लगना चाहिए कि वे हमारी सुनते तो हम भी उनकी नहीं मानेंगे ।

सुरेश– ( एकाएक चुटकी बजाकर ) 'आइडीया' अब मैं भी अपना कमाल दिखाता हूँ घरवालोंको अभी जाकर नैना से शादी कर आता हूँ । नौकरी तो अब मूझे मिलनेही वाली है, फिर देखता हूँ कैसे मामा की लडकी से शादी करते हैं ( सचीन की तरफ उंगली उठाकर ) और यह बुद्दू कैसे लड्डू खाता है । ( सभी खडे रहते हैं )

रवि– तुम लोग तो जीवन की परीक्षामें पास हो गये । मैं कॉलेज की परीक्षा में फर्स्ट आता रहा, मगर जीवन की असली परीक्षामें फेल हो गया सच मुच फेल ! चलो दोस्तों, अपुन के लिए तो जिंदगी एक गम का सागर ही बन गई है, जाकर उसमें डूब मरना ही पडेगा । ( सभी जाने लगते हैं )

सचीन– ( जाते जाते ) हम तो भई संन्यासीही रहना पसंद करेंगे । शादी का ढकोसला नही रचाएँगे । ( सभी जाते हैं )

*With Best Compliments from*

**M/s. BIO-VISUAL PRODUCTS**

Zamistanpur HYDERABAD – 500 048

Designers and Producers of Scientific teaching aids such as wall charts, Film Strips, Video Films

and

It's Sister Concern

**M/s. MICRO-VISUAL SLIDES PVT. LTD.**

Zamistanpur HYDERABAD – 500 048

Makers & Suppliers of Micro Slides, Museum Specimens and Class Work Material

GRAMS : "VISUALAIDS"    PHONE NO: : 64203

# BARAMATI GRAPE INDUSTRIES LIMITED

P. O. PIMPALI, TAL. BARAMATI, DIST. POONA

**Manufacturers of Good and Healthy BOSCA & CINZANO WINES Purely from Grapes under Italian technical know--how**

**BOARD OF DIRECTORS**

| | |
|---|---|
| DR. C. ROSSI | Chairman |
| MR. J. J. KHAMBATA | Director |
| MR. R. K. JAIN | Direcror |
| MR. D. G. PAWAR | Director |
| MR. S. D. LALLA | Director |
| MR. N. S. GHORPADE | Director |
| MR. S. S. GANDHI | Director |
| MR. P. N. JACHAK | DIrector |
| MR. S. S. HIREMATH | Director |
| MR. R. B. GHOLAP | Director |
| MR. S. N. CHAVAN | Director |
| MR. S. S. LONKAR | Director |
| MR. T. G. GAWADE | Director |
| MR. V. T. KOKARE | Director |
| MR. J. M. MORE | Director |
| Mr. S. B. WAGH | Chief Executive |

PHONE : 240 BARAMATI

GRAM : " BARGRAPE " BARAMATI




# A Poem on 'Dowry'

What is this ' Dowry ' ?
The groom who demands, the father who backs him
Are both tyrants worst.

' Dowry ' enslaves the bride's father,
Who accepts eternal slavery
To provide for his daughter's happiness !

What a mockery !
Bargain for a girl's happiness
With heartless traders in wealth !

Man and young that you are,
Demand not Dowry;
Dowry brings nature's dethronement.

Bridegroom that you are to-day,
When to-morrow a daughter you have,
Dowry, like a boomerang, you, will slay !

Mr. Bhilare D. M. T. Y. B. A.

---

# Words of Wisdom

My idea of nationalism is that my country may become free, that if need be the whole of the country may die, so that human race may live. There is no room for race hatred here. Let that be our nationalism.

—Mahatma Gandhi

Our history is not modern. It is like a great river its source back in silence. Many ages, many races, many religions have worked at it. It is all in our bloodstream. The more Indian culture changes, the more it remains the same.

—Dr. S. Radhakrishnan

It is said that a man without religion is like a horse without a bridle. We need the discipline of religion to civilize our nature, to restrain the greed, the callousness and the brutality in us.

—Dr. S. Radhakrishnan

# CAN THE PRESENT SOCIETY SURVIVE ?

Miss A. S. Kulkarni, T. Y. B. A.

Many centuries ago man lived alone in his cave. As civilization reached him, he began to feel the need for others, and desired to live in a community of people, each dependent on the other. With the effect of industrialization reaching our country, man's dependence on others increased as the need for employment to support himself and his family, increased. Thanks to Charles Darwin, the scientist and sociologists, man has learnt to live in groups, communties and even herds like animals. With the increase of opportunities of improving life, personal ambitions have entered men's lives, resulting in cut-throat competition, jealousy, covetousness, hope, despair, violence, murder. Present Indian society is a complex variety of individuals and their multiplicity of desires.

Since the end of the golden age of Nehru, India has moved into an enormous society having people and groups of contrary aims and objectives. Add to this social differences, caste-hatred' economic inequalities, easy and quick political opportunities. The age of great politicians of spotless images has gone. To-day, is the age of half-educated, misdirected, aimless, opportunist, greedy, mediocre politicians, for whom ' self before country is the rule.

Fear of God and respect for religion has disappeared. Respect for parents and individuals, sympathy for the weak and the poor, is no more a virtue. The only virtue, to-day, is to exploit the weak and the poor, crush the needy and push ahead through corruption, deceit, nepotism and what not. Our mentality is mean, our interests are selfish, and money, is our goddess.

Man is man's enemy. I am my own rival. Pretence, hypocrisy, corruption, are the watch-words. Ethics has been forgotten. Bureaucracy, with its hungry eyes and greasy palms rules the society. The average politician, who has nothing to give, only wants to swallow the society's funds with the help of anti-national, anti-religious and anti-social ' rakshasas '. Our ancient tradition has been forgotten. The message of purity, honesty, service, love and freedom of Vivekananda is a joke today. There is politics of caste, politics of religion and politics of power. Human rights have no sense. A poor man is a slave and society is at the mercy of men without principles, who will not stop selling our country for a few gold coins and a bottle of whiskey !

Social law, law-courts are no exceptions. Laws are made and strictly enforced on the poor, helpless, honest citizens. Powerful politicians, smugglers, mafia-gangs, goondas, corrupt policemen break all rules They are protected by bigger politicians. Honest collectors like Mr. Bhatia are transfered or punished for bringing to light corruption. Men like Mr. Khairnar are beaten and shot at by goondas who have the politicians at their back. Our life in society is uncertain, risky.

There is a fall in standards everywhere. Moral, religious and educational standards have fallen. Governors and Chief Ministers use their power and position to change examination results. Getting a degree, today, is so easy that many pass and there are not enough jobs for all. Teachers and students neglect their duties. Education has lost its value. Every year new courses start in universities and students are confused.

Can the present society survive ? This is a question that is easy to answer. The present society cannot survive. But, there is a ray of hope. If young men and women of to-day think of our dear country's tradition and culture and put their faith in religion, respect for elders, show honesty and sincerity in their work, a new and clean society will be born. If Mr. Rajiv Gandhi, our Prime Minister, means what he says and does what he means our society will improve and grow to heights. Otherwise destruction is near our doors. This is the writing on the wall.

A SIGN OF QUALITY PRODUCTS

OMEGA

Manufacturers of :

DIGITAL INSTRUMENTS

★ Digital IC Tester ★ Digital Capacitance Meter ★ Digital Multimeter ★ Digital Panel Meters ★ Logic Probe / Pulser ★ Digital Wall Clock / Stop Clock.

ELECTRONIC INSTRUMENTS

★ Linear IC Tester ★ IC Regulated Power Supplies (Fixed, Dual Dual Tracking, Triple Output ) ★ Oscillators ★ VTVM ★ FETM Volt-Ohm-Meter ★ Output Power Meter A. F. ★ Component Testers ★ Timers ★ Null Detectors & many more.

ELECTRONIC TEACHING AIDS

★ Electronic Training Boards 125 different types

Newly developed :

PLL IC 565, Differential Comparater IC 710, VR IC 723, Three Terminal V. R. ★ DC Power Supplies ★ Semi-conductor Devices ★ Triac Characteristics ★ Digital & Linear IC Trainer

★ Logic Training Boards 25 different types

★ Demonstration Boards 15 different types

Newly developed :

For detailed specifications please contact :

OMEGA ELECTRONICS

36, Hathi Babu Ka Bagh. JAIPUR - 302 006

Gram : OMEGA Phone : 75460

Works : 28 E & F, Malviya Indl. Area, Jaipur - 302 017 Ph. 68157

# Introduction to Computer

**Jagtap Y. K., T. Y. B. Sc. ( Maths. )**

Kilpatric says, learning is learning to think, thinking is reflective abstraction. Learning does have a recursive quality. Each step is based on the preceding ones and draws strength from them. We have to turn a concept over in our minds again and again. Further he says, mind is a computer. Each age has its own measure. Descartes described every thing in terms of machines. We explain every thing in terms of computers. Learning is information processing, it is storage, retrieval and coding of information. However, the mind as a computer is just a metaphor and it is not a complete metaphor.

The world's first digital computer called the Mark I was developed jointly by International Business Machines and Harvard University in 1944. It was a cumber some, electro-mechanical device of every limited capacity. Once the concept had been established, however,the technology developed rapidly. An all electronic ( vacuum-tube ) version of the Mark I, called the ENIAC was developed at the University of Pennsylvania in 1974.

Today, computers come in a variety of shapes and sizes. Large general-purpose computers are used in many factories, business, universities, hospitals, and government agencies to carry out sophisticated business and technical calculations. Smaller, less expensive computers ( called mini computers or micro computers, depending on their size ) have also become very abundant. Some of these devices are small enough to fit on a desk top. Such computers are typically used for a wide variety of personal, educational, commercial, and technical applications. Their use tends to complement rather than replace, the use of large, general-purpose computers. There is considerable evidence that the desk top micro computer will become an increasingly common household item in the years ahead.

Another very significant recent innovation has been the development of the " microprocessor ". This is a single electronic chip, about 1 cm square, which contains the logical circuitry for a complete digital computer. Microprocessors are widely used in many consumer items such as digital watches, calculators, automobiles, microwave ovens, cameras and toys. Modern desktop computers utilize microprocessor based computer circuitry. All digital computers, regardless of their size, are basically electronic devices that can transmit, store, and manipulate information ( data ). Because of its extremely high speed, a computer can carry out calculations in just a few minutes that would require months,perhaps, even years if carried out by hand. Simple tasks, such as adding two numbers, can be carried out in a fraction of a microsecond ( 1 microsecond $= 10^{-6}$ second ). A computer practically never makes mistakes of its own accord. Every piece of information that is stored within the computer's memory is encoded as some unique combination of zeros and ones. These zeros and ones are called bits ( binary digits ). Each bit is represented by an electronic device that is, in some sense, either "off" ( zero ) or " on " ( one ).

Thus, like- other electronic devices, computer is becoming a more popular device. To a developing country like India computer is really a boon.

( Reference from ' programming with basic ' schaum series. )



# क्रीडानिपुण – विद्यार्थी



के. व्ही. देशमुख, हॅण्डबॉल ( पुणे विद्यापीठ संघात निवड )

## ★ आंतरविभागीय क्रीडास्पर्धक ★



ए. बी. शेख
व्हॉलीबॉल



एस. एल. कांबळे
हॅण्डबॉल व बॉस्केटबॉल



एम. बी. सय्यद
कबड्डी



के. एम. भापकर
क्रिकेट



डी. एस. जगताप
क्रिकेट



एस. ए. साळवे
खो-खो



एस. के. छाजेड
बुद्धिबळ



एस. एम. मोदी
बुद्धिबळ



आर. सी. बाफना
बुद्धिबळ



एस आर. राठोड
खो–खो



एम. एन. शितोळे
खो–खो



एस. बो गाढवे
कबड्डी



ए. डब्ल्यू. गायकवाड
शरीर सौष्ठव



ए. जे मोधा
बॅडमिंटन



एस. जी. शहा
बॅडमिंटन



डी. बी. गुजर
टेबल टेनिस





एस. डी. इंगुले
मैदानी स्पर्धा



बी. एम. होनराव
कुस्ती



व्ही. टी. भिसे
कुस्ती



एस. पी. झगडे
कुस्ती, मल्लखांब व मैदानीस्पर्धा



टी. पी. वणवे
कुस्ती व मल्लखांब



एस. एस. घोळवे
मल्लखांब



एन जी. लोणकर
कुस्ती



एस. सी. सोमाणी
कुस्ती



एस. के. टकले
कुस्ती

## ★ आंतरविभागीय क्रीडास्पर्धक ★



पी. डी. सावंत
बॉस्केट बॉल



के. एम. पोटे
खो-खो व हॅण्डबॉल



यु. ए. गडीकर
टेबल टेनिस व खो-खो



आर सी. शेटे
व्हॉलीबॉल



पी. व्ही. जैन
व्हॉलीबॉल



जे. एस. शिंदे
टेबल टेनिस व हॅण्डबॉल



एम. ए. पांडकर
हॅण्डबॉल व बास्केट बॉल



एम. एम. दोशी
बॉस्केट बॉल



पी. एन. साठे
बॉस्केट बॉल व हॅण्डबॉल



एस. व्ही. साठे
बॉस्केट बॉल

## ★ आंतरविभागीय क्रीडास्पर्धक ★



कु. शुभांगी फरसोळे
बॅडमिन्टन



कु. ज्योत्स्ना रणसिंग
बॅडमिन्टन



कु. भारती सुर्वे
बॅडमिन्टन



कु. सुनीता जाधव
बॅडमिन्टन



कु. रजनी नाईक
खो-खो व मैदानी स्पर्धा



कु. शकीला शेख
खो-खो



कु. प्रेमा तावरे
खो-खो



कु. अनिता दोशी
खो-खो

## आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा ( विजयी संघ )



कुस्ती



मल्लखांब



बुद्धिबळ

## आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा ( विजयी संघ )



खो-खो



हॅण्डबॉल



बास्केटबॉल

## आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा ( विजयी / उपविजयी संघ )



बॅडमिंटन
(विजयी)



टेबल टेनीस
(विजयी)



खो–खो
(उपविजयी)

## आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा ( उपविजयी संघ )



व्हालीबॉल



बॅडमिंटन

## ★ राष्ट्रीय सेवा योजना ( एन्. एस्. एस्. ) ★



प्राचार्य, प्रोग्रॅम ऑफिसर
व
गटप्रमुख

## राष्ट्रीय छात्रसेना



एस. एस. जोगळेकर, सीनियर अन्डर ऑफिसर
पुणे ग्रुपच्या आर्मी विंगमधील सर्वोत्कृष्ट छात्रसैनिक
वीर सावरकर ट्रॉफी विजेते



जी. आर. गानबोटे
सीनियर अन्डर ऑफिसर



ए. आर. वाघ
ज्युनियर अन्डर ऑफिसर, ऑक्टोबर १९८५, आग्रा येथे झालेल्या पॅराजंपिंग कॅम्पमध्ये सहभाग



पी. एस. आहुजा
ज्युनियर अन्डर ऑफिसर



व्ही. डी. खैरे
कं. क्वार्टर मास्टर सार्जंट



एन. सी. सी. – रँक होल्डर्स

# कार्यवृतांत

## जिमखाना अहवाल

**प्रा. ए. एस्. किणिगे, चेअरमन**
**प्रा. ए. एस्. मेहेर, प्रमुख– शारीरिक शिक्षण विभाग**

सन १९८५–८६ या वर्षी आमच्या महाविद्यालयाने आंतरमहाविद्यालयीन बुद्धीबळ, टेबलटेनीस बॅडमिंटन, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, हँडबॉल क्रिकेट, खो–खो, मैदानी स्पर्धा, मल्लखांब, कुस्ती, वजन उचलणे व शरीर सौष्ठव इत्यादी स्पर्धेत भाग घेतला त्यात आमचे खालील संघ यशस्वी ठरले आहेत.

१ ) **बुद्धीबळ–** शिरूर येथे झालेले आंतर महाविद्यालयीन बुद्धीबळ स्पर्धेत एकूण गुणात प्रथम क्रमांक मिळवून अजिक्यपद संप दिले. तियेच झालेल्या आंतर-विभागीय स्पर्धेत श्री मोदी एस् एम्, श्री बाफना आर. सी. व श्री छाजेड एस्. के. यांची पुणे जिल्हा क्रिडा विभागाच्या बुद्धीबळ संघात निवड झाली.

२ ) **टेबल टेनिस ( मुले )–** कळंब येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत अंतिम सामन्यात पिंपरी इजिनिअरींग कॉलेजचा ५ विरुद्ध ३ गुणांनी पराभव करून अजिक्यपद संपादिले. बारामती येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत श्री दिपक गुजर याची पुणे जिल्ह्याच्या कप्तानपदी व श्री. गडीकर यु. ए. व व शिंदे जे एस. यांची संघामध्ये निवड करण्यात आली. या संघाने आंतर विभागीय स्पर्धेत उपविजेते पद मिळविले आहे.

**बॅडमिंटन ( मुले-मुली )** दौंड येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन मुले संघाने उपविजेते पद तर बॅडमिंटन मुली संघाने विजेते पद मिळविले. आमच्याच महाविद्यालयात झालेल्या विभागिय बॅडमिंटन स्पर्धेसाठी श्री. शहा एम्. जी. व श्री अजय गोधा तर मुलींच्या संघात कु. जोस्ना रणसिंग, कु शुभांगी फरसोले, कु. भारती सुर्वे, कु. सुनिता जाधव यांची निवड करण्यात आली होती.

४ ) **हँडबॉल ( मुले )–** आमच्याच महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत हडपसर कॉलेजचा पराभव करून कै. राजेश देवळे चषक पटकाविला. आंतर विभागीय स्पर्धेसाठी श्री. के. व्ही. देशमुख यांची पुणे जिल्ह्याच्या कप्तानपदी तर श्री. एस्. एल्. कांबळे, श्री. शिंदे जे. एस्. श्री. साठे पी. एन्., श्री. पोटे के. एम्., श्री. पांडकर एम्. ए. यांची पुणे जिल्हा क्रिडा विभागातर्फे निवड करण्यात आली. आंतर विभागीय स्पर्धेत या संघाने उपविजेते पद मिळविले आहे. श्री. के. व्ही देशमुख यांची हैद्राबाद येथे झालेल्या आंतर विद्यापीठ हँडबॉल स्पर्धेसाठी पुणे विद्यापीठाच्या संघात निवड करण्यात आली.

५ ) **बास्केट बॉल ( मुले )–** सासवड येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन बास्केट बॉल स्पर्धेत या संघाने अजिक्यपद संपादिले आहे. अंमळनेर येथे झालेल्या आंतर विभागीय स्पर्धेसाठी श्री. कांबळे एस्. एल्. यांची पुणे जिल्ह्याच्या कप्तानपदी तर श्री. पी. डी. सावंत, श्री. एस्. एम्. दोशी, श्री. एस्. व्ही. साठे, श्री पी. एन्. साठे व पांडकर एम्. ए. यांची संघात निवड करण्याते आली होती.

६ ) **कुस्ती–** शिरूर येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत एकूण गुणात प्रथम क्रमांक मिळवून एकूण चँपीयनशिप मिळवली आहे. या स्पर्धेत खालील कुस्तीगिर आपापल्या वजन गटात यशस्वी झाले आहेत. श्री. भिसे व्ही. टी., श्री. टकले एस्. के., श्री. होनराव बी. एम्., श्री. लोणकर एन्. जी., श्री. वनवे टी. पी., श्री. झगडे एस्. पी., श्री. सोमाणी एस्. सी. वरील खेळाडूंची जळगाव येथे झालेल्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्याच्या कुस्ती संघात निवड करण्यात आली.

७ ) **मल्लखांब–** आमच्या महाविद्यालयात झालेल्या आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धेत एकूण गुणात

प्रथम क्रमांक मिळवून अजिक्यपद संपादिले आहे. भुसावळ येथे झालेल्या आंतर विभागीय स्पर्धेसाठी श्री. वनवे टी. पी. यांची कप्तानपदी तर श्री झगडे एस्. पी. व श्री. घोळवे एस्. एस्. यांची पुणे जिल्हा मल्लखांब संघात निवड करण्यात आली.

८ ) **खो-खो ( मुले )**– आमच्या महाविद्यालयात झालेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत अंतीम स्पर्धेत सोमेश्वर महाविद्यालयाचा पराभव करून अजिक्यपद संपादिले आहे. फैजपूर येथे झालेल्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी श्री, पोटे के. एम्., श्री. गडीकर यु. ए., श्री साळवे एस्. ए., श्री. शितोळे एम. एन्. व श्री. राठोड एस्. आर., श्री. ओसवाल एम्. बी यांची निवड करण्यात आली.

आमच्या महाविद्यालयाचे कबड्डी (मुले), व्हॉलीबॉल (मुले) खो–खो (मुली) संघाने उपविजेते पद मिळविले असून नांदगाव येथे झालेल्या आंतर विभागीय स्पर्धेत श्री. सय्यद एम्. बी. व श्री. गाडवे एस्. बी. तर सिदखेडा येथे झालेल्या आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत श्री शेख एम्. बी. यांची कप्तानपदी तर श्री. देशमुख के. व्ही., जैन आर. व्ही. व शेटे आर. व्ही यांची संघात निवड करण्यात आली तसेच फैजपूर येथे झालेल्या आंतर विभागीय खो–खो ( मुली ) स्पर्धेत कु. शकीला शेख यांची कप्तानपदी तर कु. प्रेमा तावरे, कु. रजनी नाईक व कु. अनिता दोशी यांची संघामध्ये निवड करण्यात आली.

त्याचप्रमाणे मालेगाव येथे झालेल्या आंतर विभागीय मैदानी स्पर्धेत श्री. इंगुले एस. डी., श्री. गुजर डी. बी. श्री. झगडे एस्. पी. व कु. रजनी नाईक यांची तर जळगांव येथे झालेल्या आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेत श्री. जगताप डी. एस. व श्री भापकर के एम्. यांची निवड करण्यात आली होती. भुसावळ येथे झालेल्या आंतर विभागीय शरीर सौष्ठव स्पर्धेत श्री. ए डब्लू. गायकवाड यांची निवड करण्यात आली.

या वर्षी महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन हँडबॉल मुले, मल्लखांब, मैदानी स्पर्धा व खो–खो ( मुले / मुली ) क्रिकेट मुले तर आंतर विभागीय टेबल टेनिस ( मुले / मुली ), बॅडमिंटन ( मुले / मुली ) व हँडबॉल ( मुले ) या स्पर्धांचे यशस्वी संयोजन केले.



हे संयोजन करतांना प्राध्यापक व सेवक वर्ग यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

## राष्ट्रीय छात्र सेना

कंपनी कमांडर–सेकंड लेफ्टनंट प्रा. **एम्. व्ही. गोडसे**

२८ जून १९८५ रोजी " २ " महाराष्ट्र एन्. सी. सी. बटालियनच्या अधिकाऱ्यांची बैठक.

बटालियन कमांडर लेफ्टनंट कर्नल एस्. वाय्. कर्वे यांचे १९८५–८६ च्या शैक्षणिक वर्षातील कार्याविषयी व उपक्रमाविषयी मार्गदर्शन.

**प्रवेश**

१६० छात्रांच्या पूर्ण कंपनीला अनुमती. १० जुलै ८५ पासून प्रवेश सुरू व ३१ जुलै पर्यंत पूर्ण.

**ट्रेनिंग व्यवस्था**

बटालियन ऑफिसकडून मिळालेल्या ट्रेनिंग प्रोग्रॅम प्रमाणे दर रविवारी नियमित ट्रेनिंग ड्रील, वेपन ट्रेनिंग मॅप रिडींग, फिल्ड क्राफ्ट, सेक्शन लीडींग, बॅटल क्राफ्ट, सिव्हील डिफेन्स, समाज सेवा, वृक्षारोपण व संवर्धन आणि रक्तदान शिबीर.

**मानवंदना**

१५ ऑगस्ट १९८५ रोजी प्रमुख पाहुणे उप–प्राचार्य बी. बी. पाटील यांना सिनियर अंडर ऑफिसर गानबोटे जी. आर. व ज्युनियर अंडर ऑफिसर आहुजा पी. एस्. यांनी मानवंदना दिली. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी, सेवक, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते

**रक्तदान**

१५ ऑगस्ट १९८५ रोजी एन्. सी. सी. मधील एकूण १७ छात्र सैनिकांनी स्वेच्छेने रक्तदान केले.

**वृक्षारोपण**

एन्. सी. सी. मधील १६० छात्रसैनिकांनी २० सप्टेंबर ८५ रोजी खेळाच्या मैदानाचे बाजूंनी निल-गीरीची १६० रोपे लावली.

**सत्कार**

सिनियर ऑफिसर सुनील जोगळेकर व ज्युनियर अंडर ऑफिसर अमोद वाघ २३ जानेवारी १९८५



रोजी दिल्ली येथे एन. सी. सी. संचलनात सहभागी झाले होते. त्यांचा व पुण्यातील इतर छात्रांचा सत्कार पुण्याचे महापौर मा. श्री. दत्ता एकबोटे यांच्या हस्ते पार पडला.

**वार्षिक प्रशिक्षण शिबीर**

२८ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर १९८५ भोर–आंबेघर येथे पार पडले. या वार्षिक प्रशिक्षण शिबीरामध्ये ७३ छात्रसैनिक सहभागी झाले होते. शिबीरामध्ये सर्व छात्रसैनिकांनी विचित्रगड, रायरेश्वर व रायगड हे तीन किल्ले पायी चढण्यामध्ये भाग घेतला. तसेच ड्रील, सांस्कृतिक कार्यक्रम, बायोनेट फायटिंग या स्पर्धामध्ये पहिला क्रमांक मिळविला.

**फायरिंग**

१ अधिकारी व ७३ छात्रसैनिकांनी ७.६२ एस्. एल. आर. रायफलने, मशिनगनने व स्टेनगनने फायरिंग केले.

**परीक्षा निकाल**

१७ व २१ फेब्रुवारी ८५ रोजी " बी " व " सी " सर्टिफिकेट परीक्षा पार पडल्या.

" सी " सर्टिफिकेट – ६ पैकी ६ उत्तीर्ण

" बी " सर्टिफिकेट – १५ पैकी ९ उत्तीर्ण

**राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी परीक्षा**

डिसेंबर ८५ मध्ये मुंबई येथे प्रवेश परीक्षा झाली. ती परीक्षा कॅडेट हर्षवर्धन पाटील, कॅडेट भोसले रवि, कॅडेट संग्राम कदम यांनी पहिल्यांदा दिली.

**एन्. सी. सी. विशेष उल्लेख–पॅरा जंपींग**

सेकंड महाराष्ट्र बटालियन एन्. सी. सी. पुणे यांचे मार्फत ज्युनियर अंडर ऑफिसर अमोद वाघ ( एस. वाय. बी. कॉम ) यांची निवड झाली होती हा कोर्स २ सप्टेंबर ८५ ते ५ ऑक्टोबर ८५ या कालावधीत आग्रा येथे पार पडला. या एक महिन्याच्या कोर्समध्ये श्री. वाघ ए. आर यांनी रशियन बनावटीच्या विमानातून चार उड्या घेतल्या

**एन्. सी. सी. पुणे ग्रुप आर्मि विंग बेस्ट कॅडेट**

सिनियर अंडर ऑफिसर सुनील जोगळेकर ( टी. वाय. बी कॉम ) यांची एन्. सी. सी. ग्रुप पुणे



मार्फत आर्मि विंगमधुन १९८५-८६ चा बेस्ट कॅडेट म्हणून निवड झालेली आहे. ही निवड एन्. सी. सी. मधील एकूण सेवा, मिळवलेली सर्टिफिकेटस् आणि एकूण कॅम्पस या गुणवत्तेवर होत असते. यासाठी वीर सावरकर याच्या नावाची ट्रॉफी पुणे येथील प्रकाश मित्र मंडळामार्फत दरवर्षी देण्यात येते. ही ट्रॉफी दि ३० डिसेंबर ८५ रोजी एन्. सी. सी." डे " च्या दिवशी पुण्याचे महापौर मा. श्री. दत्ता एकबोटे यांचे हस्ते निनियर अंडर सुनील जोगळेकर यांना प्रदान करण्यात आली.

**मानवंदना**

२६ जानेवारी ८६ रोजी मा. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांनी मानवंदना स्विकारली.

सिनियर अंडर ऑफिसर सुनिल जोगळेकर, सिनियर अंडर ऑफिसर गानबोटे जी. आर., व ज्युनियर अंडर ऑफिसर अमोद वाघ यांनी मानवंदना दिली व संचलन केले.

या प्रसंगी एन्. सी. सी. " बी " व " सी " सर्टिफिकेट वाटण्यात आली.

या कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी, सेवकवर्ग व विद्यार्थी हजर होते.

## राष्ट्रीय सेवा योजना

प्रमुख– **प्रा. डी. बी. जगताप**

१९८५–८६ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजनेत २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. व पुढील उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच कांही राबविण्यात येत आहेत.

**दत्तक खेडे योजना**

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे पुढील गावे दत्तक घेण्यात आली.

१ ) बऱ्हाणपूर २ ) पवईमाळ ३ ) तांदुळवाडी ४ ) गोजुबावी ५ ) मळद

वरील गावात स्वच्छता व आरोग्य मोहिम, एक दिवसाचे शिबीर, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन श्रमदान, पोलिओ लस टोचणे, युवक वर्षानिमित्त जनजागरण दिंडी, उर्जा विषयक माहिती इ. तसेच मौजे पवईमाळ

या ठिकाणी मा. भाऊसाहेब वानखेडे, उपजिल्हाधिकारी यांच्या सहकार्याने गावठाण, रेव्हेन्यू सजा इ बाबी मान्य झाल्या. तसेच पंचायत समितीचे सभापती, उपसभापती यांच्या उपस्थितीत मा. दिनकरराव शिंदे, गटविकास अधिकारी यांनी मौजे पवईमाळसाठी ग्रामपंचायतचे अपुरे राहिलेले काम पूर्ण करण्यांसाठी अनुदान तसेच काढलेल्या दोन खोल्या बांधकामासाठी सिमेंट, पत्रा व लोखंड इ. साठी लागणारा सर्व खर्च अनुदान म्हणून देण्याचे मान्य केले. या बाबतीत गावाच्या अडचणीकडे एक मध्यम यंत्रणा म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेने या कामी पदाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते व त्या मध्यस्थीस यश मिळून सदरचे अनुदान मिळाले.

तसेच गोजूबावी या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी शाळेच्या एका खोलीचा पाया खोदला व ती इमारत संपूर्णपणे पंचायत समितीच्या सहकार्याने अनुदानातून पूर्ण करण्यात आली. त्या खोलीसाठी मा. मुख्यमंत्री फंडातून १० हजार रुपये मिळाले होते. याबाबतही राष्ट्रीय सेवा योजनेचा मध्यस्थ यंत्रणा म्हणून उपयोग झाला. तसेच या महाविद्यालयाचे विद्यार्थी व गोजूबावी गावी शेती असणारे बारामती नगरपरिषदेचे विद्यमान नगरसेवक श्री. किरण गुजर यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच बऱ्हाणपूर येथे रस्त्यावर एस्. टी. स्टॅण्ड ( शेड ) बांधण्याबाबत संबंधीतांचे लक्ष राष्ट्रीय सेवा योजनेने वेधले असून लवकरच त्याची पूर्तता करण्याचे आश्वासन संबंधीत शासकीय अधिकाऱ्यांच्याकडून मिळाले आहे.

**सामाजिक वनीकरण**

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वृक्षारोपण पंधरवडा दि. १ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २९८५ पर्यंत साजरा करण्यात आला व या पंधरा दिवसात शहरात तसेच दत्तक खेड्यात आणि इतरत्र मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. सामाजिक वनीकरण विभागातर्फे सहकार्य मिळाले.

तसेच सामाजिक वनीकरण विभागातर्फे महाविद्यालयात सुरू असलेल्या रोपवाटिकेत राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहाय्य केले.

**दत्तक वस्ती व संथा योजना**

या वर्षी औद्योगिक वसाहत, सिद्धार्थनगर, बालसुधारगृह, महिला आश्रम, आंबेडकर वसाहत, प्रतिभानगर इ. संस्था दत्तक म्हणून घेण्यात आस्या. या ठिकाणी स्वच्छता, वृक्षारोपण तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, तिळगुळ, रक्षाबंधन, मनोरंजनाचे कार्यक्रम करण्यात आले. वरील संस्थांना विद्यार्थ्यांनी वारंवार भेटी देऊन हे उपक्रम राबविले

**सुंदर शहर योजना**

बारामती नगरपरिषदेचा समावेश "सुंदर शहर योजना" अंतर्गत झालेला आहे. त्यासाठी मा. नगराध्यक्ष श्री. विनोदकुमार गुजर यांच्या आवाहनानुसार स्टेडियम जागा, सिद्धार्थनगर, प्रतिभानगर इ. ठिकाणी स्वच्छता, वृक्षारोपण खड्डे तसेच वृक्षारोपण करण्यात आले. तसेच स्वच्छ शहर परिसर योजना जळोची, बारामती हद्दीत व दत्तक झोपड्यात राबविण्यात आली.

**वृक्षदिंडी**

दि. २–१०–८५ रोजी बारामती शहरातून सामाजिक वनीकरण विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या वृक्षदिंडीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी प्राध्यापक मोठ्या संख्येने सामील झाले होते. वृक्षदिंडीची सांगता मौजे मळद या ठिकाणी करण्यात आली त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण समारंभ बारामती विभागाचे उपजिल्हाधिकारी मा. भाऊसाहेब वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. संयोजक प्रसिद्ध बागाईतदार भोंगळे बंधू यांनी केले. त्या ठिकाणी गावकरी देखील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांसमवेत व शहरातील हायस्कूलमधील विद्यार्थ्यांसमवेत सामील झाले होते.

**एक दिवसाची शिबीरे**

दत्तक गावातून म्हणजेच मौजे पवईमाळ, बऱ्हाणपूर, तांदुळवाडी, गोजुबावी, मळद इ ठिकाणी विद्यार्थ्यांचे गट पाडून एक दिवसाची शिबीरे आयोजित करण्यात आली. तसेच त्या ठिकाणी श्रमदान, वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम इ. कार्यक्रम राबविण्यात आले.

**रक्तदान शिबीर**

रक्तदानासारख्या अतिशय पवित्र कर्तव्य असलेल्या कार्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दोन्ही राष्ट्रीय दिनी रक्तदान करतात.





**महिलांसाठी उपक्रम**

१ ) ग्रामीण भागातून शिबिराच्या वेळी महिला वर्गात हुंडा, अंधश्रद्धा, आरोग्य इ. बाबत जागृतीचे काम मुलींनी हाती घेतले. हळदीकुंकू समारंभ, रांगोळी प्रदर्शन इ. समारंभ आयोजित करून बालसंगोपन व शारीरिक स्वच्छता यांचे महत्व पटवून देण्यात आले.

२ ) पुण्याला महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचलनालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या "राष्ट्रीय युवती शिबीरात" राष्ट्रीय सेवा योजनेतील ५ विद्यार्थिनींनी भाग घेतला. या शिबीरात भारतातील सर्व भागातून महिला सामील झालेल्या होत्या. प्रा. जगताप यांनी या शिबिरास उद्घाटन प्रसंगी व समारोप प्रसंगी भेट दिली.

विद्यापीठस्तरीय महिला शिबीर–मॉडर्न महाविद्यालय पुणे येथे झाले या शिबीरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. प्रा. डी. बी. जगताप यांनी सहभाग घेतला.

आंतरराष्ट्रीय युवती सेवा योजना शिबीर– या शिबीरास राष्ट्रीय सेवा योजनेतील एक विद्यार्थिनी कु. ज्योती मरकळेचा सहभाग होता. हे शिबीर आंध्र प्रदेश तिरूपती या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात कु. ज्योती मरकळेचा सक्रीय सहभाग होता. तिचा प्राचार्य डॉ जे. के. गोधा यांच्या उपस्थितीत सामाजिक वनीकरणचे संचालक श्री भोलवडीकर यांचे हस्ते श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

**प्रोग्रॅम ऑफिसर्स कोर्स**

अहमदनगर या ठिकाणी "सी. एम्. आर. डी" येथे दि. २९-३-८५ ते १४-४-८५ अखेर १५ दिवसासाठी कोर्स पुणे विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेला होता. त्यासाठी प्रा. डी. बी. जगताप यांनी सहभाग घेतला.

**उन्हाळी व हिवाळी शिबीरे**

१ ) उन्हाळी शिबीर– मौजे पवईमाळ ( पणदरे ) दि. १० जून १९८५ ते १९ जून १९८५ सहभाग ८० विद्यार्थी, ५ प्राध्यापक.

**कार्यक्रम–**

१ ) गावातील अंतर्गत रस्ते तयार केले.

२ ) ग्रामसफाई

३ ) वृक्षारोपण

४ ) सर्वेक्षण

५ ) गणेश मंदिरासाठी ओटा बांधला

६ ) ग्रामस्थ व विद्यार्थी यांची डॉक्टरांच्या तर्फे आरोग्य तपासणी करून घेतली

७ ) लोकजागृती

८ ) आंतरराष्ट्रीय युवक वर्षात स्थापन झालेल्या मौजे पवईमाळ येथील ग्रामपंचायतीसाठी उपजिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी, सभापती, उपसभापती तसेच इतर शासकीय अधिकारी यांच्या तर्फे अनेक नवीन योजनांना मंजूरी व अनुदान मिळवून देण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचा पुढाकार. विशेष म्हणजे या युवक वर्षात स्थापन झालेल्या ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, सरपंच, उपसरपंच हे युवक आहेत.

९ ) अंधश्रद्धा,-निर्मुलन, हुंडाबंदी जातीभेद,-निर्मूलन.

१० ) पर्यावरण, उर्जाविषयक माहिती, गोबर गॅस प्लँटची योजना इ. बाबत मार्गदर्शन.

शिबीराला मा. भाऊसाहेब वानखेडे-उपजिल्हाधिकारी, मा. अॅड. एस्. एस्. हिरेमठ–चेअरमन. दि माळेगांव स. सा. कारखाना, माळेगांव, सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक, कार्यकारी संचालक तसेच चीफ् इंजिनियर, सभापति–उपसभापति व गटविकास अधिकारी, विद्यापीठाचे प्रतिनिधी, मा. एकसंबेकर- सहाय्यक सल्लागार, राष्ट्रीय सेवा योजना, बँकांचे अधिकारी, अनेक शासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, मा. अप्पासाहेब पवार-कृषितज्ञ कृषि प्रतिष्ठान, बारामती, मा. भगिरथ पवार– चेअरमन–बारामती खरेदी विक्री संघ, मा. अॅड. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष बारामती नगरपरिषद मान्यवर इ. व्यक्तींनी भेटी देऊन मार्गदर्शन केले.

२ ) हिवाळी शिबीर–मौजे बऱ्हाणपूर या ठिकाणी दि. ६-१२-८५ ते १५-१२-८५ अखेर घेण्यात आले.

सहभाग ८० विद्यार्थी व ६ प्राध्यापक.

कार्यक्रम–वृक्षारोपण, ग्रामसफाई, ओटे तयार करणे, शाळेच्या इमारतीभोवती दगडी कुंपण तयार करणे, गटार खणणे दारुबंदी, कलापथक व चित्रपट माध्यमाद्वारा दारूबंदी, आरोग्यविषयक माहिती व अंधश्रद्धा विरोधी मोहिम हाती घेतली. तसेच गांवकऱ्यांना हुंडाबंदी महत्व पटवून दिले. साक्षरता मोहिमेची सुरवात इ. कार्यक्रम हाती घतले गेले.

शिबीरास गटविकास अधिकारी, पंचायत समिती उपसभापति, पंचायत समिती अधिकारी, बारामतीचे नगराध्यक्ष, श्री. विनोदकुमार गुजर, शेती अधिकारी, पाटबंधारे व विद्युत अधिकारी, डॉक्टर्स, वकील, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते इ. मान्यवर व्यक्तींनी भेटी देऊन मार्गदर्शन केले.

**आंतरराष्ट्रीय युवक वर्षानिमित्त कार्यक्रम**

दत्तक खेड्यातील ग्रामस्थांना उर्जा, गोबर गॅस प्लँट, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, प्राथमिक आरोग्य इ. संदर्भात जनजागरण दिंडी माध्यमाद्वारे एक दिवसाचे शिबीर आयोजित करून मौजे पवईमाळ व भिकोबा-नगर तसेच बऱ्हाणपूर इ. ठिकाणी माहिती दिली.

**विद्यार्थी नेतृत्व–**

यावर्षी ए. डब्ल्यु. गायकवाड, ए. एस्. रत्नपारखी, कु. जे एस्. मरकाळे, कु ए. आर. गोसावी, कु. एस. बी. निबंधे, कु. एस. एम. डोंबे, एस. एच. पवार, जी. एन. चव्हाण, एल. ए. रोहाणी, आर. आर. झगडे या विद्यार्थी प्रतिनिधींनी नेतृत्व केले.

## राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना

प्रमुख– **प्रा. एस्. पी. कदम**
सहाय्यक– **प्रा. आर. एम्. बनकर**
पर्यवेक्षक– **प्रा. एम्. के. कोकरे**

**शिक्षण केंद्रे व संघटक**

**बारामती शहर**

१ ) आंबेडकर वसाहत– कु. लता नालंदे
२ ) आंबेडकर रोड– कु. आशा अहिवळे
३ ) सिद्धार्थनगर– कु. पुष्पा गायकवाड
४ ) कसबा– कु. सुनंदा कांबळे
५ ) वसंतनगर– कु. रेखा काकडे
६ ) खंडोबानगर श्री. लक्ष्मण शिंदे
७ ) साठेनगर– श्री. हिंदेश्वर कापसे

**बारामती परिसर**

१ ) माळेगाव– सौ. रुक्मिणी देशमाने
२ ) माळेगाव कॉलनी– श्री. भीमराव वळकुंडे
३ ) लाटे– सौ. जबून पठाण
४ ) दलित वस्ती– कु. मालन पाटोळे
५ ) गोफणे वस्ती– श्री. नाना लांडगे
६ ) कदम वस्ती– कु. अलका सणस
७ ) सांगवी झोपडपट्टी– सौ. मंदाकिनी निंबाळकर
८ ) बारवनगर– विजया काळे
९ ) कांबळेश्वर– सौ. कलावती जगताप
१० ) पावणेवाडी– कु. छाया अडागळे
११ ) मानाप्पानगर (पणदरे)–सौ. अलका लडकत
१२ ) म्हसोबावाडी– श्री. विष्णु सोमवळे
१३ ) कोकरे वस्ती– पंचफुला साबळे
१४ ) दलितवस्ती (कोऱ्हाळे)– सौ. सायराबानू शेख
१५ ) माळीवस्ती– कु. चंद्रकला गायकवाड
१६ ) मतकरी वस्ती– श्री. राजश्री चव्हाण
१७ ) धोपटे वस्ती (कोऱ्हाळे)– कु. शोभा मदने
१८ ) कोऱ्हाळे बुद्रक– कु. सुनीता खोडके
१९ ) माळवाळी– सौ. लिचा गेजगे
२० ) मळद– श्री. दत्तात्रय जाधव
२१ ) जळोची क्र. १– श्री. लक्ष्मण राऊत
२२ ) जळोची क्र. २– श्री. बाळासाहेब राऊत
२३ ) वडगाव निंबाळकर– कु. पुष्पा यादव

**विशेष**

१ ) दिनांक ९–७–८५ रोजी राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजनेच्या मार्गदर्शनासाठी डॉ. भालचंद्र फडके यांनी महाविद्यालयास भेट दिली.



२ ) लोकसंख्या शिक्षण विभागाच्या अंतर्गत राष्ट्रीय प्रौढ शिक्षण केंद्राचा समावेश करून महाविद्यालयाच्या एकूण ३० केंद्रापैकी ११ केंद्रावर लोकसंख्या शिक्षण केंद्रे सुरू करण्याची अनुमती मिळाली.

## एकात्मिक ग्रामीण विकास योजना (COADY)

**प्रा. एस्. पी. कदम**
**प्रा. व्ही. डी. काकडे**
प्रमुख, एकात्मिक ग्रामीण विकास

कॅनडा या देशातील योजनेंतर्गत पुणे विद्यापीठातील ६ महाविद्यालयांची निवड करण्यात आली त्यात आपल्या महाविद्यालयाची निवड होऊन ही योजना जून १९८५ पासून कार्यान्वित झाली. प्रा. एस. पी. कदम यांचे कार्यानुभवाकरिता प्रशिक्षण झाले. प्रा. एस्. पी. कदम हे या योजनेचे प्रमुख असून प्रा. विलास काकडे, प्रा. बी. पी. जोहरापूरकर, प्रा. के. एस्. सणगर या योजनेखाली काम करीत आहेत. श्री. डी पी. मदने व श्री. बेलदार हे स्पेशल वर्कर म्हणून काम पाहतात.

या योजनेंतर्गत बऱ्हाणपूर आणि तांदुळवाडी ही दोन गावे निवडण्यात आली. व गावांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पुढील उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.
१ ) ग्रामीण तरूणांचे संघ स्थापन करण्यात आले असून त्यांना हॉलीबॉल सारख्या खेळाचे साहित्य देण्याचे प्रयत्न चालू आहेत.

२ ) स्त्रियाकरिता व्यवसायिक शिक्षण देण्याची योजना असून त्यांना घरी धुण्याचा साबण, कुंकू, उदबत्ती तयार करण्याचे शिक्षण देण्याचे प्रयत्न चालू आहेत.

३ ) दोन्ही गावात प्रौढ शिक्षणाचे वर्ग सुरू केले जाणार आहेत.

४ ) तांदुळवाडी येथील ११ शेतकऱ्यांच्या विहिरींना विद्युत पंप देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून विद्युत खांब उभारण्याचे काम पूर्ण होत आले आहे.

५ ) तांदुळवाडी या गांवातील सवर्ण व अस्पृश्य यात दिलजमाई घडवून आणण्यात आली व राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने हे चांगले कार्य करण्यात आले.

६ ) दोन्ही गावातील तरूण, प्रौढ व स्त्रियांचे संघ प्रस्थापित केले असून, दारुबंदी, अस्पृस्यता, हुंडाबंदी निर्मूलनाच्या दृष्टीने कार्य सुरू करण्यात आले आहे.

## कविवर्य मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा

**प्रमुख– प्रा. धनंजय शहा**

बारामती नगरपरिषदेच्या विद्यमाने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये दि. ४ व ५ ऑक्टोबर ८५ रोजी कविवर्य मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या.

स्पर्धाचे उदघाटन मा. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष-बारामतो नगर परिषद यांचे हस्ते झाले.

वादविवाद स्पर्धेची सांघिक ढाल पुण्यान्या आय. एल. एस. लॉ-कॉलेजच्या उपेंद्र खरे व नितीन आपटे यांच्या संघाने जिकली तर वक्तृत्वाची ढाल पुण्याच्या बी. एम् सी. कॉलेजच्या श्री. अभिराम भडकमकर याने जिकलीं.

वादस्पर्धा व वक्तृत्वस्पर्धा या दोन्ही स्पर्धांची प्रथम क्रमांकाची पारितोषिके पुण्याच्या बी. एम. सी. कॉलेजच्या श्री अभिराम भडकमकर याने पटकावली.

वाद स्पर्धेचे द्वितीय पारितोषिक कु. शुभांगी दाबक एस्. पी कॉलेज, पुणे-हिने मिळविले तर तृतीय पारितोषिक कु. कल्पना परचुरे- आर्टस्, सायन्स, कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव हिने मिळविले

वक्तृत्व स्पर्धेची अन्य पारितोषिके श्री. गजानन लक्ष्मण गद्रे, गोगटे-जोगळेकर कॉलेज, रत्नागिरी ( द्वितीय ) व श्री शांताराम वाळुंज- एन. बी. टी. लॉ-कॉलेज नासिक ( तृतीय ) यांनी प्राप्त केली.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम मा. खासदार संभाजीराव काकडे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी केलेल्या छोट्याशा भाषणात स्पर्धकांना उद्देशून ते म्हणाले की, 'पारितोषिकांमागची भूमिका विसरून न जाता, ज्या गुणांचे कौतुक म्हणून ही पारितोषिके दिली जातात त्या गुणांचा पुढे विद्यार्थ्यांना समाजासाठी उपयोग करावा.

तसेच यावेळी 'कविवर्य मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेसाठी मा. खा. संभाजीराव काकडे यांनी १०,००० रुपयांची देणगी जाहीर केली.

या राज्यस्तरावरील स्पर्धामध्ये महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील २४ महाविद्यालयातील ३४ स्पर्धकांनी वादस्पर्धेत तर ३७ स्पर्धकांनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. धनंजय शहा यांनी या स्पर्धाचे संयोजन केले.

डॉ. प्र. ल. गावडे (पुणे,) डॉ. कन्हैया कुंदप (कोपरगाव) प्रा. डॉ. दयाराम पाटील (बारामती) यांनी वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले वादविवाद स्पर्धेचे परीक्षक प्रा. व. वा बोधे (सोमेश्वरनगर) डॉ. प्र. ल. गावडे व डॉ. कन्हैया कुंदप हे होते.

याच वेळी लायन्स क्लब बारामती यांच्यावतीने उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयाशी संबंधीत अनेक विषय देण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यामध्ये नितीन आपटे (आय. एल. एस. लॉ. कॉलेज, पुणे) यास प्रथम क्रमांकाचे ५१ रु. चे बक्षिस मिळाले. व अभिराम भडकमकर पुणे ३१ रु. शांताराम वाळुंज (नासिक) २१ रु., उपेंद्र खरे (पुणे) रु. १५, व बाबूराव हिरडे (पुणे) ११ रु. अशी पारितोषिके मिळाली.

## सामान्यज्ञान व स्पर्धा परीक्षा समिती

अध्यक्ष– प्रा. ए. एस्. पंढरी

२) यावर्षी पहिल्या सत्रात महिनाभर दररोज ' Bank service Recruitment Test (clerical) या परीक्षेच्या पूर्वतयारीचे वर्ग घेण्यात आले. सुमारे २० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. असा उपक्रम महाविद्यालयातर्फे प्रथमच हाती घेण्यात आला होता.

२) वेळोवेळी निरनिराळ्या स्पर्धा परीक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

३) तसेच अनेक विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले.

४) गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी दि. ९ फब्रुवारी १९८६ रोजी 'सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा' (वस्तुनिष्ठ प्रकारची) महाविद्यालयातर्फे घेण्यात आली. त्यात महाविद्यालय व बारामती फलटण, वालचंदनगर येथील १० वी ची मुले असे गुमारे ४०० ते ५०० स्पर्धक सहभागी झाले होते.

## शाळा–महाविद्यालय समूह योजना

प्रमुख–प्रा. एम्. डी. भगत

या वर्षी आम्ही २२ सहभागी शाळामधील इ. १० वी चे विद्यार्थी व विषय शिक्षक यांचेसाठी इंग्लिश रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित या विषयावर उपयुक्त चर्चासत्रे आयोजित केली.

पुणे येथील रा. ब. लक्ष्मणराव आपटे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री पु. ग. वैद्य यांचे स्थानिक शाळामधील एकूण ८०० विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकासाठी मार्गदर्शनपर व्याख्यान दि. ४-१०-८५ रोजी आयोजित केले.

दुसऱ्या सत्रामध्ये ग्रामीण परिसरातील शाळामध्ये आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची व्याख्याने झाली.

## सांस्कृतिक विभाग

प्रमुख–प्रा. नी ग. लोंढे
प्रा. डॉ. पी. डी. वावरे

प्रतिवर्षीप्रमाणे यंद ही सांस्कृतिक विभागातर्फे खालील कार्यक्रम झाले.

दि. १ ऑगस्ट रोजी लो. टिळक पुण्यतिथी मिमित्त डॉ. कुबेर यांचे व्याख्यान झाले.

दि. २६-८-८५ रोजी काव्य वाचन स्पर्धा झाली.

दि. २०-९-८५ रोजी नाट्य वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली.

दि. २२-९-८५ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. दैनिक सकाळ चे संपादक श्री. एम. के. कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले.

दि. २४-९-८५ रोजी श्री रविंद्र पिंगे यांचे "प्रवास कथन" या विषयावर व्याख्यान झाले.

दिनांक १०–२–८६ रोजी पुणे विद्यापीठात झालेल्या पसायदान या कार्यक्रमात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वतीने "पसायदान" या कार्यक्रमात "टिळक आगरकर" हे नाटयरूप सादर करण्यात आले. त्यात पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

श्री संजय जाधव, ११ वी वाणिज्य (ब) लो. टिळक

श्री. नंदकुमार भागवत, १२ वी वाणिज्य (ब) आगरकर.

श्री. सुनील जोगळेकर, तृतीयवर्ष वाणिज्य– निवेदक यांनी उत्कृष्ट नाटयदर्शन घडवून प्रेक्षक व परीक्षकांचे कडून प्रशंसा प्राप्त केली. टिळकाची भूमिका केलेल्या संजय जाधव यांस वैयक्तिक नैपुण्याचे द्वितीय पारितोषिक मिळाले व ट्रॉफी मिळाली

सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन. प्रा. टी. डी. यादव यांनी या कार्यक्रमाची उत्कृष्ट तयारी करवून घेतली होती, त्यांचेही खास अभिनंदन.

## महाविद्यालय परिसर विकास व कमवा व शिका योजना

प्रमुख–सणगर के. एस्.

या योजने अंतर्गत या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय परिसरात खालील उल्लेखनीय उपक्रम राबविण्यात आले.

१) मळद वृक्षदिंडी– बुधवार दि. २ ऑक्टोबर ८५ रोजी बारामती ते मौजे मळद अशी वृक्ष दिंडी, एन. एस एम विद्यार्थी, मौजे मळद येथील ग्रामस्थ आणि सामाजिक वनींकरण अधिकारी यांच्या सहकार्याने आयोजित केली होती. याबेळी मौजे मळद येथे मोठया प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. हा कार्यक्रम मा. श्री अप्पासाहेब पवार यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला.

२) मा. श्री शरद पवार मा. श्री. कमलकिशोर कदम व नगरपरिषद पदाधिकारी यांचे हस्ते दि. ३०–६–८५ रोजी बारामती नगरपरिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विरोधी पक्षनेते मा. श्री. शरद पवार, उपाध्यक्ष विधान परिषद, महाराष्ट्र राज्य मा. श्री. कमलकिशोर कदम, नगरपरिषद अध्यक्ष व पदाधिकारी यांचे शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

३) महाविद्यालयाच्या जिमखान्याच्या सभोवती महाविद्यालयातील खेळाडु, राष्ट्रीय सेवा योजनेतील प्राध्यापक व विद्यार्थी तसेच एन्. सी. सी. चे विद्यार्थी व प्राध्यापक यांचे हस्ते अंदाजे एक हजार रोपे लावलेली आहेत.

४) महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्य निवासस्थान, वनस्पतिशास्त्र उद्यान येथे विविध प्रकारची कॅक्टस् व शोभेच्या फुलांच्या वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे

५) शालेय रोप वाटिका योजना

सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचे सौजन्याने या महाविद्यालयास २०,००० (वीस हजार) रोपे करण्याची "शालेय रोप वाटिका योजना" मंजूर करण्यात आली होती. या योजनेतंर्गत विविध प्रकारची २० हजार रोपे तयार करण्यात आली.

या रोपांचे वाटप सामाजिक वनीकरण, पुणे यांचे सल्ल्यानुसार या भागातील ग्रामपंचायती, शेतकरी व विद्यार्थी यांना करण्यात आले.

६) या योजनेंतर्गत या वर्षी काही गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वनस्पती–उद्यान, कार्यालय, ग्रंथालय व क्रीडांगणावर काम देऊन त्यांना आर्थिक मोबदल्याची संधी उपलब्ध करून दिली.

७) फलोद्यान योजना

महाविद्यालयाच्या परिसरात "फलोद्यान योजना" राबविण्याचे ठरविले आहे. ही योजना मंजुरीसाठी शासनाकडे पाठविली आहे. ही योजना यशस्वी करण्यासाठी श्री. रोडे साहेब, फलोद्यान अधिकारी व कृषी प्रतिष्ठानचे श्री. दरेकर साहेब यांनी महाविद्यालयास भेट देऊन मार्गदर्शन केले

८) स्टायलो हॅमॅटा ग्रास योजना

बारामती येथील मृदसंधान खात्याने स्टायलो हॅमॅटा ग्रास योजना मंजूर केली होती. ही योजना महाविद्यालयाने यशस्वीपणाने राबविली आहे.

## रक्तदान आणि रक्तगट तपासणी समिती

**प्रमुख- प्रा. बी. जी. देशमुख**

१५ ऑगस्ट १९८५ योजी स्व. माणिकबाई सराफ रक्तपेढी, बारामती यांचे सहकार्याने रक्तदान शिबीर घेण्यात आले. उद्घाटन समारंभाचे प्रमुख मा. वानखेडे बी. वाय., उपजिल्हाधिकारी बारामती हे होते आणि अध्यक्ष मा. ॲड. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष नगरपरिषद बारामती हे होते. एकूण ४७ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी रक्तदान केले. त्याचप्रमाणे रक्तपेढीकडून ज्यावेळी मागणी केली त्यावेळी विद्यार्थ्यांचा रक्तगट शोधून त्यांना रक्तदान करण्यास प्रवृत्त केले.

## निरंतर शिक्षण केंद्र

**प्रमुख- प्रा. बी. एस्. माने**

पुणे विद्यापीठ निरंतर शिक्षण केंद्राच्या वतीने दि. २ सप्टेंबर १९८५ ते ११ सप्टेंबर १९८५ या कालावधीत महावीर भवन, बारामती येथे 'योगासन शिबीर' आयोजित करण्यात आले. त्याचा ४६ व्यक्तींनी लाभ घेतला. प्रकल्पप्रमुख म्हणून प्रा. अशोक मेहेर यांनी काम पाहिले.

## ग्रंथालय विभाग

**ग्रंथपाल- श्री. एस्. एन्. पाटील**

एकूण ग्रंथसंख्या- ६०२९५ कि. रु. ९९४६९६-७०

१९८५-८६ या वर्षातील नवीन ग्रंथांची भर.

| एकूण ग्रंथ | | किमत रु. |
|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय | २५१९ | कि. रु. ९७८६८-५० |
| कनिष्ठ महाविद्यालय | १०१३ | कि. रु. १२८०६-५८ |

१९८५-८६ या वर्षात नवीन संदर्भ ग्रंथाची भर.

एकूण संदर्भ ग्रंथ ३८ कि. रु. ५१४१-८७

विविध योजनांतर्गत खालील प्रमाणे ग्रंथांची खरेदी झाली.

१) यु. जी. सी. अंडरग्रॅज्युएट डेव्हलपमेंट ग्रँट

| | पुस्तके | किमत |
|---|---|---|
| रु. १३३३३३/- | ४५९ | २२७१५-५७ |

२) पोस्ट ग्रॅज्युएट डेव्हलपमेंट ग्रँट रु. २०५०००/-

| | | |
|---|---|---|
| | १४१४ | ५५४८१-८३ |

ग्रंथालयात खालील प्रमाणे नियतकालिके खरेदी केलेली आहेत.

एकूण नियतकालिके- २१० कि. रु. ९०००-००
(भेटी दाखलसह) (अंदाजे)

एकूण वर्तमान पत्रे- ८ कि. रु. २०००-००
(अंदाजे)

१९८५-८६ मध्ये २६ नवीन नियतकालिकांची भर पडली. एकूण नियतकालिके कि. रु २१०७-००

ग्रंथ पेढी- ग्रंथ पेढीतून १९८५-८६ या वर्षात खालील प्रमाणे विद्यार्थ्यांना ग्रंथांचे वाटप केले.

१) वरिष्ठ महाविद्यालय- २८५
२) कनिष्ठ महाविद्यालय- ३६८
----
६५३

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात खालील प्रमाणे विविध स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारे वाचन साहित्य उपलब्ध आहे.

MPSC, UPSC, C. A., ICWA, IIT, DTL, DBM, MBA, German, Management, Marketing, Costing, Medical, Engineering. इत्यादी स्पर्धा परीक्षा, तसेच व्यवसाय मार्गदर्शन, औद्योगिक क्षेत्रातील विविध लहान आणि मोठे कारखाने स्थापनेसाठी आवश्यक माहिती. वेल्डिंग, फिटिंग, टर्निंग या सारख्या तंत्रज्ञान शाखेचे आवश्यक ग्रंथ, पाकशास्त्र, योगाभ्यास, आरोग्य व आहार.

ग्रंथालयाच्या सूचना फलकावर विविध स्पर्धा परीक्षा, नोकरी वगैरे संबंधीच्या जाहिराती वेळोवेळी प्रदर्शित केल्या जातात.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रात्रीच्या अभ्यासिकेची सोय ग्रंथालयात करण्यात आलेली आहे. रात्रीच्या अभ्यासिकेची वेळ रात्री १०.०० पर्यंत असते.

ग्रंथांची देणगी- खालील प्रमाणे मान्यवर व्यक्ती व संस्थांनी भेटीदाखल ग्रंथ देऊन ग्रंथालयात मौलिक भर घातली आहे.

व्यक्ती- प्राचार्य डॉ. जे. के. गोधा, प्रा. एस. जी. बोंद्रे, मा. शिंदे साहेब (पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक, शिवनगर), प्राचार्य एम्. व्ही. कौंडिण्य (संगमनेर) श्रीमती एस. टी. कुलकर्णी, मुंबई. प्रा. डी. ए मांडरे (सोमेश्वर नगर)



संस्था- पुणे विद्यापीठ, दि हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कं. मुंबई, टॅक्सेशन-नवी दिल्ली, शिक्षण संचालनालय-पुणे, केदारनाथ रामनाथ-मीरत, साहित्य भवन-आग्रा, कंट्रोलर ऑफ पब्लिकेशनस्-दिल्ली, व्यवस्थापक, शेतकरी सहकारी संस्था-कोल्हापूर, समाज शिक्षण माला-पुणे, रयत शिक्षण संस्था-सातारा, ग्रंथायन-अलीगड, महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल-मुंबई, आराध्य प्रकाशन-भुसावळ, नरेंद्र प्रकाशन-पुणे, मनालि प्रकाशन-पुणे, निराली प्रकाशन-पुणे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन-पुणे, देवी लक्ष्मी प्रकाशन-पुणे, सोमय्या पब्लिकेशन-मुंबई, ब्लॅकी अँड सन पब्लिशर्स-मुंबई, किताब महल-अलाहाबाद, हिमालय पब्लिकेशनस् मुंबई, विले इस्टर्न लि.-मुंबई, एस. चंद अँड कं.-मुंबई, चेतन प्रकाशन-मुंबई, ऑक्सफर्ड युनिव्हसिटी- नवी दिल्ली, सौजन्य प्रकाशन- मुंबई, मॅकमिलन इंडिया लि.-मुंबई, अनमोल प्रकाशन-पुणे मेहता पब्लिशिंग, हाऊस-पुणे, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी-मुंबई, मनीषा प्रकाशन-मुंबई, गाज प्रकाशन-केडगांव, एम. व्ही. फडके आणि कं.-मुंबई, सी. जमनादास अँड कं.-मुंबई

ग्रंथालयाच्या विकासामध्ये माननीय प्राचार्य डॉ. जे. के. गोधा याच्या व्यक्तिगत मार्गदर्शनाचा फार मोठा वाटा आहे.

## फिल्म क्लब

**प्रमुख- आर. डब्ल्यू. जोशी**

१९८५-८६ या वर्षात विविध शैक्षणिक चित्रपट दाखविण्यात आले. त्याचा विद्यार्थ्यांना चांगला फायदा झाला.

या कार्यात ब्रिटिश हाय कमिशन, मुंबई, ऑस्ट्रेलियन हाय कमिशन दिल्ली. महाराष्ट्र राज्य, दृक्-श्रवण शिक्षण संस्था, पुणे, यू. एम. एस. आर, मुंबई यांचे उत्तम सहकार्य लाभले.

## 'अस्मिता दर्शन' भित्तीपत्रक

**प्रमुख- प्रा. व्ही. ए. संगई**

या वर्षी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे साहित्य देऊन अस्मिता दर्शन या भित्तीपत्रकाला उत्तम प्रतिसाद दिला. साहित्यात कविता, चित्रे हे दोन प्रकारच बहुसंख्य विद्यार्थ्यांनी हाताळले. वैचारिक लेख, कथा, शास्त्रीय माहितीपूर्ण लेख, सुविचार इत्यादींचा अभाव दर वर्षीप्रमाणे याही वर्षी जाणवला. भित्तीपत्रक चालविण्यामध्ये पुढील विद्यार्थ्यांचा जास्त सहभाग मिळाला.

श्री. संदीप सुभेदार (एफ. वाय. बी. ए), श्री. डी. बी. पोतदार (एस. वाय. बी. कॉम), कु. भुषणी कांबळे (टी. वाय. बी. कॉम.), कु. नयना मंडलेचा (एफ. वाय. बी. कॉम.), श्री. प्रवीण के. देवकाते (बारावी सायन्स), श्री. अरविंद गिरमे (अकरावी कला) श्री. नंदकुमार (एस. वाय बी. कॉम.) कु. संजीवनी निगडे (अकरावी सायन्स) श्री. पांडुरंग (अकरावी सायन्स)

उत्कृष्ट साहित्यप्रकाराबद्दल पुढील दोन पारितोषिके देण्यात आली.

१) चित्रकला- कु. संजीवनी निगडे (अकरावी सायन्स)
२) काव्य- श्री. संदीप सुभेदार (एफ. वाय. बी. ए.)

## पुनर्रचित पदवी अभ्यासक्रम

**चीफ को-ऑर्डिनेटर- प्रा. डॉ. डी. के. मगदूम**

पुणे विद्यापीठाने पुरस्कृत केलेला हा अभ्यासक्रम जून १९८३ पासून विज्ञान शाखेत सुरू करण्यात आला. यावर्षी अभ्यासक्रमाचा अभ्यास पूर्ण करून पहिली पदवीधर विद्यार्थ्यांची तुकडी बाहेर पडेल.

जून १९८४ मध्ये कला आणि वाणिज्य शाखेत या अभ्यासक्रमाची सुरुवात झाली. यावर्षी प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम राबविला जात आहे. पुढच्या वर्षी १९८६-८७ मध्ये या शाखेतील विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी घेऊन बाहेर पडतील.

तृतीय वर्ष शास्त्राच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून एक प्रकल्प पूर्ण करावा लागतो. सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयावर प्रकल्प पूर्ण केले आहेत.

या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने प्रत्येक वर्षासाठी एक लाख रुपयाचे अनुदान मंजूर केले असून त्याद्वारा या अभ्यासक्रमाची कार्यक्षमतेने कार्यवाही करणे शक्य झाले आहे.

या अभ्यासक्रमातील विविध विषयांच्या अध्यापनासाठी आमच्या महाविद्यालयातील ३०–३२ प्राध्यापकांनी या विषयांच्या कृतिसत्रात भाग घेतला. त्याचा अध्यापनाच्या दृष्टीने खूपच उपयोग झाला. ही कृतिसत्रे संगमनेर, नासिक येथील महाविद्यालयात घेण्यात आली.

या अभ्यासक्रमातील विविध विषयांच्या अध्यापनासाठी नगरपरिषद, स्थानिक बँका, को–ऑपरेटिव्ह सोसायट्या, व्यापारी पेढ्या, साखर कारखाने, सरकारी कार्यालये, कृषि विकास अधिष्ठान या संस्थांचे मौलिक सहाय्य लाभले व तेथील मान्यवर तज्ज्ञ व्यक्तींनी उत्तम मार्गदर्शन केले.

या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून पुणे, अहमदाबाद, कोल्हापूर, वारणानगर, महाबळेश्वर, प्रतापगड, दापोली, राहुरी या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या अभ्यास सहली आयोजित केल्या होत्या.

वेळोवेळी बाहेरगावच्या तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली.

## प्राध्यापकांचे अध्यापनेतर उपक्रम

**प्रा. डॉ. दयाराम पाटील**

दि. ४ जुलै १९८५ रोजी पुणे आकाशवाणी केंद्रावर 'स्वातंत्र्य लढ्याचे साहित्यातील प्रतिबिंब' या विषयावरील भाषणमालेत 'साने गुरुजी' या विषयावर भाषण झाले.

पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळाच्या वतीने मखमलाबाद, जि. नासिक येथे दि. २९–३० जून १९८५ रोजी येथील केंद्रावर म. ज्योतीबा फुले–जीवन कार्यकर्तृत्व' या विषयावर व्याख्याने झाली.

दि. २०–२१ जाने. १९८६ योजी 'साने गुरुजी–जीवन, साहित्य व कार्य' या विषयावर श्री छत्रपती महाविद्यालय–जुन्नर येथे व्याख्याने झाली.

**प्रा. डॉ. के. एम्. सुर्वे**

पुणे विद्यापीठातील हिंदी विभागाच्या रजत जयंतीच्या निमित्ताने फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे तृतीय वर्ष बी. ए. (हिंदी) 'व्याकरण व लेखन' यासंबंधी पाठ्यक्रमावर आधारित परिचर्चेस उपस्थिती व सहभाग. दि. ३० व ३१ जानेवारी, १९८६.

**प्रा. महावीर कंडारकर**

दिल्ली येथे दिनांक ३१ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर १९८५ या कालावधीत झालेल्या 'अहिंसा आणि संरक्षण व मानवी आहार' या विषयावरील जागतिक परिषदेत सहभाग. व Animal Protection & food crisis या विषयावरील टिपण सादर.

आचार्य रविषेण यांच्या 'पद्मपुराण' या ग्रंथाचा मराठी अनुवाद खंड–१. पद्म प्रकाशन, बारामतीच्या वतीने प्रकाशित झाला. खंड–२ प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

दि. २६ जानेवारी १९८६ रोजी परभणी येथे सत्कार करण्यात आला. मराठवाडा शिष्यवृत्ती मंडळात मार्गदर्शनपर भाषण.

दि. २२ व २३ फेब्रु. १९८६ रोजी अहमदाबाद येथे महागुजराथ परिषदेतर्फे आयोजित केलेल्या 'प्राणि संरक्षण और उसका आर्थिक दृष्टिकोण' या विषयावरील परिषदेत निबंधवाचन.

**प्रा. के. एस्. अय्यर**

विद्यापीठ अनुदान मंडळ व ब्रिटिश कौन्सिल यांच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठात दि ९ डिसेंबर ८५ ते २० डिसें. ८५ या कालावधीत झालेल्या 'Contemporary criticism' या विषयावरील चर्चासत्रात सहभाग.

**प्रा. डॉ. व्ही. व्ही. आचार्य**

पुणे विद्यापीठाच्या दूरशिक्षण योजनेच्या अंतर्गत अर्थशास्त्र विषयाच्या बी. ए. सत्र ६ यामधील 'आंतरराष्ट्रीय व्यापार' या पुस्तकाचे लेखन केले.

**प्रा. विलास काकडे**

पुणे विद्यापीठाच्या वतीने झालेल्या 'डेव्हलपमेंट कम्युनिकेशन रिचर्स प्रोजेक्ट' मध्ये सहभाग. एका दिवसांच्या चर्चासत्रात उपस्थिती व या योजनेखाली सिर्सुफळ या गावाचे सर्वेक्षण.

पुणे विद्यापीठात दि. ८ जून ते १० जून १९८५ रोजी झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या चौथ्या अधिवेशनात समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. एस्. पी. कदम व प्रा. सौ. पद्मजा केळकर–प्रभुणे यांचा सक्रिय सहभाग.



**प्रा. बी. पी. जोहरापूरकर**

२६ ते २८ डिसेंबर ८५ रोजी वाराणसी येथे झालेल्या ७ व्या इंडियन जॉग्रफी काँग्रेसच्या अधिवेशनात सहभाग. The Role of retail travel agencies in Pune city — A case study या शोध निबंधाचे वाचन.

'दीपावळी भेटकार्डे' हा लेख स्वराज्य, पुणे साप्ताहिकात २ नोव्हेंबर ८५ च्या अंकात प्रसिद्ध झाला.

**प्रा. के. एम्. जाधव**

पुणे विद्यापीठातील मानसशास्त्र विभाग व दूर शिक्षण केंद्र यांच्या वतीने दि. २४ जून ८५ ते २७ जून ८५ या काळात आयोजित केलेल्या व्यक्तिमत्त्व विकास या विषयावरील कृतिसत्रात सक्रिय सहभाग.

**प्रा. पी. आर. पाटील**

२८ व २९ डिसेंबर १९८५ रोजी हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठात नॅशनल काँग्रेस फॉर डिफेन्स स्टडीजने आयोजित केलेल्या वार्षिक परिषदेतील 'भारतीय सुरक्षिततेला अंतर्गत व बहि:र्गत धोके या विषयावरील चर्चासत्रात सहभाग.

## लोकसंख्या शिक्षण मंडळ

प्रमुख– **प्रा. ए. बी. देसाई**

या वर्षीच हा प्रकल्प महाविद्यालयात सुरू करण्यात आला. वाढत्या लोकसंख्येच्या परिणामाची परिणामकारक जाणीव निर्माण करण्यासाठी व्याख्याने, चित्रस्पर्धा व प्रदर्शन आदि विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

तांदुळवाडी, जळोची, बऱ्हाणपूर येथील ग्रामस्थांसाठी 'लोकसंख्या वाढ व त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या' या विषयावर प्रा. ए. बी. देसाई, प्रा. व्ही. डी. काकडे, प्रा. सौ. केळकर–प्रभुणे, प्रा. एन्. ए. पाटील, प्रा एस्. पी. कदम यांची व विद्यार्थी-विद्यार्थिनींची व्याख्याने झाली.

श्रीमती तारा कानिटकर, मुंबई यांचे 'वाढती लोकसंख्या व समस्या आणि धोरण' या विषयावर ४ मार्च १९८६ रोजी महाविद्यालयात, नगराध्यक्ष श्री. विनोदकुमार गुजर यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले.

याशिवाय विद्यार्थ्यांसाठी चित्रस्पर्धा, भित्तीपत्रक स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात पुढील विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळविली.

चित्रस्पर्धा व प्रदर्शन–

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक– कु. सुनीता जगताप | रुपये ५१/– |
| द्वितीय क्रमांक– कु. मंजुश्री गवसणे | रुपये ४१/– |
| तृतीय क्रमांक– कु. ज्योत्स्ना रणशिंग | रुपये ३१/– |

उत्तेजनार्थ–

| | |
|---|---|
| १ ) कु. शुभांगी फरसोले | रुपये २५/– |
| २ ) कु. सविता चिनके | रुपये १५/– |
| ३ ) श्री. मिलिंद सोमाणी | रुपये ११/– |

स्पर्धांसाठी आलेल्या चित्रसाहित्याचे प्रदर्शन महाविद्यालयात तसेच तांदूळवाडी, रूई, जळोची, बऱ्हाणपूर येथे भरविण्यात आले होते. त्याचा जनजागृतीसाठी चांगला उपयोग झाला.

वक्तृत्व स्पर्धा–

लोकसंख्या समस्या वरील विविध विषयावर वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात पुढील विद्यार्थी यशस्वी झाले त्यांना मिळालेली पारितोषिके–

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक– श्री. अबिद एम्. दलाईत | रुपये ५१/– |
| द्वितीय क्रमांक– श्री. संजय जाधव | रुपये ४१/– |
| तृतीय क्रमांक– श्री. गजानन सरक | रुपये ३१/– |
| उत्तेजनार्थ– श्री. एस्. ए. सय्यद | रुपये २५/– |

लोकसंख्या शिक्षणावरील मराठी, हिंदी, इंग्रजी फिल्म्स व स्लाईडस विद्यार्थी व खेड्यातील ग्रामस्थाना दाखविण्यात आल्या. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध विषयावर निबंधस्पर्धा आयोजित केली होती.

या प्रकल्पासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडून पुणे विद्यापीठातर्फे १९८५–८६ या वर्षासाठी रु. ५७५०/– चे अनुदान मिळाले आहे. या प्रकल्पातील विविध उपक्रम पार पाडण्यास मा. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांचे मार्गदर्शन व सहकारी प्राध्यापक मित्रांचे सहाय्य नेहमीच उपयुक्त ठरले. सर्वांचा मी आभारी आहे.

## POST-GRADUATE DEPARTMENT

**K. S. Iyer**

Director, Post-graduate Depts.,

Admissions of students to the various Post-graduate departments, during the Academic Year 1985-86 were as follows : Marathi-26, Hindi-13, English-28, History 34, Economics-20, Politics-33, M.Com.-148

During the year following distinguished teachers visited the college to deliver useful lectures to our students.

M. A. Marathi-

1. Dr. G. N. Jogalekar, Head, Dept., of Marathi, Fergusson College, Pune.

2. Dr. D. T. Bhosale, Head, Dept., of Marathi, Annasaheb Awate College, Manchar.

M. A. Hindi-

1. Prof. H. S. Sane, S. P. College, Pune.

2. Dr. Ramji Tiwari, Dept. of Hindi, University of Poona, Pune

3. Prof. P N Paranjape, Dept., of Journalism, University of Poona, Pune.

4. Dr. Keshar Prathamvir, Annasaheb Magar College, Hadapsar

M. A. English-

1. Dr. S. V. Dhayagude, Modern College, Pune.

2. Prof. S. R. Raykar, Head, Dept., of English, Modern College, Pune.

M. A. Politics-

1. Dr. V. K. Kshire, Dept., of Politics, University of Poona, Pune.

2 Dr. Srikant Paranjape, Dept., of olitics, University of Poona, Pune.

M. Com.-

1. Dr. M. C. Dixit, Head, Dept., of Commerce, Ness Wadia College of Commerce, Pune.

2. Mr. S. H. Surana, Chartered Accountant Pune

★


MAPS, GLOBES, MODELS, CHARTS, BOOKS, ATLASES

WEATHER INSTRUMENTS
DRAWING INSTRUMENTS
SURVEYING INSTRUMENTS

IN FACT EVERYTHING GEOGRAPHICAL

Telephone : 581355 Telegram : SIS New Delhi

**Scientific Instruments Stores**
( Geography Section )
J-355, New Rajinder Nagar,
New Delhi - 60.




## सूची विभाग

**एप्रिल १९८५ च्या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची सूची**

**बी. ए.**

| नांव | विषय |
|---|---|
| १. श्री. चौधरी जवाहर लक्ष्मणराव | (भूगोल) |
| २. कु. भोसले सुनंदा कृष्णराव | (समाजशास्त्र) |
| ३. श्री. अडसूळ माणिक शंकर | (संरक्षणशास्त्र) |
| ४. हसबनीस रोहिणी वासुदेव | (राज्यशास्त्र) |
| ५. कु. तावरे रत्नप्रभा संपतराव | (समाजशास्त्र) |
| ६. श्री. सोकटे विलास वामनराव | (राज्यशास्त्र) |
| ७. श्री. धायगुडे बाजीराव बाबासाहेब | (संरक्षणशास्त्र) |
| ८. श्री. आटोळे युवराज गंगाराम | (संरक्षणशास्त्र) |
| ९. श्री. माहुरकर आनंदराव रामचंद्र | (भूगोल) |
| १० श्री. काळे दिलीप सखाराम | (राज्यशास्त्र) |
| ११. श्री. खारतुडे धनंजय भागुजी | (राज्यशास्त्र) |
| १२. कु. रणवरे सुषमा गुलाबराव | (राज्यशास्त्र) |
| १३. श्री. माळशिकारे शाम पुंजाराम | (राज्यशास्त्र) |
| १४ अ श्री. लोंढे शिरीषराज तुकाराम | (राज्यशास्त्र) |
| १४ ब. श्री. रणमोडे दत्तात्रय भगवान | (भूगोल) |
| १५. कु. दाते सुनीता रमेश | (राज्यशास्त्र) |
| १६. श्री. काळभोर विष्णू शंकरराव | (राज्यशास्त्र) |
| १७ श्री. कोकरे राजेंद्र हरिभाऊ | (राज्यशास्त्र) |
| १८. कु. भोसले सुजाता विश्वनाथ | (इतिहास) |
| १९ अ. कु. लोणकर सुरेखा गजानन | (इतिहास) |
| १९ ब. श्री. ओगले राजेंद्र लक्ष्मण | (भूगोल) |
| २०. श्री. शेंबेकर उदय महादेवराव | (संरक्षणशास्त्र) |
| २१. श्री. धायगुडे तुकाराम पाटलू | (संरक्षणशास्त्र) |
| २२. श्री धायगुडे सुरेश शिवाजी | (राज्यशास्त्र) |
| २३. श्री. चांगण सुनील विठ्ठल | (भूगोल) |
| २४. श्री. सावंत बाळासाहेब सयाजी | (इतिहास) |
| २५ अ. श्री. जगताप रामचंद्र मारुतराव | (राज्यशास्त्र) |
| २५ ब. श्री. बोराडे सर्जेराव गेणबा | (भूगोल) |
| २६ अ. श्री. घोघरे पद्माकर शंकर | (मानसशास्त्र) |
| २६ ब. श्री. गायकवाड विजय माधवराव | (इतिहास) |
| २७ अ. कु. शेंडगे रेखा श्रीरंग | (इतिहास) |
| २७ ब. कु. मोरे लता किसनराव | (राज्यशास्त्र) |
| २८. कु. भिसे बायमा अप्पा | (राज्यशास्त्र) |
| २९ श्री. अटोळे हनूमंत पांडुरंग | (इतिहास) |
| ३०. श्री. बालगुडे रमेश नामदेव | (इतिहास) |
| ३१. कु. नलवडे कल्पना तानाजी | (इंग्लीश) |
| ३२. श्री. वेदपाठक अविनाश वसंतराव | (समाजशास्त्र) |
| ३३ श्री. पोळ हनुमंत तुळशिराम | (राज्यशास्त्र) |
| ३४. श्री. देवकाते दिलीप नामदेव | (राज्यशास्त्र) |
| ३५. श्री. सोनवणे रामचंद्र संभाजी | (इतिहास) |
| ३६. श्री. पोमणे दत्तात्रय ठकोबा | (अर्थशास्त्र) |
| ३७. श्री. पवार चंद्रकांत बापूराव | (इतिहास) |
| ३८ श्री. जाधव दत्तात्रय तुकाराम | (हिंदी) |
| ३९. श्री. कांबळे रत्नप्रभा भालचंद्र | (इतिहास) |
| ४०. कु. गायकवाड साधना नामदेव | (राज्यशास्त्र) |
| ४१. श्री. निंबाळकर अंकुश एकनाथ | (इतिहास) |
| ४२ अ श्री. वालेकर बसवेश्वर ज्ञानोबा | (इतिहास) |
| ४२ ब. कु. गोसावी माधुरी आत्माराम | (राज्यशास्त्र) |
| ४३. श्री मोरे राहूल नारायण | (इतिहास) |
| ४४. श्री. किर्दक पंढरीनाथ हनूमंत | (इतिहास) |
| ४५. श्री. सपकळ राजेंद्र रामचंद्र | (इतिहास) |
| ४६. श्री. लोणकर जयवंत बाबासाहेब | (राज्यशास्त्र) |
| ४७. श्री. मुल्ला ताहेरअल्ली अलमगीर | (राज्यशास्त्र) |
| ४८. कु. दोशी शोभा रमणीकलाल | (राज्यशास्त्र) |
| ४९. श्री. बेंद्रे मनोहर हरिभाऊ | (मानसशास्त्र) |
| ५० श्री. गावडे मोहन निवृत्ती | (भूगोल) |
| ५१ अ. श्री. गदादे हनूमंत मारूती | (संरक्षणशास्त्र) |
| ५१ ब. कु. जगताप प्रतिभा पद्माकर | (राज्यशास्त्र) |
| ५१ क. कु. पुरंदरे मंजुषा गोविंद | (इतिहास) |
| ५२. कु. घोणे जयश्री नामदेव | (इतिहास) |
| ५३ अ. श्री व्होरकाटे वसंत वामन | (भूगोल) एक्स |
| ५३ ब. श्री. चव्हाण महादेव बबनराव | (मराठी) |
| ५३ क. श्री. गवळी युवराज विनायकराव | (इतिहास) |

**बी. कॉम्.**

| | |
|---|---|
| १. श्री. कांबळे अरुण मारुती | (अकौन्टन्सी) |
| २. श्री. पानसरे दिलीप महादेव | (अकौन्टन्सी) |
| ३. कु. शिंदे वासंती नारायण | (अकौन्टन्सी) |
| ४. कु. बिरबले स्मीता सिद्धलिंग | (संख्याशास्त्र) |
| ५. कु. मुळे अंजली रघुनाथ | (संख्याशास्त्र) |
| ६. श्री. बुवा रमाकांत प्रभाकर | (अकौन्टन्सी) |
| ७. श्री. निंबाळकर चंद्रशेखर माणिकराव | (अकौन्टन्सी) |
| ८, श्री. सोमाणी अजयकुमार हिरालाल | (अकौन्टन्सी) |
| ९. श्री. शितोळे अच्युत संपतराव | (संख्याशास्त्र) |
| १०. कु. कुलकर्णी वंदना बाळकृष्ण | (संख्याशास्त्र) |

११. कु. पिसे सुनदा प्रभाकर (अकौन्टन्सी)
१२. श्री. शेटे रमेश गुंडा (अकौन्टन्सी)
१३. श्री. पिसाळ सुधाकर त्रिंबकराव (अकौन्टन्सी)
१४. कु. चावरे स्वाती दिनानाथ (अकौन्टन्सी)
१५ अ. श्री. वाघ दत्तात्रय तुकाराम (अकौन्टन्सी)
१५ ब. श्री. सरोदे प्रशांत रामदास (अकौन्टन्सी)
१६. श्री. लोखंडे सदाशिव गंगाराम (अकौन्टन्सी)
१७ अ. श्री. देवकाते बाळासो आबासो (अकौन्टन्सी)
१७ ब. श्री. नरुटे सत्यविजय जगन्नाथ (अकौटन्सी)

**बी. एस्सी.**

१. कु. हरनाळे संगीता लक्ष्मणराव (वनस्पतीशास्त्र)
२. कु. जाधव वंदना शामराव (प्राणिशास्त्र)
३. कु. व्यवहारे सुनंदा छबूलाल (रसायनशास्त्र)
४. श्री. भोसले राजेंद्र दत्तात्रय (वनस्पतीशास्त्र)
५. श्री. ढवाण ज्ञानेश्वर गणपतराव (रसायनशास्त्र)
६. श्री. गोडसे अजित जगन्नाथ (वनस्पतीशास्त्र)
७. कु. साळवी नंदा अरविंद (वनस्पतीशास्त्र)
८. कु. रणदिवे चतुरादेवी नामदेव (वनस्पतीशास्त्र)
९. श्री. गिरहे भिमदेव एकनाथ (प्राणिशास्त्र)
१०. श्री. राजेनिंबाळकर सुधन्वा प्रतापराव (व. शास्त्र)
११. कु. मांडण प्रतिभा प्रभाकर (संख्याशास्त्र)
१२. श्री. दिवेकर सुनिल सदाशिव (रसायनशास्त्र)
१३. कु. नवाथे रश्मी शरद (पदार्थविज्ञान)
१४. कु. दोशी स्मीता विजयचंद (प्राणिशास्त्र)
१५. श्री. काळगे अशोक एकनाथ (पदार्थविज्ञान)
१६. श्री. घुले शशिकांत शंकरराव (वनस्पतिशास्त्र)
१७. श्री. सांगळे मोहन नरसिंग (प्राणिशास्त्र)
१८. श्री. इनामदार अजमुद्दीन जाफरभाई (व. शास्त्र)
१९. श्री. कुलकर्णी सुधीर प्रल्हाद (वनस्पतीशास्त्र)
२०. श्री. त्रिवेदी दिलीप झुंबरलाल (वनस्पतीशास्त्र)
२१. श्री बोत्रे राजेंद्र सुरेश (रसायनशास्त्र)
२२. निकम नितीन सखाराम (प्राणिशास्त्र)
२३. श्री. धुमाळ श्रीकांत पांडुरंग (प्राणिशास्त्र)
२४. श्री. धायगुडे शेखर गणपतराव (रसायनशास्त्र)
२५. सय्यद झकीरहुसेन इब्राहीम (रसायनशास्त्र)
२६. कु. किंगरे विद्या बब्रनराव (प्राणिशास्त्र) एक्स
२७. श्री. घाटगे प्रमोद कृष्णराव (रसायनशास्त्र)
२८. श्री. फराटे ज्ञानेश्वर बाबूराव (व. शास्त्र)एक्स
२९. श्री. बोराटे सतीश बाबूराव (संख्याशास्त्र)
३०. श्री. गायकवाड रमेश विठ्ठल (पदार्थविज्ञान)
३१. श्री. सुर्यवंशी माधव वसंत (पदार्थविज्ञान)
३२. श्री. गावडे शिवाजी हरीभाऊ (पदार्थविज्ञान) एक्स
३३. श्री. धायगुडे भानुदास अप्पा (पदार्थविज्ञान)

**एम्. ए.**

१. श्री. पाटील प्रकाश रतन (इतिहास)
२. श्री. निंबाळकर दत्तात्रय जयसिंग (मराठी)
३. श्री. गायकवाड सोलोमन भास्कर (इतिहास)
४. श्री. रायते जयराम बलराम (मराठी)
५. श्री. आटोळे हनुमंत दादाराम (इतिहास)
६. श्री. माळशिकारे आनंदराव मल्हारी (इतिहास)
७. श्री. लोणकर मच्छिंद्र जगन्नाथ (हिंदी)
८. श्री. पवार रंगराव तुकाराम (मराठी)

**एम्. कॉम्.**

१. कु. कत्रे हेमांगी रामचंद्र
२. श्री. सुपेकर नवनाथ भगवान

## शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांची नांवे १९८५-८६

**१. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. कोहळे रेखा रामचंद्र | एस. वाय. बी. कॉम. | रु. १०५० |
| २. | कु. बेलपत्रे संगीता गंगाधर | टी. वाय. बी. कॉम. | रु. १०८० |
| ३. | श्री. घोडके प्रशांत नागेश | टी. वाय. बी. कॉम. | रु. १०८० |
| ४. | कु. बेलपत्रे रजनी गंगाधर | एम. कॉम | रु. १४४० |

**२. राज्यसरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. जगताप सुनिता फत्तेसिंग | एस. वाय. बी. ए. | रु. ३६० |
| २. | कु. कुलकर्णी चेतना दिनकर | एस. वाय. बी. एस्सी. | रु. ३६० |
| ३. | कु. मगदूम प्रतिभा धनचंद्र | एस. वाय. बी. एस्सी | रु. ३६० |
| ४. | कु. गवसणे मंजुश्री षडानन | टी. वाय. बी. एस्सी | रु. ३६० |
| ५. | कु. केळकर विद्युत वामन | टी. वाय. बी. एस्सी. | रु. ३६० |
| ६. | कु. पाटील प्रेमलता बाळासाहेब | टी. वाय. बी. एस्सी. | रु. ३६० |
| ७. | श्री. साळुंके पंढरीनाथ निवृत्ती | एम. ए. राज्यशास्त्र | रु. ३६० |



**३. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळणारी राज्यसरकारची शिष्यवृत्ती**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कांडे संजय मधुकर | एस. वाय. बी. कॉम. | रु. ६७५ |

**४. हिंदी स्कॉलरशिप**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. आराध्ये वर्षा शंकर | एम. ए. हिंदी | रु. १००० |
| २. | कु कुलकर्णी माधुरी मदन | एम. ए. हिंदी | रु. १००० |
| ३. | श्री. माधव दत्तात्रय तुकाराम | एम. ए हिंदी | रु. १००० |
| ४. | कु. मुथा मंजू जयकुमार | एफ वाय. बी. ए. | रु. ५०० |

**५. गणेश मनोहर व शंकरराव गणेश दाते ट्रस्ट ( पुणे ) शिष्यवृत्ती**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. पळसुले देसाई स्मिता श्रीकृष्ण | एस. वाय. बी. कॉम. | रु. ३०० |
| २. | कु. इंगळे विद्या हरिभाऊ | टी. वाय. बी. कॉम. | रु. ३०० |
| ३. | कु. गोसावी विद्या विनायक | एस. वाय. बी. कॉम्. | रु. ३०० |
| ४. | श्री. देशपांडे पंकज यशवंत | टी. वाय. बी. कॉम. | रु. १५० |
| ५. | कु. ढेरे अंजली मारुतराव | टी. वाय, बी. कॉम. | रु. १५० |

**६. कंकुबाई केवलचंद गांधी ट्रस्ट ( मोर्डलिंब ) शिष्यवृत्ती**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. शहा उज्ज्वला चंदूलाल | टी. वाय. बी. कॉम. | रु. १०० |

## विशेष पारितोषिके

**१ ) कॉलेज पारितोषिके**

| | | |
|---|---|---|
| १. कु. जगताप सुनिता फत्तेसिंग | एफ वाय. बी. ए. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| २. कु पाटील ज्योती एकनाथ | एफ. वाय बी. एस्सी. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| ३ कु. कोहळे रेखा रामचंद्र | एफ वाय. बी. कॉम. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| ४ ढमे अशोक कुंडलिक | एस. वाय. बी. ए. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| ५. गाडेकर शिवाजी विनायक | एस. वाय. बी. एस्सी. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| ६. कु. बेलपत्रे संगीता गंगाधर | एस वाय. बी. कॉम. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| ७. चौधरी जवाहर लक्ष्मणराव | बी. ए. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| ८. कु हरनोळ संगीता लक्ष्मणराव | बी. एस्सी. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| ९. कांबळे अरुण मारूती | बी. कॉम. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| १० पाटील प्रकाश रतन | एम. ए. प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| ११. कु. कत्रे हेमांगी रामचंद्र | एम कॉम. प्रथम क्रमांक | रु. ५१ |

**२ ) पोपटलाल चंदनमल पारितोषिके**

| | | |
|---|---|---|
| १. चौधरी जवाहर लक्ष्मणराव | बी. ए. प्रथम क्रमांक | रु. १०० |
| २. कांबळे अरुण मारूती | बी. कॉम. प्रथम क्रमांक | रु. १०० |

३ ) स्व. डॉ. एस्. एन्. पुराणिक स्मृति पारितोषिक

| | | |
|---|---|---|
| १. कु. हसबनीस रोहिणी वासुदेव | बी. ए. ( राज्यशास्त्र ) | रु. १०१ |

४ ) अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे स्व. डॉ. एस्. एन्. पुराणिक पारितोषिक

| | | |
|---|---|---|
| १. कांबळे अरुण मारुती | बी. कॉम्. प्रथम क्रमांक | रु. १०१ |

५ ) स्व सुरेश काळे स्मृतिपारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. चौधरी जवाहर लक्ष्मणराव | बी. ए. प्रथम क्रमांक | रु. ६१ |
| २. कु. भोसले सुनंदा कृष्णराव | बी. ए. द्वितीय क्रमांक | रु. ४० |

६ ) श्री. कमलाकान्त ढवाण पाटील पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. जठार नामदेव गेनबा | एस. वाय. बी. ए. इतिहासात प्रथम | रु. २५ |
| २. कु. मेहता संगीता प्रकाश | एस. वाय. बी. ए. राज्यशास्त्रात प्रथम | रु. २५ |
| ३. वाघमारे संजय दत्तात्रय | एस. वाय. बी. ए. अर्थशास्त्रात प्रथम | रु. २५ |
| ४. ढमे अशोक कुंडलिक | एस. वाय. बी. ए. मानसशास्त्रात प्रथम | रु. २५ |
| ५. गाडेकर शिवाजी विनायक | एस. वाय. बी. एस्सी. प्रथम | रु. २५ |
| ६. कु. बेलपत्रे संगीता गंगाधर | एस. वाय. बी. कॉम्. प्रथम | रु. २५ |

७ ) श्री. अजित शहा ( वडुजकर ) पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. कु. कात्रे हेमांगी रामचंद्र | एम. कॉम्. प्रथम क्रमांक | रु. ५० |
| २. कांबळे अरुण मारुती | बी. कॉम्. अकौन्टन्सी प्रथम क्रमांक | रु. ५० |

८ ) श्री. के. वाय. जगताप ( मॅजिस्ट्रेट ) पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. कु. भोसले सुनन्दा कृष्णराव | बी. ए. ( समाजशास्त्र ) प्रथम | रु. ५१ |
| २. कु. नलावडे कल्पना तानाजी | बी. ए. ( इंग्लिश ) प्रथम | रु. ५० |

९ ) स्व. एच्. जी. चाफेकर स्मृति पारितोषिक तर्फे प्रा. आर. एच्. चाफेकर

| | | |
|---|---|---|
| १. कु. कुलकर्णी चेतना दिनकर | | रु. ५१ |

१० ) सौ. वासंती भगवानराव खारतुडे पारितोषिक

| | | |
|---|---|---|
| १. कु. नलावडे कल्पना तानाजी | बी. ए. इंग्लिश प्रथम | रु. ३५ |

११ ) प्रा. व्ही. व्ही. उपाध्ये पारितोषिक

| | | |
|---|---|---|
| १. कु. नलावडे कल्पना तानाजी | बी. ए. इंग्लीश प्रथम | रु. ५१ |

१२ ) प्रा. डॉ डी. टी. पाटील पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. निंबाळकर दत्तात्रय जयसिंग | एम. ए. ( मराठी ) प्रथम | रु. २५ |
| २. चव्हाण महादेव बबनराव | बी. ए. ( मराठी ) प्रथम | रु. २५ |
| ३. कु. बगाडे कल्पना साहेबराव | एफ्. वाय. बी. ए. ( मराठी ) प्रथम | रु. २५ |

१३ ) प्रा. एस्. पी. कदम पारितोषिक

| | | |
|---|---|---|
| १. किर्णिगे किरण आण्णासाहेब | एफ. वाय. बी. ए. समाजशास्त्र प्रथम | रु. ३१ |



१४ ) प्रा. व्ही. ए. संगई पारितोषिक

| | | |
|---|---|---|
| १. कु. गायकवाड उर्मिला कृष्णा | एफ. वाय. बी. ए. इतिहास प्रथम | रु. २५ |

१५ ) 'अस्मिता दर्शन' पारितोषिक

| | | |
|---|---|---|
| १. कविता– सुभेदार संदीप कमलाकांत | | रु ११ |

१६ ) काव्य व नाट्यवाचन स्पर्धा पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. कु. ज्योती मरकळे | काव्यवाचन– तृतीय क्रमांक | रु. ५ |
| २. कु. विद्युत केळकर | काव्यवाचन– तृतीय क्रमांक | रु. ५ |
| ३. फैजलकुमार सय्यद | नाट्यवाचन– तृतीय क्रमांक | रु. ५ |

१७ ) शंकर्स इन्टरनॅशनल चिल्ड्रन्स कॉपिटिशन १९८५, पेन्टिंग पारितोषिक मिळवल्याबद्दल

| | | |
|---|---|---|
| १. कु. चिनके सविता मनोहर | एफ. वाय्. बी. कॉम्. | रु. २५ |

१८ ) सामान्यज्ञान स्पर्धा पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. कोकरे नंदकुमार हरीभाऊ | तृतीयवर्ष, केमिकल इंजिनियरिंग डिप्लोमा, माळेगाव– प्रथम क्रमांक | रु. ५१ |
| २. कांबळे अरुण मारुती | एम कॉम. पार्ट १, तृतीय क्रमांक | रु. ३१ |

१९ ) लोकसंख्या शिक्षण मंडळ पारितोषिके

अ ) वक्तृत्व स्पर्धा––

| | | |
|---|---|---|
| १ एस् ए. सय्यद | उत्तेजनार्थ | रु. २५ |

आ ) चित्रस्पर्धा––

| | | |
|---|---|---|
| १ कु. सुनीता जगताप | एस. वाय. बी. ए. | रु. ५१ |
| २. कु. मंजुश्री गवसणे | टी. वाय. बी. एस्सी. | रु. ४१ |
| ३. कु. ज्योत्स्ना रणशिंग | टी. वाय. बी. एस्सी. | रु. ३१ |
| ४. कु. शुभांगी फरसोळे | एस. वाय. बी. एस्सी. | रु. २५ |
| ५. कु. सविता चिनके | एफ. वाय. बी. कॉम. | रु. १५ |
| ६. मिलींद सोमाणी | एफ. वाय. बी. कॉम. | रु. ११ |

२० ) रांगोळी व कला प्रदर्शन पारितोषिके

अ ) रांगोळी स्पर्धा––

| | | |
|---|---|---|
| १. कु. शुभांगी तावरे | एस. वाय. बी. ए. | रु. २१ |
| २. कु. उज्ज्वला जगताप | टी. वाय. बी. ए. | रु. १५ |

आ ) कला प्रदर्शन––

| | | |
|---|---|---|
| १. कु. अंजली ढेरे | टी. वाय बी. कॉम. | रु. २१ |
| २. कु. रशीदा बोरी | टी. वाय. बी. कॉम. | रु. १५ |

२१ ) राष्ट्रीय छात्रसेना विशेष पारितोषिके

| | |
|---|---|
| १. सुनील जोगळेकर––– पुणे ग्रुपच्या आर्मी विंगमधील सर्वोत्कृष्ट छात्रसैनिक. वीर सावरकर ट्रॉफी विजेता | रु. १०१ |
| २. ए. आर वाघ––– आग्रा येथे झालेल्या पॅराजंपिंग कॅम्पध्ये सहभाग. | रु ७५ |

**प्रगतीची वाटचाल**

मार्च / एप्रिल १९८५– परीक्षांचे निकाल

| | |
|---|---|
| बी. ए. | ७७ % |
| बी. कॉम्. | ६९ ,, |
| बी.एस्सी. | ४६ ,, |

पदव्युत्तर विभाग–

एम्. ए.–

| | |
|---|---|
| मराठी | १०० % |
| हिन्दी | १०० ,, |
| इंग्रजी | ६७ ,, |
| अर्थशास्त्र | २० ,, |
| राज्यशास्त्र | ८६ ,, |
| इतिहास | ७५ ,, |
| एम्. कॉम्. | ६९ ,, |
| डी टी.एल्. | ४० ,, |

**विद्यार्थी संख्या– १९८५–८६**

| पदवी वर्ग | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण |
|---|---|---|---|
| | ११४२ | २९१ | १४३३ |
| पदव्युत्तर वर्ग | २६८ | ५४ | ३२२ |
| एकूण | १४१० | ३४५ | १७५५ |

| बसतिगृहातील विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|
| ८४ | ४८ |

**प्राध्यापक संख्या**

पूर्णवेळ–६२ अर्धवेळ ३, एकूण–६५

शारीरिक शिक्षण संचालक १, ग्रंथपाल–१

**नवागतांचे स्वागत**

१ ) प्रा. पी. डी. वडगावकर — इंग्रजी

२ ) प्रा. आय्. एन् गालपेल्ली — संख्याशास्त्र

३ ) प्रा. के. बी. कापसे — रसायनशास्त्र

४ ) प्रा. डॉ. एन. एन्. पाटील — वनस्पतिशास्त्र

**हार्दिक अभिनंदन**

पुढील प्राध्यापकांनी आपल्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ केली.

१ ) प्रा. पी. जी. मेहेर — एल् एल. बी. जनरल

२ ) प्रा. पी. आर्. पाटील, एम् ए. इतिहास प्रथम श्रेणी

३ ) श्री. आर्. के गलांडे, रसायनशास्त्र विभागातील लॅब. असिस्टंट : बी. ए. मराठी स्पेशल द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.

प्रा. एम्. डी. भगत– पुणे विद्यापीठाच्या गणित विषयाच्या अभ्यास मंडळावर सहयोगी सभासद म्हणून निवड झाली.

प्रा. आर्. डब्ल्यू जोशी– एम् ए. अर्थशास्त्र उत्तीर्ण व याच विषयाचे व्याख्याते म्हणून महाविद्यालयात नेमणूक.

**विद्यार्थ्यांची गौरवगाथा**

श्री. के. व्ही. देशमुख, टी. वाय. बी. ए.

हैद्राबाद येथे झालेल्या आंतरविद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धेत पुणे विद्यापीठाच्या वतीने प्रतिनिधित्व केले.

**छात्रसेनेतील विद्यार्थ्यांचा बहुमान**

१९८५–८६ चा बेस्ट कॅडेट श्री. सुनील जोगळेकर, टी. वाय. बी. कॉम.—– एन. सी. सी. पुणे ग्रुप आर्मी विंगच्या वतीने बेस्ट कॅडेट म्हणून निवड झाली. त्याचप्रमाणे पुणे येथील प्रकाश मित्र मंडळाच्या वतीने दिली जाणारी 'सावरकर ट्रॉफी' त्यांना मिळाली. ही ट्रॉफी ३०–१२–८५ रोजी एन. सी. सी. डे च्या दिवशी पुण्याचे महापौर श्री. दत्ता एकबोटे यांचे हस्ते त्यांना देण्यात आली.

ज्युनियर अंडर ऑफिसर श्री. अमोद वाघ, एस्. वाय. बी. ए.– सेकंड महाराष्ट्र बटालियन एन. सी सी. पुणे यांच्या वतीने आग्रा येथे दि. २ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर १९८५ दरम्यान झालेल्या पॅराजंपिंग कोर्ससाठी निवड झाली होती. या कोर्सच्या कालावधीत त्यांनी रशियन बनावटीच्या विमानातून चार उड्या घेतल्या.

कु. सविता मनोहर चिनके– एफ. वाय बी. कॉम सन १९८५ चे शंकर्स इंटरनॅशनल चिल्ड्रेन्स कॉंपिटिशन मध्ये पेंटिंग या विषयात पारितोषिक मिळाले.

**मान्यवरांच्या भेटी**

१९८५–८६ या शैक्षणिक वर्षात पुढील मान्यवर व्यक्तींनी या ना त्या निमित्ताने भेटी दिल्या. त्यांनी महाविद्यालय व त्याचा परिसर पाहून अतिशय समाधान व्यक्त केले.

स्वातंत्र्य सैनिक, गांधीय दी कार्यकर्ते श्री पोपटलाल शहा ( पुणे )

पुणे महानगरपालिकेचे सभासद श्री. शांतीलाल सुरतवाला व श्री. अंकुश काकडे.

महाराष्ट्र को–ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीचे अध्यक्ष श्री. मधुसूदन राईलकर, मुंबई.



श्री. एस्. के. कुलकर्णी, संपादक–सकाळ, पुणे

खासदार श्री संभाजीराव काकडे.

मा. आ. श्री. किसनराव बाणखेले.

श्री. शांताराम दिवेकर, माजी महापौर (पुणे)

श्री. शंकर पाटील, अध्यक्ष अ. भा. मराठी साहित्य संमेलन.

प्राचार्य बाळ गाडगीळ, फर्ग्युसन कॉलेज, पुणे.

डॉ. भालचंद्र फडके, पुणे विद्यापीठ, पुणे.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडानैपुण्य पारितोषिक समारंभ सुप्रसिद्ध साहित्यिक व अ. भा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. शंकर पाटील यांच्या शुभहस्ते झाला. तर गुणवत्ता पारितोषिके प्राचार्य बाळ गाडगीळ, फर्ग्युसन कॉलेज यांच्या शुभहस्ते देण्यात आली. प्रा. डॉ. भालचंद्र फडके अध्यक्षस्थानी होते.

## मराठी विभाग – चर्चासत्र

पुणे विद्यापीठाने दिलेल्या अनुदानातून मराठी विषयाच्या पदव्युत्तर विभागाच्या वतीने 'राम गणेश गडकरी– एक मूल्यमापन' या विषयावर दि. ३० मार्च १९८६ रोजी एक चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात राम गणेश गडकरी यांचे नाटक, कविता, विनोद आदि विविध साहित्यावर पुढील मान्यवर व्यक्तींची विचार प्रवर्तक व्याख्याने झाली.

१ ) प्रा. डॉ. भीमराव कुलकर्णी, मराठी विभाग प्रमुख, एस. एन्. डी. टी. विश्व विद्यालय, मुंबई.

२ ) प्रा. डॉ. गं. ना. जोगळेकर, मराठी विभाग प्रमुख, फर्ग्युसन कॉलेज, पुणे.

३ ) प्रा. डॉ. वि. भा. देशपांडे, मराठी विभाग प्रमुख, मॉडर्न कॉलेज, पुणे.

४ ) प्रा. गो. म. कुलकर्णी, पुणे

५ ) प्रा. म. ना. अदवंत, पुणे.

या चर्चासत्रात एम्. ए. मराठीचे व अन्य वर्गातील मराठीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच प्रा. व्ही. ए. संगई यांनी 'एकच प्याला' या विषयावर आपला निबंध वाचला.

प्रा. डॉ. दयाराम पाटील, प्रा. डी. एम्. शहा, प्रा. एन् जी. लोंढे, प्रा. प्रभाकर कोरे, प्रा. उषा चौधरी, प्रा. मधु मोकाशी, प्रा. रंजना सरांदे यांनीही या चर्चेत भाग घेतला.

## वार्षिक घटनाक्रम....

१० जून ते १९ जून, ८५– राष्ट्रीय सेवा योजना उन्हाळी शिबीर पवईमाळ

३० जून, ८५– महाविद्यालयाचा वर्धापन दिन प्रमुख पाहुणे : मा. आ. कमलकिशोर कदम, सभापती, महाराष्ट्र राज्य विधानसभा.
अध्यक्ष : मा. श्री. शरच्चंद्रजी पवार

३० जून, ८५– बारामती नगरपरिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष–उपाध्यक्ष व सभासद यांचा सत्कार.
हस्ते प्रमुख पाहुणे : मा. आ. कमलकिशोर कदम.

१ ऑगस्ट, ८५– लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी.
प्रमुख पाहुणे : श्री. वा. ना. कुबेर
अध्यक्ष : उपप्राचार्य बी. बी. पाटील

५ व ६ ऑगस्ट, ८५– आंतरविभागीय टेबलटेनिस स्पर्धा.
उद्घाटक : श्री. एल. टी. देशमुख, सचिव, पुणे विद्यापीठ क्रीडामंडळ.

८ ऑगस्ट, ८५– महाविद्यालयातील अध्ययन अध्यापन यांचे अमेरिकन पथकाद्वारे व्हिडिओ चित्रीकरण.

१५ ऑगस्ट, ८५– स्वातंत्र्य दिनानिमित्त रक्तदान शिबीर.
उद्घाटक : मा. श्री. बी. वाय. वानखेडे, उपजिल्हाधिकारी, बारामती.
अध्यक्ष : मा. श्री. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष बारामती नगर परिषद.

७ सप्टेंबर, ८५– भूगोल विभागातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. एस. आर. जोग, पुणे विद्यापीठ यांचे 'भूरूप शास्त्रातील प्रमुख संकल्पना' यावर व्याख्यान.

८ व ९ सप्टेंबर, ८५– आंतरविभागीय बॅडमिंटन स्पर्धा.
उद्घाटक : डॉ. आर. पी. राजे, बारामती.

११ सप्टेंबर ८५ ते १७ सप्टेंबर ८५ – मिड सेमिस्टर युनिट टेस्ट.

१९ सप्टेंबर, ८५– आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धा.

उद्घाटक : श्री. शेखर पाटील, पुणे.

२१ सप्टेंबर, ८५– महाविद्यालयाच्या विज्ञान मंडळाचे उद्घाटन.

उद्घाटक : मा. श्री. एन. सी. उर्फ नानासाहेब जोशी

अध्यक्ष : मा. प्राचार्य आर. व्ही. खैरनार

२१ सप्टेंबर, ८५– पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने नियोजन मंडळाच्या वतीने व्याख्यान.

प्रमुख वक्ते : डॉ. कामत

अध्यक्ष : मा. श्री. आप्पासाहेब पवार, अध्यक्ष कृषि विकास प्रतिष्ठान, बारामती.

२१ व २२ सप्टेंबर, ८५– आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धा.

प्रमुख पाहुणे : मा. प्राचार्य आर. व्ही. खैरनार, अध्यक्ष पुणे विद्यापीठ क्रीडामंडळ.

अध्यक्ष : मा. श्री. एन. सी. उर्फ नानासाहेब जोशी अधिष्ठाता, विज्ञानशाखा व कार्यकारिणी सदस्य, पुणे विद्यापीठ.

२२ सप्टेंबर, ८५– कर्मवीर भाऊराव पाटील जयंती प्रमुख पाहुणे : श्री. एस. के. कुलकर्णी, संपादक दैनिक 'सकाळ' पुणे.

४ व ५ ऑक्टोबर, ८५– कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वाद व वक्तृत्व स्पर्धा.

१७ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर, ८५– सत्रअखेर परीक्षा.

२२ व २३ नोव्हेंबर, ८५– आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धा.

उद्घाटक : मा. श्री. विनोदकुमार गुजर, नगराध्यक्ष बारामती नगरपरिषद.

६ डिसेंबर ते १५ डिसेंबर, ८५– राष्ट्रीय सेवा योजना : हिवाळी शिबीर, बऱ्हाणपूर.

२० डिसेंबर, ८५– आंतरराष्ट्रीय युवकवर्षानिमित्त प्रभात फेरी, कवायती, समूहगीते व सभा इत्यादीमध्ये सहभाग.

२५ जानेवारी, ८६– शाळा-कॉलेज समूह योजने अंतर्गत ८, ९, १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित.

२६ जानेवारी, ८६– प्रजासत्ताक दिनी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर मा. प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांचे हस्ते ध्वजारोहण.

२७ जानेवारी ते १ फेब्रुवारी ८६– मीड-सेमिस्टर युनिट टेस्ट.

१० फेब्रुवारी, ८६– ज्युनियर महाविद्यालयाच्या पर्यवेक्षणासाठी.

मा. श्री. एस. बी. चांदेकर, उपशिक्षण संचालक, पुणे विभाग ह्यांची भेट.

२० फेब्रुवारी, ८६– लोकसंख्या शिक्षण मंडळातर्फे विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा.

२१ फेब्रुवारी, ८६– महायोगी गुरुदेव काटे स्वामीजी यांचे 'शांतता व मनःस्वास्थ्य' यावर व्याख्यान.

४ मार्च, ८६– लोकसंख्या शिक्षण मंडळातर्फे 'भारताची लोकसंख्या : समस्या व धोरण' या विषयावर श्रीमती तारा कानिटकर यांचे व्याख्यान.

७, ८, ९, १० मार्च, ८६– वार्षिक स्नेहसंमेलन

१८ मार्च, ८६– क्रीडा नैपुण्य व गुणवत्ता पारितोपारितोषिके वितरण.

३० मार्च, ८६ : मराठी विभाग, पदव्युत्तर विभागाचे वतीने 'कै. रा. ग. गडकरी : एक मूल्यमापन' या विषयावरील चर्चासत्र.



भरावा मोद विश्वात, असावे सौख्य जगतात ॥
सदा हे ध्येय पूजावे जगाला प्रेम अर्पावे ॥

साने गुरुजी

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
## बारामती

# अनेकान्त

अनन्तधर्मणस्तत्त्वं पश्यन्ती प्रत्यगात्मनः
अनेकान्तमयी मूर्तिर्नित्यमेव प्रकाशताम् ॥

वार्षिक नियतकालिक

( कनिष्ठ )

अंक चोविसावा : १९८५–८६

# अनुक्रमणिका

**मराठी**

**कविता**


चरणावरी तुझ्या– कु. शारदा ढेरे ( ११ वी सायन्स )
नको आहे– संजय पाटदरे ( ११ वी आर्टस् )
फिनिक्स– कु. रेहाना खान ( ११ सायन्स )
दूरदर्शन शाप की वरदान– श्रीनिवास लोंढे ( १२ वी सायन्स )
मामा, मला मुलगी पसंत आहे ! – आबिद एम् दलाईत ( ११ वी वाणिज्य )
आकांक्षापूर्ती– ज्योत्स्ना बनसोडे ( ११ वी सायन्स )

**ENGLISH**

Love— Anjali S. Mohite ( XI Science )
Age of Machines— Sanjivani Nigade ( XI Science )
Dhruva : An evidence of India's Scientific progress—
Collected by Anjali Mohite ( XI Science )
Mystery of the Ruined castle— Chandarani Jagtap ( XI Science )
कार्यवृत्तांत
मेरिट ऑर्डर लिस्ट


## चरणावरी तुझ्या

आता पुरे उपेक्षा व्याकुळ जीव झाला
चरणावरी तुझ्या या देह मी अर्पिला
आसक्ती या मनाला भलतीच घाली भूल
संपोनी जन्मपंक्ती भेटेल का मूळ ?
मी भक्तीभाव माझा तव पायी वाहियेला
चरणावरी तुझ्या या देह मी अर्पिला
आता तरी पुढे या ताटातुटी नसावी
मुळच्या विशाल तेजी मिसळोनी ज्योत जावी
संकल्प हा उराशी दिनरात वाहियेला
चरणावरी तुझ्या या देह मी अर्पिला

**कु. शारदा ढेरे**
११ वी ( शास्त्र )

## नको आहे

नको आहे अस्त्र येथे
जग आहे त्रस्त येथे
शक्तीच्या जोरावर
राक्षसांचे प्रस्थ येथे
गरीबांच्या प्रेतावर
गिधाडे आहेत मस्त येथे
मऊमऊ मांसावर
कुंभकर्ण सुस्त येथे
लुटलेल्या खजिन्यावर
सैनिकांची गस्त येथे

**संजय पाटदरे**
११ वी ( आर्टस् )

## फिनिक्स

हे फिनिक्स
तुझ्या धमन्या माझ्या लेखणीला दे
मी तो सूर्य थंड केलाय
ही लेखणी त्या कामी अस्त्र ठरली
कुठलीही स्थिर बाब
मला अस्थिर करते
सूर्य त्यातलाच !
अन् तुझी तेजाची मागणी
अपूर्व,
पण अपूर्णच !
हे फिनिक्स
ही जमीन पहा
माझी तीच लेखणी शिंपलीय इथं मी
आता कितीतरी सूर्यांचे
तेजस्वी कोंब रुजु घातलेत......
हे फिनिक्स,
तू आता काही काळ माझ्या हृदयात वस
कदाचित मग तुला
कुठल्याच आकाशी सूर्याची गरज उरणार नाही
कारण इथून बाहेर झेपावशील
तेंव्हा तू स्वतःच सूर्य झालेला असशील
हे फिनिक्स
तू माझ्या लेखणीचा हो.

**कु. रेहाना खान**
११ वी ( शास्त्र )

## LIST OF SOME PUBLICATIONS

| | | Rs. |
|---|---|---|
| Bilgrami Syed (Jafar Raza) | Salt-II : A Balance of Ambivalences | 60 |
| Bhagowalia Urmila | Vaisnavism and Society in Northern India | 80 |
| Datta D. K. | Social, Moral & Religious Philosophy of Mahatma Gandhi | 50 |
| Dass S. K. | Glimpses of Divine Light | 75 |
| Dhindsa K. S. | India's Export Performance | 70 |
| Ghose Sisirkumar | Man and Society | 25 |
| Ghose S. K. | The Crusade and End of Indira Raj | 40 |
| De Souza, Alfred | Children in Creches | 40 |
| Karunakaran K. P. | Democracy in India | 60 |
| Khosla Dr. Sarla | Gupta Civilization | 150 |
| Kamal Dr. K. L. | Pakistan : The Garrison State | 60 |
| Lokhande G. S. | Dr. Bhimrao Ramji Ambedkar | 80 |
| Khosla Dr. Sarla | Asvaghosa and his times | 300/FC |
| Gauri Shankar V. | Taming the Giants, Transnational Corporations in World Arena | 80 |
| Singh R. G. | Terror to Reform | 50 |
| R. G. Singh | Rural Modernisation : Contradiction and Change | 80 |
| Thakur N. C. | Ashadha Ka Ek Din | 25 |
| Roop Lekha Borgohaili | The Indian National Congress | 80 |
| B. K. Ahluwalia and Shashi Alhuwalia | Architects of Swaraj | 80 |
| B. K. Ahluwalia and Shashi Ahluwalia | Bharat Ratnas ( 1985 ) | 150 |
| Chopra P. N. | Green Revolution in India | 150 F/C |
| P. G. Salvi | The Emerging Developing Countries | 80 |
| Suman Gupta | The Origin and Theories of Linguistic Philosophy | 50 |
| K. Sheshadri | Rural Unrest in India | 80 |
| R. N. Chopra | Public Sector in India | 100 |
| Rajendra Verma | Comparative Religion : Concepts and experience ( 1984 ) | 80 |
| David Neel | Journey to Lhasa | 150 |
| Sharma Ram Avtar | Justice & Social Order in India ( 1984 ) | 200 |
| Thomas E. J. | Coalition Game Politics in Kerala (1995) | 75 |
| Jain S. P. | Art of Board Casting ( 1985 ) | 45 |
| Lt. Col D. K. Banerjee | Sino-Indian Border dispute ( 1985 ) | 70 |
| B. K. Ahluwalia and Shashi Ahluwalia | Rajiv Gandhi : A profile in Courage ( 1985 ) | 90 |
| Srivastava T. N. | Woman and the Law ( 1985 ) | 130 |
| Kapoor Kapil | Semantic structure and the verb ( 1985 ) | 180 |
| Biswas A. R. | From Justice to Welfare ( 1985 ) | 150 |
| Abraham A. S. | Education & Employment in Agriculture | 60 |
| Chopra P. N. | Multilevel Planning in India | 80 |
| Arshi P. S. | History of Sikh architecture in Punjab | 350 F/C |
| Suman Gupta | Critique of Wittgenstein | 75 F/C |
| Har Pinder Kaur | Gandhi's Concept of Civil Disobedience | 75 F/C |

**INTELLECTUAL BOOK CORNER**
Pratap Gali, 23 Daryaganj ( Ansary Road )
New Delhi - 110002 ( Phone - 279911 )




# दूरदर्शन शाप की वरदान

**श्रीनिवास लोंढे, १२ वी सायन्स**

"अगं नीता, तू अहेस तरी कोठे ?" नीताच्या आईच्या शब्दात संताप अगदी ओथंबला होता. "अग उद्या तुझी परीक्षा आणि तू बसली आहेस टी. व्ही. वरचा चित्रपट पहात." पहिली पाच मिनिटे नीताने लक्षच दिले नाही, पण आईचा सूर चढला, तेव्हा नीता मोठ्या नाखुषीनेच उठली. कारण जितेंद्र-श्रीदेवीचा चित्रपट चालू होता. नीताच्या अभ्यासात व्यत्यय नको म्हणून नीताच्या बाबांनी दूरचित्रवाणी संच आणलाही नव्हता. पण ती शेजारीपाजारी जाऊन टी. व्ही. पाहातेच.

खरे तर लोक शिक्षणाच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या प्रसारमाध्यमात दूरदर्शन हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. पण वरील प्रसंगाचा विचार करता दूरदर्शन शाप की वरदान हे ठरवणे अत्यावश्यक झाले आहे.

आपल्या देशात दूरदर्शनचा प्रवेश ही फक्त पंचवीस वर्षांपूर्वीची घटना आहे. आपल्या महाराष्ट्रापुरतेच बोलायचे झाले तर २ ऑक्टोबर १९७२ रोजी मुंबईच्या दूरदर्शन केंद्राच्या प्रारंभापासून त्याचा इतिहास सांगता येईल. सध्या महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्व भागात दूरदर्शनचा प्रसार झाला आहे.

दूरदर्शन हे ज्ञानप्रसाराचे सर्वात प्रभावी साधन आहे असे म्हणण्याचे कारण म्हणजे त्याचे दृक्श्राव्य स्वरूप ! भारतात शिक्षण प्रसार आवश्यक तेवढा न झाल्यामुळे वर्तमानपत्रे तळागाळापर्यंत पोहोचू शकत नाहीत. त्यामानाने आकाशवाणीचे माध्यम जास्त परिणामकारक ठरते. पण या दोहोंनाही दूरदर्शनची सर येणार नाही. दूरदर्शनवरील चित्रे हालतीबोलती असल्याने वास्तवतेचा स्पर्शही कार्यक्रमांना देता येतो. प्रत्यक्ष प्रसंग पहात असल्यासारखे वातावरण दूरदर्शनच्या कार्यक्रमात निर्माण करता येते आणि हाच दूरदर्शनचा चित्रपटापेक्षा फायदा आहे. जगातील कोणत्याही भागात घडत असलेले प्रसंग घरबसल्या पहाण्याची सोय झाली आहे, मग ते पंतप्रधानांचे अमेरिकेतील भाषण असो की मेलबॉर्नला चाललेला भारत व ऑस्ट्रेलिया मधील क्रिकेटचा सामना असो !

दूरदर्शरद्वारे जगातल्या घडामोडींची माहिती व त्यांचे आपल्या दृष्टीने कमी अधिक महत्व समजण्यास मदत होते. नागरिकत्वाचे नियम, देशापुढील विविध समस्या व त्या सोडवण्यासाठी उपाययोजना, बिज्ञानातील निरनिराळे शोध, सृष्टीतील विविधांगी चमत्कार, जगाचा पाठीवरील निरनिराळ्या प्रकारचे मानवी जीवन अशा तऱ्हेची नानाविध स्वरुपाची माहिती नागरिकांना देऊन त्यांना बहुश्रुत आणि जबाबदार नागरिक बनविण्यासाठी दूरदर्शन हे सर्वोत्तम साधन आहे.

पण खेदाची गोष्ट अशी की, या साधनांचे महत्व आपल्याला अजून पटलेले नाही. दूरदर्शन म्हणजे मनोरंजन एवढेव समीकरण आपल्याकडे रूढ झाले आहे. सिनेमा, सिनेमागीते, नाटके, यापलिकडे काही पहाण्यासारखे असते हे आमच्या लोकांना अद्याप पटलेले नाही. दर रविवारी सिनेमा पाहण्यासाठी सर्वजण गर्दी करतात, ७॥ च्या जाहिराती पहातात, पण बातम्या सुरू झाल्या की सर्वजण बाहेर ! इतकेच नाहीतर काही घरातील दूरदर्शनसंच तेवढा वेळ बंद ठेवला जातो. ही दूरदर्शनची सवंग लोकप्रियता नाही काय ? आणि आता त्याच्या भरीला व्हि. डी. ओ. सेटस् आले आहेत. त्याच्या मदतीने सर्व नको ते कार्यक्रम वाटेल तेव्हा पाहता येतात. तमेच हल्ली तरुण वर्गात ब्ल्यू फिल्म पहाण्याचे वेड देखील वाढले आहे.

अशा या सवंग करमणूकीने समाज ग्रासला आहे त्याची प्रसती होण्यापेक्षा अधोगती होत आहे. या ससाजाला वेळीच जागे करून दूरदर्शनच्या या अतिरिक्त व्यसनापासून परावृत्त करण्याची वेळ आली आहे. दूरदर्शनचे कार्यक्रम जवळून पाहिल्यानी डोळ्यांना

अपाय होतो. सतत दूरदर्शनपुढे बसून राहिल्याने शरीराची हालचाल कमी होते व व्यायामाअभावी येणाऱ्या शारीरिक तक्रारी सुरू होतात. याहीपेक्षा भयंकर म्हणजे लोकांचे सामाजिक जीवन संपुष्टात येऊ लागले आहे. पूर्वी सभा संमेलनांना गर्दी होत असे. पण हल्ली तशी गर्दी क्वचितच दिसते. लोक संध्याकाळी घराबाहेर पडून एकमेकांना भेटत पण हल्ली जो तो दूरदर्शनचे डोकं धरून बसलेला या निर्जीव पेटीने सारे समाजजीवन चार भिंतींच्या आत बंदिस्त करून ठेवले आहे.

या सगळ्या अनर्थातून वेळीच मार्ग काढला पाहिजे. शासनानेही स्वतःचे कर्तव्य समजून लोकांना द्यावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले पाहिजे. दूरदर्शनवरील खर्च व उद्दिष्ट यांचा मेळ घालून नवीन नवीन उद्बोधक कार्यक्रम जास्तीत जास्त चांगल्या तऱ्हेने प्रसारित करण्याची यंत्रणा निर्माण केली पाहिजे.

आणि शेवटी कितीही झाले तरी दूरदर्शन हे साधन आहे. त्याचा यथायोग्य उपयोग केला तरच त्याचे इष्ट उपयोग दिसून येतील. त्याचा गैरउपयोग केला तर ते हानिकारक ठरेल. दूरदर्शन हे शाप ठरविणे अथवा वरदान ठरवणे हे आपल्या हातात आहे.

# मामा, मला मुलगी पसंत आहे !

**आबिद एम्. दलाईत, ११ वी वाणिज्य.**

"मला मुलगी पसंत आहे", सखारामाचे हे वाक्य ऐकून मालतीला एकदम गहीवरून आले. शनीची पिडा टळल्याचा तिला आनंद झाला.

पडवीत सखाराम आणि मालतीचे वडील साहेबराव बोलत होते. सखारामला ड्युटीवर जाण्याची घाई झाली होती. ड्रेस करण्याची देखील त्याला सवड नव्हती. रात्री तो बऱ्याच उशीरा घरी आला आणि मोर्च्याच्या बंदोबस्तासाठी सकाळीच त्याला ड्युटीवर बोलावले होते. गेल्या तीन दिवसांपासून त्याने ड्रेस उतरला नव्हा, तो घरी आला नव्हता आणि त्याच्या जेवणाचाही पत्ता नव्हता. तो एक मुंबईचा पोलीस होता.

ड्रेस करता करता सखाराम आपले भावी सासरे साहेबराव यांना स्वतःच्या वधूपरीक्षेचा निर्णय स्वतःच देत होता. बाहेर उन्हात सखारामाची म्हातारी आई बसली होती आणि आत खिडकीपाशी सखारामची भावी पत्नी मालती उभी राहून सखारामाचा निर्णय ऐकत होती. स्वयंपाक घरात स्टोव्हवर चहा उकळत होता. त्याचा वास घरात भरून ओसंडत होता. मालतीचा आनंद देखील गगनात मावेनासा झाला. सखारामाचा स्पष्ट निर्णय ऐकून मालतीला गहिवरून आले, परंतु लगेचच तिने स्वतःला सावरले. चहाचे कप भरले व खाली मान करून मोठ्या अदबीने सखाराम आणि साहेबराव यांच्या पुढ्यात चहा ठेवला. डोक्यावर पदर घेऊन म्हातारीच्या पायावर मालतीने आपले डोके ठेवले.

अनपेक्षितपणे चहा आल्याचे पाहून सखारामाला आश्चर्य वाटले पाण्यापासून स्वयंपाकापर्यंतची सारी कामे सखारामालाच करावी लागत होती. परंतू आज गरम पाण्यापांसून चहापर्यंत सखारामाला काही करावे लांगले नाही. पोलीस खात्याच्या नोकरीमुळे म्हातारीची सेवा, घरची कामे आणि नोकरी यामध्येच त्याचा वेळ जात होता. परिणामी म्हातारीचे आणि स्वतःचे खाण्यापिण्याचे हाल होत होते. परंतु आज सर्व कामे मालतीने उरकलेली पाहून आपल्या घरात प्रत्यक्ष लक्ष्मी आल्याचा त्याला अनुभव आला.



मालती ही साहेबरावांची पहिली मुलगी. शिवाय आनखी दोन मुली व सर्वात छोटा एक मुलगा असा साहेबरावांचा परिवार होता. मारवाड्याच्या दुकानात दिवाणजीची नोकरी करून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य घालविले. रानात शेती नाही व गावात घर नाही आणि उत्पन्नाचे दुसरे साधन नाही, अशा परिस्थितीत प्रपंचाची गाडी चलविणे साहेबरावांना फारच अवघड होते. आता स्वतः ते कोर्टामध्ये स्टॅम्प रायटरचे काम करून आणि पत्नी इतरांच्या घरात पापडी लाटून जे काय मिळेल त्यातच ते पोटपूजा करीत होते.

गेल्या आठ वर्षांपासून मालतीसाठी साहेबराव स्थळ शोधीत होते. अुसनवार करून पायपीट करीत होते, अुंबरठे झिजवीत होते तशी मालती दिसण्यात सुंदर होती. नाकी-डोळी सुरेख होती. मॅट्रिक पर्यंत तिचे शिक्षण झाले होते. व तिची शरीर प्रकृती देखील सुदृढ होती. परंतु पत्रिका जुळत नाही, यंदा कर्तव्य नाही, शिक्षण कमी, नोकरी करणारी पाहिजे अशा कारणांनी सारखा नकार मिळत होता. या प्रत्येक कारणामागे भरपूर घबाड आणि हुंडा हेच प्रमुख कारण होते हे साहेबरावाना स्पष्ट दिसत होते. परिस्थितीमुळे हुंडा देणे त्यांना मुळीच शक्य नव्हते. आठ वर्षात त्यांनी एकवीस स्थळांची हांजी-हांजी केली होती. मालतीचे वय वाढत होते. आणि साहेबराव तिच्या काळजीने खंगत होते. मुलगी होणे हे साहेबरावांना परमेश्वरी शाप वाटत होता. समाजातील विवाह पद्धतीची त्यांना चीड येत होती. परंतु, समाजाची प्रवृती बदलणे, हुंडा बंद करणे हे एका गरीब साहेबरावाला शक्य नव्हते.

एका दलालाला त्याची दलाली दिल्यानंतर साहेबरावांना सखारामाचा शोध लागला. महिन्यापूर्वीच मुलगी दाखवायला आणतो असे त्यांना सखारामाला कळविले होते, ताबडतोब या असे उत्तर देखाल साहेबरावांना आले. नव्या आशेने त्यांनी प्रवास खर्चाची तरतूद केली. मालतीच्या आईने पापड लाटण्याची मजूरी आगाऊ घेतली. मालतीच्या आईने मालतीला उपयुक्त सल्ला दिला. साहेबराव मालतीस घेऊन वधू परीक्षेसाठी मुंबईस निघाले. मुलगा– सखाराम मुंबई पोलीस होता. पदवीधर होता. घर-शेत नसले तरी कायमची नोकरी व शिक्षण होते. म्हातारया आईशिवाय सखारामाला दुसरे नातेवाईक नव्हते हुंड्याशिवाय हे स्थळ साधेल का? अशा विचाराने साहेबराव मुंबईस पोहोचले.

सखारासाच्या म्हाताऱ्या आईने आपल्या भावी सुनेचे हळदी–कुंकवाने स्वागत केले. सखाराम ड्युटीवर होता, ४ पर्यंत येण्याचा त्याने निरोप ठेवला होता. पाहुण्यांच्या जेवणाची म्हातारी खटपट करू लागली. उतार वयामुळे तिला रोजचा स्वयंपाकच उरकत नव्हता. अजागळाप्रमाणे घरातील सामान इतस्ततः पडले होते. सखाराम ४ वाजेपर्यंत येणार नव्हता तोवर बसून राहण्यात अर्थ नाही, म्हातारीला मदत करावी म्हणून मालतीने कंबर कसली व कामाला लागली. घरातील सारे सामान तिने नीटनेटके ठेवले, भिंती पुसल्या, फरशीं धुतली, तसबीरी लावल्या, दारे–खिडक्यांना पडदे लावले व देवापुढे उदबत्ती लावली. स्वच्छता आणि सजावटीमुळे घरातील वातावरण प्रसन्न झाले. सुनबाई गुणी म्हणून शेजारच्या बाया मालतीची स्तुती करू लागल्या. म्हातारीने मालतीची दृष्ट काढली.

बाप आणि लेकीला– मालतीला म्हातारीने जेवणाचा आग्रह केला. परंतु सखाराम येईपर्यंत मालतीने जेवणाला नकार दिला. तोंडात पाण्याचा थेंब व अन्नाचा कण न घालता मालती सखारामाची वाट पहात बसली. ४ वाजले, सखाराम आला नाही. त्याचा निरोप आला. कोणा मंत्र्याच्या कार्यक्रमामुळे तो रात्री उशीरा येणार होता न जेवता मालती सखारामाची वाट पहात बसून राहिली. म्हातारीचे डोळे पाण्याने भरले.

म्हातारी आणि साहेबराव यांची जवणे झाली. गावाकडच्या गप्पा, नाते–गोते, माहिती अशी चर्चा होऊन दोघेही झोपले. मालती मात्र सखारामाच्या ताटा शेजारी त्याची वाट पहात तशीच बसून राहिली. मध्यरात्री सखाराम घरी आला. मालतीने लगेच दार उघडले. घरातील स्वच्छता व टापटीप पाहून त्याला आश्चर्य वाटले. गरम पाणी, साबण, टॉवेल मालतीने सखारामाच्या पुढे केला व जेवावयास सांगितले.

ताटावर बसता–बसता सखारामाने पाहुण्याचे जेवण झाले का म्हणून म्हातारीस विचारले. तेव्हा म्हातारी म्हणाली, "अरे, तुझी वाट पहात ती पोर न जेवता

अजून अशीच बसून आहे. मी आणि पाहूणे दोघेही जेवलो." हे ऐकुन सखारामाला मालतीचा अभिमान वाटला. तिची पतीसेवा पाहून तो मंत्रमुग्ध झाला. त्याने मालतीला जेवावयास सांगितले. सखारामाचे जेवण झाल्यावर मालतीने आपले जेवण उरकले. उष्टे-खरकटे काढून झाडून काढले. साखाराम बाहेर झोपायला गेला.

रात्रभर तो मालतीच्या स्वभावाचा व वागणुकीचा विचार करीत होता. मुंबईतील शिकलेल्या आणि बेछूट वागणाऱ्या मुली तो रोज पाहात होता. देशातील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय घडामोडींची सखाराम गंभीरपणे दखल घेत असे. हुंडावळीची उदाहरणे तो वाचीत होता, घटना ऐकत होता. कॉलेजमध्ये आणि राष्ट्र सेवा दलामध्ये हुंडाबंदीवर तो प्रभावीपणे बोलत होता. हुंड्याच्या मुली आणि नखरेल मुली तसेच, मालतीचा स्वभाव आणि वागणूक यांचा तौलनिक विचार करू लागला. नखरेल आणि हुंड्याच्या मुली बेछूट असतात. त्यांना नवऱ्याची व प्रपंच्याची काळजी नसते असे त्याचे स्पष्ट मत होते. परिणामी मालती त्याला उपयुक्त आणि आदर्श वाटू लागली. त्यातच तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी देण्या-घेण्याची, नात्या-गोत्याची काहीही चौकशी न करता सखारामाने साहेबरावांना **"मामा, मला मुलगी पसंत आहे,"** असा स्पष्ट निर्णय दिला. आणि लग्नाच्या तयारीला लागा, असे बोलून सखाराम कामावर गेला.

★

# आकांक्षापूर्ती

**ज्योत्स्ना बनसोडे,** ११ वी सायन्स

---

आज सकाळपासून सोनाच्या सारच मनाविरुद्ध घडत होतं. कॉलेज दुपारचं, त्यातही झालेला उशीर नि मुख्य म्हणजे सरितेला बरं नसल्याने तिला एकटीला जाणं जीवावर आलं होतं पण काय करणार! महत्वाचे पिरिएड्स अटेंड करणं जरूरीचं होतं.

दुपारची वेळ असल्याने रस्ता तसा निर्जनावस्थेत अस्ताव्यस्तपणे वामकुक्षी घेत होता. सोना भरभर रस्ता कापत चालली होती. इतक्यात रिक्षाचा आवाज तिनं ऐकला. पण पण..... ती रिक्षा वेडीवाकडी वळणं घेत पुढं झेपावत होती. रिक्षाला चुकवण्यासाठी सोनाचा बाजूला पडलेल्या भल्यामोठ्या काचेच्या तुकड्यांवर पाय पडला. 'आई ग' करत ती मटकन खालीच बसली. मनाचा हिय्या करूने तिनं ती काच बाजूला काढली नि रक्ताची धारच लागली. सोनाच्या डोळ्यातूनही गंगाजमुना वाहू लागल्या. इतक्यात एक निळी फियाट तिच्यासमोर येऊन उभी राहिली. एक रूबाबदार तरुण पटकन् खाली उतरला. त्याला पाहताच तत्क्षणी तिला जाणवलं, याला कुठंतरी पाहिलय. अरे, हो हा तर रोहित मराठे! कॉलेज क्रिकेट टीमचा कॅप्टन! रोहित घाईघाईनं खाली उतरला नि तिचा पाय हलकेच हातात घेऊन रूमाल बांधता बांधता उद्गारलां, "सोना, किनी रक्त गेलं नाही?" याला आपलं नाव माहित असल्याचं पाहून तिला आश्यर्य वाटलं.

"तुम्ही मला ओळखता?"

"वा, ब्रिलियन्ट लोकांना कोण ओळखत नाही?" तशाही अवस्थेत डोळे पुसतापुसता ती थोडसं हसली.

"मिस सोना, आपण आता जवळच्या दवाखान्यात जाऊन बँडेज करू नि मग मी तुमच्या घरी सोडेन."

"हा" म्हणण्याशिवाय तिच्याकडे पर्याय नव्हता. ती उठून उभी राहिली नि एक सणसणीत कळ उठली ती थेट मस्तकापर्यंत 'आयई ग!' सोना वेदना सहन न होऊन ओरडली. रोहितनं तिला गाडीत नेऊन बसवलं. खर तर असं अनोळखी तरुणाबरोबर जाताना तिला कससंच वाटत होतं.

दवाखान्यातून बाहेर पडताना आपल्या घराच्या पत्त्याचं छोटसं कार्ड तिनं रोहितकडं दिलं नि गाडीत जाऊन बसली. उभं राहण्याचही तिच्यात त्राण नव्हतं. रक्तस्राव खूप झाला होता. मागच्या सीटवर डोळे टेकवून तिने डोळे मिटले.

